# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह

महासभा दि. १७/१०/२००७

आज बुधवार दि. १७/१०/२००७ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा सकाळी ११.०० वाजता सभा सुचना क्र. ०२ दि. ०४/१०/२००७ रोजीच्या विषयपत्रिकेवर विचार विनिमय करणेकरिता महापालिका सभागृह, ३ रा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह येथे मा. पिठासिन अधिकारी श्री. नरेंद्र मेहता, महापौर, मिरा भाईंदर महानगरपालिका यांच्या अध्यक्षतेखाली भरली असता खालीलप्रमाणे सदस्य हजर होते.

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | नरेंद्र मेहता | महापौर |
| २) | मेन्डोन्सा स्टीवन जॉन | उपमहापौर |
| ३) | पाटील जयंत महादेव | सभागृह नेता |
| ४) | दिव्या अशोक तिवारी | सदस्या |
| ५) | म्हात्रे मिलन वसंत | सदस्य |
| ६) | शानू जो. गोहिल | सदस्या |
| ७) | पाटील उमाताई शाम | सदस्या |
| ८) | वैती नर्मदा यशवंत | सदस्या |
| ९) | शेट्टी गणेश गोपाळ | सदस्य |
| १०) | जाधव मोहन महादेव | सदस्य |
| ११) | वेतोसकर राजेश शंकर | सदस्य |
| १२) | पाटील सुनिता कैलास | सदस्या |
| १३) | पाटील प्रविण मोरेश्वर | सदस्य |
| १४) | म्हात्रे राजेश हरिश्चंद्र | सदस्य |
| १५) | पाटील प्रभात प्रकाश | सदस्या |
| १६) | पुरोहित मधुसुदन मनोहरलाल | सदस्य |
| १७) | पाटील धनेश परशुराम | सदस्य |
| १८) | म्हात्रे कल्पना महेश | सदस्या |
| १९) | पाटील शरद केशव | सदस्य |
| २०) | अग्रवाल ओमप्रकाश गंगाधर (गाडोदिया) | सदस्य |
| २१) | पाटील ध्रुवकिशोर मन्साराम | सदस्य |
| २२) | पाटील मिलन गोविंदराव | सदस्य |
| २३) | व्यास सुधा वासुदेव | सदस्या |
| २४) | रॉड्रीक्स मॉरस जोसेफ | सदस्य |
| २५) | फॅरो ग्रिटा स्टीफन | सदस्या |
| २६) | शेख आसिफ गुलाब | सदस्य |
| २७) | म्हात्रे नयना गजानन | सदस्या |
| २८) | पाटील अनंत रामचंद्र | सदस्य |
| २९) | गोविंद हेलन जॉर्जी | सदस्या |
| ३०) | बाविघर सिसिलीया विजय | सदस्या |
| ३१) | परेरा टेरी पॉल | सदस्य |
| ३२) | सावळे निर्मला बाबुराव उर्फ कांबळे निर्मला विष्णू | सदस्या |
| ३३) | कुरेशी याकुब ईस्माईल | सदस्य |
| ३४) | परेरा कॅटलीन ऍन्थोनी | सदस्या |
| ३५) | ठाकुर प्रकाश पांडुरंग | सदस्य |
| ३६) | डॉ. राजेंद्र भवरलाल जैन | सदस्य |
| ३७) | शर्मा भगवती | सदस्य |
| ३८) | पाटील वंदना मंगेश | सदस्या |
| ३९) | भोईर शशिकांत जगन्नाथ | सदस्य |
| ४०) | भोईर सुनिता शशिकांत | सदस्या |

| | | |
|---|---|---|
| ४१) | पाटील प्रेमनाथ गजानन | सदस्य |
| ४२) | पाटील प्रफुल्ल काशीनाथ | सदस्य |
| ४३) | म्हात्रे तुलसीदास दत्तात्रेय | सदस्य |
| ४४) | वर्षा भानुशाली | सदस्या |
| ४५) | सिंग श्रीप्रकाश जिलेदार | सदस्य |
| ४६) | पांडे स्नेहा शैलेश | सदस्या |
| ४७) | शेख मुसरर्तबानु इब्राहिम | सदस्या |
| ४८) | जंगम लक्ष्मण गणपत | सदस्य |
| ४९) | सपार उमा विश्वनाथ | सदस्या |
| ५०) | इनामदार जुबेर अब्दुल्ला | सदस्य |
| ५१) | पुजारी कांचन शेखर | सदस्य |
| ५२) | मुंज वासुदेव भास्कर | सदस्य |
| ५३) | सय्यद नुरजहाँ नझर हुसैन | सदस्या |
| ५४) | शेख नुर मोहम्मद अेहमद | सदस्य |
| ५५) | खान शफीक अहमद सादत | सदस्य |
| ५६) | भाटकर प्रेरणा प्रमोद | सदस्या |
| ५७) | डिसा मर्लिन मर्विन | सदस्या |
| ५८) | वैती विजया हेमचंद्र | सदस्य |
| ५९) | पालांडे प्रशांत भगवंतराव | सदस्य |
| ६०) | ठाकूर कल्पना हरिहर | सदस्या |
| ६१) | म्हात्रे चंद्रकांत खंडोजी | सदस्य |
| ६२) | मोदी चद्रकांत भिकालाल | सदस्य |
| ६३) | भट दिप्ती शेखर | सदस्या |
| ६४) | दुबे रामनारायण सदानंद | सदस्य |
| ६५) | वैती चंद्रकांत सिताराम | सदस्य |
| ६६) | सावंत अनिल दिवाकर | सदस्य |
| ६७) | भोईर राजू यशवंत | सदस्य |
| ६८) | चक्रे वंदना रामदास | सदस्या |
| ६९) | शेख सलिम दाउद | सदस्य |
| ७०) | हरिश्चंद्र जगन्नाथ म्हात्रे | सदस्य |
| ७१) | माळी हेमा रविंद्र | सदस्या |
| ७२) | यादव मिरादेवी रामलाल | सदस्या |
| ७३) | गावंड मंदाकिनी आत्माराम | सदस्या |
| ७४) | म्हात्रे मोहन गोपाळ | सदस्य |
| ७५) | अनिता जयवंत पाटील | सदस्या |

**गैरहजर सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | नलावडे दिनेश दगडू | सदस्य |
| २) | डिमेलो बर्नड आल्बर्ट | सदस्य |
| ३) | हसनाळे जोत्सना जालींदर उर्फ शिंदे पूजा प्रताप | सदस्या |

**रजेचा अर्ज**

| | | |
|---|---|---|
| १) | सिंह मदन उदितनारायण | सदस्य |

**एस. ए. खान :-**

सभेची वेळ होवुन गेलेली आहे. अजुन पिठासीन अधिकारी सभेला आलेले नाहीत. सभागृहात कोरम पुर्ण झालेला आहे. तर आम्ही बहुमताने आमच्या पक्षाचे ज्येष्ठ नगरसेवक श्री. तुळशीदास म्हात्रे ह्यांचे पिठासीन अधिकारी म्हणुन नाव सुचवित आहे.

**मॉरस रॉड्रीक्स :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**चंद्रकांत वैती :-**

सचिवजी कोरम पुर्ण झालेला आहे. आपण पिठासीन अधिकारी म्हणुन श्री. तुळशीदास म्हात्रे यांना डायसवर बोलावुन घ्यावे. सभागृहाचा सन्मान करावा. सदस्यांनी सुचना केल्याप्रमाणे आपण पिठासीन अधिकाऱ्याला सन्मानाने डायसवर बोलवावे.

**नगरसचिव :-**

पिठासीन अधिकारी म्हणुन श्री. तुळशीदास म्हात्रे साहेबांची नेमणुक करण्यांत आलेली आहे. आपण डायसवर यायचे आहे.

**चंद्रकांत वैती :-**

सचिवजी, राष्ट्रगीताला सुरुवात करावी.

( मा. महापौर तथा पिठासीन अधिकारी यांनी राष्ट्रीय गीतानंतर आपले स्थान ग्रहण केले.)

**चंद्रकांत वैती :-**

सचिवजी सभागृहाच्या कामकाजाला सुरुवात करावी.

**मा. महापौर :-**

येथे उपस्थित नवनिर्वाचित नगरसेवक सर्व पक्षाचे गटनेते, उपस्थित आयुक्त साहेब, मिरा भाईंदर महानगरपालिकेचे सर्व अधिकारी, समोर उपस्थित पत्रकार बंधु आणि सर्व सामान्य नागरिक, सर्व प्रथम मी माझे भाषण आज विशेष करुन मराठीमध्ये भाषांतर करेन कारण की बरेचसे लोक हिंदी भाषीय महापौर झाल्यानंतर त्यांना आज हिंदीमध्ये ऐकायचे आहे. त्याकरिता मी माझे भाष्य हिंदीमध्ये कनर्व्हट करत आहे.

**चंद्रकांत वैती :-**

सभागृहाचे कामकाज हे या महाराष्ट्रामध्ये मराठीतच व्हावे असे संकेत आहेत. त्याला अनुसरुन आपण मराठीत बोलावे.

**मा. महापौर :-**

ठिक आहे. मी माझे भाषण मराठी व हिंदीमध्ये कनर्व्हट करेन.

**एस. ए. खान :-**

मा. महापौर साहेब, आपल्याला मराठी बोलता येत नाही का?

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य आपल्याला चांगलेच माहित आहे की, मला मराठी बोलता येते की, नाही माझी इच्छा आहे की, मी हिंदीमध्ये भाष्य करावे म्हणुन मी हिंदीमध्ये बोलत आहे. आप यहा पर उपस्थित सभी....

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहेब, त्यांना हिंदीचा आदर नाही का? हिंदी ही राष्ट्रभाषा आहे. मराठी या महाराष्ट्राची भाषा असली तरी हिंदीही राष्ट्रभाषा आहे. म्हणुन कुठल्याही भाषेबद्दल आक्षेप घेउन भाषेचा अपमान या सभागृहामध्ये करु नका.

**चंद्रकांत वैती :-**

सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवालजी कुठच्याही भाषेचा अपमान होत नाही. हिंदी आमची राष्ट्रभाषा आहे. त्याच सार्थ अभिमान आम्हांला आहे. परंतु, महाराष्ट्रामध्ये मराठी चालते.

**मा. महापौर :-**

कॉंग्रेस पक्षानी असा आग्रह धरल्यामुळे मी हिंदी भाषेत बोलत नाही. आय एम सॉरी फॉर दॅट मी माझे भाषण मराठीत करतो.

**तुळशीदास म्हात्रे :-**

आपण कॉंग्रेस पक्षाचे नाव कसे घेता.

**मा. महापौर :-**

विरोध तर तुमचाच आहे. आपण खाली बसा. मला माझे भाषण पुर्ण करु द्या उपस्थित सर्व नगरसेवक, नगरसेविका.....

**चंद्रकांत वैती :-**

मराठीचा द्वेष केलेला येथे अजिबात चालणार नाही. आपण असे कसे सांगता की, कॉंग्रेस पक्षाचा आग्रह आहे.

**मा. महापौर :-**

आपण सर्वांनी मला निवडुन दिल्याबद्दल मी आपणा सर्वांचे आभारी आहे. उपस्थित सर्व नगरसेवक, नगरसेविका आणि विशेष करुन मा. गिल्बर्ट जॉन मेन्डोंसा, मा. आमदार हितेंद्र ठाकुर, मा. आमदार नितीन गडकरीजी, मा. आमदार संजय केळकर साहेब, मा.उध्दवजी ठाकरे साहेब या सर्वांच्या आर्शीवादाने मला ही संधी मिळाली आहे आणि शांततेने अडीच वर्षे घालवाल आणि मला पुर्ण सहकार्य लाभेल अशी अपेक्षा बाळगतो. मी सर्व पक्षांना एकत्र घेउन चालेल असे मी आपल्याला आश्वासन देतो. कुठलाही भेदभाव न करता मी माझे अडीच वर्षाच्या कार्यकालामध्ये आपणा सर्वांना एकत्र घेउन पुढची सर्व कार्य व्यवस्थितपणे करेन. तसेच आपण मला ही जी संधी दिली त्याकरिता आपणा सर्वांना मनापासुन धन्यवाद आज निवडणुकींचा विषय आहे. त्यानंतर गणपती विसर्जनाच्या वेळी ज्या मुलाचे मयत झाले त्याबद्दल विचार विनिमय करायचे आहे. व श्री. रोहित शर्मा क्रिकेटर यांचा सत्कार करायचा आहे. त्याबद्दल विचारविनिमय करायचा आहे. सचिवजी सभेच्या पुढील कामकाजाला सुरुवात करावी.

(नगरसचिवांनी विषयपत्रिकेचे वाचन केले.)

प्रकरण क्र. ०३ :- मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २० चे तरतुदीनुसार स्थायी समिती गठीत करणेबाबत.

**नयना म्हात्रे :-**

मा. महापौर साहेब, आपल्या परवानगीने बोलत आहे की आज देशाला स्वातंत्र्य मिळवुन ६० वर्षे पुर्ण झाली. परंतु, महिला या कधीही राष्ट्रपती झाल्या नव्हत्या आज खरोखरच या देशाचा भाग्याचा दिवस उजाडलेला आहे की, महिला या राष्ट्रपती झाल्या. मा. प्रतिभा ताई पाटील या राष्ट्रपती झाल्या ही महिलांसाठी गर्वाची गोष्ट आहे. याकरिता मी अभिनंदनाचा ठराव मांडित आहे.

**शानु गोहिल :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**अभिनंदन ठराव ०३ :-**

आपल्या देशाला स्वतंत्र्य मिळून ६० वर्ष पुर्ण झाली. लोकशाही देशात उशीरा का होई ना पण तेरावे राष्ट्रपती म्हणून एका महिलेला संधी मिळाली. महाराष्ट्र राज्यात जन्मलेल्या प्रतिभाताई पाटील यांची सर्वोच्च पदावर निवड झाल्याबाबत देशातल्या प्रत्येक महिलेला अभिमान व गौरव आहे.

महिलांना समृद्ध करून व त्यांना संधी देउन देशाला प्रगतीपथावर नेण्याची जबाबदारी प्रत्येकाची आहे. देशात असंख्य महिला शक्ती उभी ठाकली आहे. तिच्यावर लक्ष केंद्रीत करून देशाला सर्वांगसुंदर बनविण्यासाठी त्यांचा उपयोग करून घेणेदेखिल गरजेचे आहे.

मिरा भाईंदर येथील सर्व जनतेच्या वतीने विशेष करून महिलांच्यावतीने मी त्यांना मनःपुर्वक शुभेच्छा देत आहे असे अभिनंदनाचा ठराव ठेवत आहे.

**सुचक :- श्रीम. नयना म्हात्रे. अनुमोदक :- श्रीम. शानु गोहिल.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. महापौर :-**

सर्व पक्षांच्या गटनेत्यानी प्रकरण क्र. ३ करिता आपआपली माहिती सादर करावी.

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ३ करिता १६ सदस्यांची नावे आलेली आहेत ती मा. महापौरांकडे मी सुर्पुद करित आहे.

**जंयत पाटील :-**

उपस्थित सर्व सन्मा. नगरसेवक.....

**मॉरस रॉड्रीक्स :-**

आपण काय वाचत आहात.

**जयंत पाटील :-**

ठराव वाचत आहे.

**एस.ए.खान :-**

ठराव नाही तो ठराव कुठे आहे ते दाखवा.

**नगरसचिव :-**

परंतु, त्याचे रुपांतर ठरावात केलेले आहे. ठराव वाचावा लागेल.

**एस. ए. खान :-**

संख्याबळाप्रमाणे दिलेले आहे ते आपल्याला मंजुर करावे लागेल विषय संपला.

**जयंत पाटील :-**

हे प्रोसिडींगला घ्यावे लागेल.

**एस. ए. खान :-**

सचिवजी हे नाव वाचतील ना.

**प्रफुल्ल पाटील :-**

ठरावाला विरोध नाही. पहिल्यांदा सचिवांनी ठरावाचे वाचन करावे.

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ३ करिता संख्याबळाप्रमाणे संयुक्त लोकशाही आघाडी ८, भारतीय राष्ट्रवादी पक्ष - ५, भारतीय जनता पार्टी - २, शिवसेना - १ याप्रमाणे जी नावे द्यायची आहेत. त्याप्रमाणे नावे आलेली आहेत. ती नावे सभागृहापुढे वाचुन दाखवितो.

(नगरसचिवांनी सदर पक्षाच्या सदस्यांचे सभागृहासमोर वाचन केले.)

असे एकुण संख्याबळाप्रमाणे १६ नावे आलेली आहेत. आणि १६ नावे आपल्याला निवडायची आहेत. त्यामुळे ही जी नावे आहेत ती ठरावात आहेत तो ठराव सभागृहासमोर वाचायला सांगत आहे.

(सन्मा. सदस्य जयंत पाटील यांनी प्रकरण क्र. ३ च्या ठरावाचे सभागृहासमोर वाचन केले.)

**प्रकरण क्र. ०३ :-**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २० चे तरतुदीनुसार स्थायी समिती गठीत करणेबाबत.

मिरा भाईंदर महानगरपालिका सार्व. निवडणूक २००७ मध्ये एकूण ७९ नवनिर्वाचित पालिका सदस्य निवडून आलेले आहेत. महानगरपालिकेच्या स्थायी समितीवर १६ सदस्यांची नियुक्ती मान्यताप्राप्त पक्षाचे किंवा नोंदणीकृत पक्षाचे तौलनिक पक्षबळ विचारात घेउन महानगरपालिकेतील अशा पक्षाच्या किंवा गटाच्या संख्याबळावर स्थायी समितीमध्ये नामनिर्देशन करण्याबाबतची तरतुद आहे.

महानगरपालिकेच्या नवनिर्वाचित सदस्यांनी मा. विभागीय आयुक्त सो. कोकण विभाग यांचे कार्यालयात नोंदणी करून गट/आघाडी/फ्रंट तयार केल्याप्रमाणे तौलनिक पद्धतीनुसार गटनिहाय वृक्षप्राधिकरण समितीवर खालीलप्रमाणे सदस्य संख्या प्रस्तावित होती.

१. संयुक्त लोकशाही आघाडी - ०८
२. भारतीय राष्ट्रवादी काँग्रेस - ०५
३. भारतीय जनता पार्टी - ०२
४. शिवसेना - ०१

याप्रमाणे स्थायी समितीवर खालील १६ सदस्यांची नियुक्ती करण्यात येत आहे.

| अ.क्र | सदस्यांचे नाव | फ्रंट / आघाडी |
|---|---|---|
| १. | श्रीम. शानु गोहिल | संयुक्त लोकशाही आघाडी |
| २. | श्रीम. सुनिता कैलास पाटील | संयुक्त लोकशाही आघाडी |
| ३. | ॲड. शफिक अहमद सादत खान | संयुक्त लोकशाही आघाडी |
| ४. | श्री. म्हात्रे तुळशीदास दत्तात्रेय | संयुक्त लोकशाही आघाडी |
| ५. | श्री. रॉड्रीक्स मॉरस जोसेफ | संयुक्त लोकशाही आघाडी |
| ६. | श्री. शेट्टी गणेश गोपाळ | संयुक्त लोकशाही आघाडी |
| ७. | श्रीम. म्हात्रे नयना गजानन | संयुक्त लोकशाही आघाडी |
| ८. | श्री. म्हात्रे मिलन वसंत | संयुक्त लोकशाही आघाडी |
| ९. | श्री. अग्रवाल ओमप्रकाश गंगाधर | भारतीय जनता पार्टी |
| १०. | श्री. पाटील शरद केशव | भारतीय जनता पार्टी |
| ११. | श्री. पालांडे प्रशांत भगवंतराव | शिवसेना |
| १२. | श्री. प्रकाश पांडुरंग ठाकुर | राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी |
| १३. | श्री. टेरी परेरा | राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी |
| १४. | श्रीम. जोत्स्ना हसनाळे | राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी |
| १५. | श्री. भोईर राजू | राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी |
| १६. | श्री. ध्रुवकिशोर पाटील | राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी |

**मिलन पाटील :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**नगरसचिव :-**

नवनिर्वाचित सदस्यांचे डायसवरील पिठासीन अधिकारी हे स्वागत करतील. मी प्रत्येक सदस्याला बोलवत आहे. त्याप्रमाणे सदस्याने डायसवर यायचे आहे.

(नवनिर्वाचित स्थायी समिती सदस्यांचे पिठासीन अधिकारी यांनी पुष्पगुच्छ देवुन स्वागत केले.)

**प्रकरण क्र. ०३ :-**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २० चे तरतुदीनुसार स्थायी समिती गठीत करणेबाबत.

**ठराव क्र. ०४ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका सार्व. निवडणूक २००७ मध्ये एकूण ७९ नवनिर्वाचित पालिका सदस्य निवडून आलेले आहेत. महानगरपालिकेच्या स्थायी समितीवर १६ सदस्यांची नियुक्ती मान्यताप्राप्त पक्षाचे किंवा नोंदणीकृत पक्षाचे तौलनिक पक्षबळ विचारात घेउन महानगरपालिकेतील अशा पक्षाच्या किंवा गटाच्या संख्याबळावर स्थायी समितीमध्ये नामनिर्देशन करण्याबाबतची तरतुद आहे.

महानगरपालिकेच्या नवनिर्वाचित सदस्यांनी मा. विभागीय आयुक्त सो. कोकण विभाग यांचे कार्यालयात नोंदणी करून गट/आघाडी/फ्रंट तयार केल्याप्रमाणे तौलनिक पद्धतीनुसार गटनिहाय वृक्षप्राधिकरण समितीवर खालीलप्रमाणे सदस्य संख्या प्रस्तावित होती.

१. संयुक्त लोकशाही आघाडी - ०८
२. भारतीय राष्ट्रवादी कॉंग्रेस - ०५
३. भारतीय जनता पार्टी - ०२
४. शिवसेना - ०१

याप्रमाणे स्थायी समितीवर खालील १६ सदस्यांची नियुक्ती करण्यात येत आहे.

| अ.क्र | सदस्यांचे नाव | फ्रंट / आघाडी |
|---|---|---|
| १. | श्रीम. शानु गोहिल | संयुक्त लोकशाही आघाडी |
| २. | श्रीम. सुनिता कैलास पाटील | संयुक्त लोकशाही आघाडी |
| ३. | ॲड. शफिक अहमद सादत खान | संयुक्त लोकशाही आघाडी |
| ४. | श्री. म्हात्रे तुळशीदास दत्तात्रेय | संयुक्त लोकशाही आघाडी |
| ५. | श्री. रॉड्रीक्स मॉरस जोसेफ | संयुक्त लोकशाही आघाडी |
| ६. | श्री. शेट्टी गणेश गोपाळ | संयुक्त लोकशाही आघाडी |
| ७. | श्रीम. म्हात्रे नयना गजानन | संयुक्त लोकशाही आघाडी |
| ८. | श्री. म्हात्रे मिलन वसंत | संयुक्त लोकशाही आघाडी |
| ९. | श्री. अग्रवाल ओमप्रकाश गंगाधर | भारतीय जनता पार्टी |
| १०. | श्री. पाटील शरद केशव | भारतीय जनता पार्टी |
| ११. | श्री. पालांडे प्रशांत भगवंतराव | शिवसेना |
| १२. | श्री. प्रकाश पांडुरंग ठाकुर | राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी |
| १३. | श्री. टेरी परेरा | राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी |
| १४. | श्रीम. जोत्स्ना हसनाळे | राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी |
| १५. | श्री. भोईर राजू | राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी |
| १६. | श्री. ध्रुवकिशोर पाटील | राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी |

**सही/-**
**पिठासीन अधिकारी**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. ०४ चे वाचन केले.)

प्रकरण क्र. ०४ :- मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३० (१) चे तरतुदीनुसार महिला व बालकल्याण समिती गठीत करणेबाबत.

(सन्मा. सदस्या निर्मला सावळे यांनी प्रकरण क्र. ४ चा सभागृहासमोर ठराव मांडला.)

**प्रकरण क्र. ०४ :-**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३० (१) चे तरतुदीनुसार महिला व बालकल्याण समिती गठीत करणेबाबत.

मिरा भाईंदर महानगरपालिकेची सार्वत्रिक निवडणूक १२.०८.२००७ रोजी होउन नव्याने महानगरपालिका अस्तित्वात आलेली आहे. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३० मधील तरतुदीनुसार नव्याने विशेष समित्यांच्या नेमणूका करावयाच्या आहेत. प्रकरण क्र. ४ नुसार महिला व बालकल्याण समिती गठित करावयाची आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेने यापूर्वी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमाच्या अनुसूची २ मधील कामकाजाविषयक नियमात सुधारणा करुन नवीन प्रारुप नियम तयार केले होते. याप्रारुप नियमाच्या नियम क्र. ४ (ब) नुसार महिला व बालकल्याण समितीच्या सदस्यांची संख्या ९ ठरविली होती. परंतु, नियम ४ब (२) ४ (क) नुसार महिला व बालकल्याण समितीची रचना व मुदती संदर्भात ठराव करण्यास महासभेच्या अधिकारास बाधा आणलेली नाही. सदरचे नियम प्रारुप नियम असून, त्यास अजून अंतिम मंजूरी दिलेली आहे. तसेच मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३० (७) नुसार महानगरपालिकेस कोणत्याही वेळी विशेष समितीचे विसर्जन करता येईल किंवा तिच्या रचनेत फेरफार करता येईल अशी तरतुद आहे.

प्रशासनाने दिलेल्या गोषवाऱ्यानुसार सदर समितीची सदस्य संख्या ९ दर्शविण्यात आली आहे. सदर संख्येबाबत मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ नुसार अशाप्रकारे अशी कोणतीही विशिष्ट संख्येची नोंद कायदयामध्ये नाही. याउलट कलम ३०(७) नुसार महासभेस सदर समितीची रचना कोणत्याही वेळेस बदलता येईल अशा तरतुद आहे. त्यामुळे सदर गोषवारा चुकीचा असल्याने तो फेटाळण्यात येत आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेने मागील ५ वर्षात गठित केलेल्या महिला व बालकल्याण समितीचे कायदेशीर विर्सजन झाल्यामुळे ती समिती पुन्हा नव्याने गठित करणे व तिची पुर्नरचना करणेबाबतचा विषय आजच्या महासभेपुढे ठेवण्यात आला आहे.

ज्या अर्थी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३०(१) नुसार वरील समितीचे नेमणुक करण्याचे अधिकार महानगरपालिकेस आहेत असे नमुद केले आहे, त्या अर्थी हे अधिकार महासभेचे आहेत.

महिला व बालकल्याण समितीमध्ये महानगरपालिकेतील गटाच्या संख्याबळाच्या प्रमाणात सदस्यांची नामनिर्देशन करण्याची तरतुद मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३०(अ) चा (१) मध्ये केलेली आहे. तसेच कलम ३१(अ) चा (३) अन्वये पक्षाच्या किंवा गटाच्या वतीने नामनिर्देशित करावयाच्या पालिका सदस्यांच्या संख्येच्या बाबतीत कोणताही प्रश्न उद्‌भवल्यास त्याबाबतीत मा. महानगरपालिकेचा निर्णय अंतिम असेल असे नमुद केले आहे.

महानगरपालिकेत संयुक्त लोकशाही आघाडी गटाचे ४०, राष्ट्रवादी कॉंग्रेस गटाचे २५, भारतीय जनता पक्षाचे ९, शिवसेनेचे ५ असे संख्या बळाबळ आहे.

महिला व बालकल्याण समिती गठित करताना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमचे कलम ३० (१अ) अन्वये त्यामध्ये किमान ७५% महिला पालिका सदस्या असाव्यात अशी तरतुद आहे. याचा अर्थ महिला पालिका सदस्यांची संख्या कमाल १००% असू शकते.

वर्तमान स्थितीत महिलांना ३३ टक्के आरक्षण असल्यामुळे एकूण ७९ सदस्य संख्येच्या ३३% म्हणजे २७ महिला निवडून आल्या आहेत. साधारण प्रभागातून ६ महिला सदस्या अशाप्रकारे एकूण ३३ महिला पालिका सदस्या निवडून आलेल्या आहेत.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३० (१अ) व (७) अन्वये मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण समितीची नव्याने रचना करण्यात येउन त्यामध्ये कमाल १००% महिलांची नेमणूक करण्यांत येत आहे व एकूण सदस्यांची संख्या २१ करण्यांत येत आहे. असा ठराव मांडण्यात येत आहे.

**नयना म्हात्रे :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**जयंत पाटील :-**

अध्यक्ष महाशय, प्रकरण क्र. ४ मध्ये सन्मा. नगरसेविका श्रीम. निर्मला सावळे यांनी आता जो ठराव मांडला तो ठराव माझ्या म्हणण्याप्रमाणे चुकीचा आहे. विषयपत्रिकेवर नउ सदस्यांची निवड व्हावी असा विषय आहे. तुम्हांला एकतर हा विषय रद्द करावा लागेल. त्याच्यानंतर पुन्हा ठराव करुन त्या ठरावाद्वारे १५ सदस्यांची नेमणुक करावी लागेल आणि ठराव करतांना २/३ मतदान लागेल हे लक्षात घ्या. तेव्हा आजच्या विषयावर आपण आम्हांला काय रुलिंग देतो ते सांगा ९ सदस्यांची नेमणुक करावी. असा विषयपत्रिकेवरील आपला विषय आहे आणि त्या दृष्टीने आम्ही सगळी तयारी करुन आलेलो आहेत.

**मा. महापौर :-**

गोषवाऱ्याप्रमाणे प्रत्येक गटनेत्याने बालकल्याण समिती सदस्यांची माहिती सादर करावी.

**चंद्रकांत वैती :-**

अशी कशी माहिती सादर करण्याचे आपण आदेश देत आहात. जेव्हा महापालिकेसमोर ठराव झाला आहे व ठरावाला अनुमोदन ही मिळाले मोठ्या संख्येने ह्याच्यामध्ये महिलांचा समावेश व्हावा ठराव मांडल्यानंतर आपण त्या ठरावाचे उल्लघंन करुन गोषवाऱ्याप्रमाणे सदस्यांची मागणी कशी करता?

**मिलन पाटील :-**

मा. महापौर साहेब, आपल्या मुळ सदस्यामध्ये काही फेरबदल झालेला नाही त्याची आवश्यकताच भासत नाही. आतापर्यंत जे नउ सदस्यांचे होत आहे. त्याप्रमाणे ते झाले पाहिजे. आपली सदस्य संख्या बदली झालली आहे का? ७९ चे ९२ झाले का? तर कशाकरिता हे बदली करायची?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहेब, महिलांच्या ३३ टक्के आरक्षणाचा विषय आहे. ह्याला आम्ही कोणीही विरोध केलेला नाही पण जर कॉंग्रेस पक्षाकडुन, आघाडीकडुन अशी अपेक्षा आहे की, १५ संख्या झाली पाहिजे.त्या प्रतिनिधींनी हे जर मा. महापौरांकडे आधी कळविले असते. तर त्याचा मान सर्व पक्षाने ठेवला असता. पण आता आमचे ज्येष्ठ नेते सन्मा. सदस्य जयंत पाटील ह्यांनी सांगितले की ह्या संख्याबळाबाबत आपण आम्हालां टिपणी पाठवलेली आहे. त्या टिपणीमध्ये आपण नउ संख्या दिलेली आहे. आमचाही पक्ष आहे आणि आमच्या पक्षाचा निर्णय आम्हाला मान्य करावा लागतो. आम्ही संख्याबळाप्रमाणे संख्याबळ आणलेले आहे. तरी ज्यापध्दतीने पहिजे ते होत होते. त्या पध्दतीने आपण ही प्रक्रिया सुरु करावी. आणि आजचा अजेन्डा पुर्ण करावा.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्या, श्रीम. निर्मला सावळेजी जो विषय मांडला आहे तर ही बालकल्याण समिती एका वर्षासाठी आहे. पुढच्यावेळी करायचे असेल त्यावेळी रितसर त्याच्या संख्याबळाप्रमाणे विषय घेउन कायदेशीर सदस्य तरतुदीनुसार संख्या कशी वाढविता येईल. ह्याबाबत विचार करुन पुढच्या वर्षी संख्या वाढविता येईल. यावेळी आपण नउ सदस्यांचा गोषवारा ऑलरेडी दिलेला आहे. त्या रितीप्रमाणे सदस्य संख्या जाहिर करावी.

**प्रफुल्ल पाटील :-**

मा. महापौर साहेब, आपण सभा चालवित आहात सभा चालवताना कायद्याच्या तरतुदी पहिल्या बघाव्या लागतील कायद्याच्या तरतुदीच्याबाहेर जर कोणा गटाला पक्षाला किंवा नगरसेवकांना जर असे काही वेगळे घबाड पाहिजे असेल किंवा एखादी विनंती करतो की, आपण महापौर निधीतुन असे अमुक करा तमुक करा तर त्या मागण्या म्हणुन आपण लक्षात घेउ नका ही मागणी नाही ही कायद्याची तरतुद आहे. कायद्याच्या तरतुदीनुसार संयुक्त लोकशाही आघाडीचा ठराव आहे. संयुक्त लोकशाही आघाडीने आपल्याकडे मागणी केलेली नाही. की, आमच्यासाठी आपण एवढे काहीतरी करा त्या मागणीचा विचार करा. म्हणजे जसे कामगार लोकांना बोनस द्यावा लागतो २० टक्के द्या. व पुढच्यावर्षी २५ टक्के देवु आणि ते तुमच्या खिशातल देण नाही आणि ते कोणी मागणार ही नाही व आपण खुप उदार ही आहात. माझ्यामते हा विषय कायद्याला धरुन आहे. आणि कायदा असा बोलतो की, कुठलीही विशेष समिती  कलम ३० चा (७) ही कधीही विर्सजित करता येते किंवा त्याची रचना बदलता येते. महापालिकेने जो गोषवारा दिलेला आहे. प्रशासनाने तो मागे झालेल्या निवडणुकांच्या संदर्भामध्ये जी महिला समिती गठीत केली होती त्याची सदस्य संख्याधरुन संख्याबळ दिलेले आहे. परंतु, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमामध्ये अशाप्रकारची कुठलीही तरतुद महिला बालकल्याण समितीची संख्या अमुकच असावी अशी कुठलीही तरतुद नाही. कलम ३० (१) (अ) मध्ये या समितीमध्ये किमान ७५ टक्के महिला असाव्यात अशा प्रकारची तरतुद आहे. याचा अर्थ महिलांची संख्या १०० टक्क्यापर्यंत असु शकते आणि जर आपण उदार मताचे असाल आणि खरोखर या देशाने महिलांना आरक्षण देण्याच्या संदर्भात जी काही कार्यवाही केलेली आहे. संपुर्ण केंद्र सरकारपासुन, केंद्र शासनापासुन, महाराष्ट्र शासनापासुन, स्थानिक प्राधिकरणामध्ये अशा महिलांची संख्या ३३ टक्के असावे असे आरक्षण दिले व आपल्याकडे २७ महिला निवडुन आल्या आहेत. एवढेच काय तर पुरुषांच्या वॉर्डमध्ये सुध्दा महिला मोठ्या दिमाखाने आणि डौलाने निवडुन आल्या आणि पुरुषांचा पराभव केलेला आहे. अशा महिलांची मर्दुनकी म्हणजे खर त्यांना शाबासकी दिली पाहिजे. ३३ महापालिकेमध्ये नगरसेविका असतांना आपण त्यांना जास्तीत जास्त प्रतिनीधीत्व देण्याचे प्रयत्न केला. पाहिजे. लोकशाही प्रक्रियेमध्ये कधीही प्रतिनिधीत्व देण्यासाठी कमी लेखले जात नाही. उलट जास्त लेखले जाते. आणि आपण उदार मताचे असल्याने आपण जे काही दान करण्याची भुमिका ठेवता त्या दानामध्ये या कायद्याची सुध्दा तरतुद आपल्या आणखिन कामामध्ये आलेली आहे म्हणजे तुम्हाला कोणी विचारणार ही नाही की, आपण दान केले आणि कायद्याची तरतुद नसतांना तुम्ही हे दान कसे केले ते विचारणार नाही. तर कायद्याची बाब अशी आहे की, ३० (७) नुसार या समितीचे पुर्नगठीत करण्याचे अधिकार हे महापालिकेस म्हणजे महासभेला आहेत. आणि पुर्नगठित करतांना त्याचे संख्याबळ ठरविण्याचे अधिकार हे महासभेला आहेत. आणि म्हणुन आज महासभेपुढे आपल्या समोर असा ठराव आलेला आहे की, या सदस्यांची संख्या ही २१ असावी अशाप्रकारचा ठराव दिलेला आहे. सुचक झालेले आहे. अनुमोदन दिले आहे. या ठरावावर आपल्याला कार्यवाही करायची आहे. जो गोषवारा प्रशासनाने दिलेला आहे त्या गोषवाऱ्याबाबत नगरसचिवांनी या ठिकाणी सांगावे की, ९ सदस्य कायदेशीर संख्या असु शकते किंवा त्याच्यापेक्षा कमी असु शकते पण जास्त असु शकत नाही आणि सभागृहाचा जो अधिकार आहे की, ३० (७) अन्वये पुर्वी केलेला कुठलाही ठराव किंवा पुर्वी गठीत केलेल्या समितीचे कधीही विर्सजन करु शकतो. त्या समितीची पुर्नरचना करु शकतो.  त्या कायद्याच्या आधारे हा ठराव आणलेला आहे.

**जयंत पाटील :-**

अध्यक्ष महाशय, सन्मा. नगरसेवक प्रफुल्ल पाटील साहेब, दानधर्मावर बरेच बोलले नवरात्रीचे दिवस आहेत. दानधर्म चालु आहे. आता कोण दान देतो व कोण घेतो. याची आम्हांला काही कल्पना नाही. परंतु, विषय दानधर्माचा नाही विषय नियमांचा आहे. आपण विषयपत्रिकेमध्ये नउ सदस्यांची नेमणुक करावी असा विषय आणलेला आहे. गेली अनेक वर्षे म्हणजे महापालिकेची पाच वर्षे  महिला बालकल्याण समितीची सदस्य संख्या नउ होती आणि त्याच्यानंतर जर तुम्हाला बदलायचे असेल तर त्याला आमची हरकत नाही. महिलांची संख्या वाढलेली आहे. त्यांना चांगल्याप्रकारे प्रतिनिधीत्व मिळाले. तर आमचे दुमत असण्याचे काहीच कारण नाही. प्रश्न असा आहे की, तुम्हांला सदस्य संख्या वाढविण्यासाठी पुन्हा ठराव पारित करुन मा. महासभेसमोर आणावा लागेल. कलम ३० चे (२) जर आपण पहिले तर महानगरपालिकेच्या सभेत उपस्थित असलेल्या व मत देणाऱ्या पालिका सदस्यांपैकी कमीत कमी दोन तृतीयांश, पालिका सदस्यांनी मत देवून पारित केलेल्या विशिष्ट ठरावाव्दारे विशेष समित्यांचे कामकाज निश्चित करता येईल. हे तुम्हांला कामकाजाचे क्षेत्र निश्चित करता येईल. आणि त्याप्रमाणे तुम्हाला १५ सदस्य निवडावे लागतील. सदस्य मान्य करावे लागतील. आपण म्हणता त्याप्रमाणे हा विषय पुढच्या वर्षी तरी घ्या. जर सर्व सदस्यांचे असेच मत असेल तर हा विषय पुढच्या सभेमध्ये घ्या आणि त्याप्रमाणे १५ सदस्यांनी नियुक्ती करा.

**प्रफुल्ल पाटील :-**

आमचे मित्र सन्मा. सदस्य जयंत पाटील बोलतात. आजच्या मा. महासभेसमोर विषय काय आहे की, नउ सदस्य निवडून द्यायचे असा विषय आजच्या महासभेसमोर आहे का?

**जयंत पाटील :-**

विषय आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

विषयपत्रिकेवरील विषय नगरसचिवांनी वाचावे.

(नगरसचिवांनी विषयपत्रिकेचे पुन्हा सभागृहासमोर वाचन केले.)

प्रकरण क्र. ०४ मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३० (१) चे तरतुदीनुसार महिला व बालकल्याण समिती गठीत करणेबाबत.

**चंद्रकांत वैती :-**

सन्मा. सभागृहाला विनंती करतो की, सभा सुरु होताना सन्मा. सदस्या नयना (ताई) म्हात्रे यांनी ठराव मांडला की, या देशाचे राष्ट्रपती पदाचा बहूमान एका महिलेला मिळालेला आहे. मिरा भाईंदरमध्ये २७ महिला रिझर्व्हेशननुसार निवडून आल्या त्या व्यतिरिक्त ६ महिला ह्या ओपन वॉर्डातून निवडून आलेल्या आहेत. महिलांचे एवढे मोठे प्राबल्य असताना आपल्या महापालिकेमध्ये आपण जो आधार घेतो तो कसला, तर उपविधीचा ही उपविधी कधी पारित झाली तर प्रशासकीय कार्यकाळ असताना १९४९ च्या तरतुदीनुसार आपण पाहिले तर हा महासभेचा अधिकार आहे, महासभेमध्ये त्या आशयाचा ठराव झालेला आहे. या ठरावाला कुठच्याही प्रकारचा दुसरा पॅरेलल ठराव आलेला नाही. त्याच्यामुळे हाच ठराव कायम करावा आणि आत्ताच ही संख्या निश्चित करुन आपण कॅल्क्युलेशन दयावे आणि सचिव महोदय, सभागृहाला आपण सुचना कराव्यात की कॅल्क्युलेशनमध्ये किती, कोणाचे तौलानिक संख्या होते? ती तौलानिक संख्या सांगावी आणि त्यापद्धतीने नाव घ्यावीत त्याला पुढच्या सभेची वाट बघण्याचे काही कारण नाही. हा ठराव होत आहे तो ठराव काय चुकीचा नाही. आपला विषय असा आहे की, महिला व बालकल्याण समिती गठीत करणे. गोषवाऱ्यात तुम्ही काय दिलेले आहे. तुम्ही नउ सदस्यच का लिहिता. ही वैधानिक समिती आहे. ह्या समितीला त्याचे अधिकार आहेत. ही तदर्थ समिती नाही. ही स्टॅटयूटरी कमिटी आहे आणि त्याला पुर्ण अधिकार आहेत त्याच्यामुळे त्यांना त्या कमिटीवर योग्य महिलांचे संख्याबळ देणे हे क्रमप्राप्त आहे आणि गरजेचे आहे व कायदेशीर आहे. ठराव ही पारित झालेला आहे त्याच्यामुळे कोणाला आडेवाट घेण्याचे कारण नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, ही समिती मधल्या काळामध्ये विर्सजन करता येते. असा उल्लेख सन्मा. सदस्य चंद्रकांत वैती साहेबांनी केला. ही समिती कोण विर्सजन करु शकतो. त्याचा उल्लेख नियमामध्ये कुठेही नाही.

**चंद्रकांत वैती :-**

कायदा नीट वाचा.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

कुठल्याही ठरावाला ज्या महासभेत आपणाला संख्याबळ वाढवायचे आहे. तर दोन तृतीयांश नविन ठराव पाहिजे. जेव्हा आपण कोकण विभागाच्या आयुक्तांकडे पत्र पाठवलेले आहे त्याच्यामध्ये शेवटी ही संख्याबळ नियुक्त करा, असा क्लिअर उल्लेख सचिवांनी केला आहे. जर आपण वाचले की, वरील प्रत्येक गटाच्या संख्येच्या तौलानिक संख्याबळानुसार आधारे जतन पक्ष निहाय खालील नेमणुक करणारे प्रस्ताविक आहेत. म्हणजे कोकण विभागीय आयुक्तांनी ही संख्या दिलेली आहे. त्यांनी त्याच्यामध्ये जर उल्लेख केला असता की ह्याच्यामध्ये फेरफार करता येतो. शेवटी शासनाने जो जी.आर. काढलेला आहे त्या जी.आर. नुसार ठाणे महानगरपालिकेमध्ये ही संख्या ९ आहे. माझ्या माहितीप्रमाणे तिथे नगरसेवकांची संख्या जास्त आहे तरी तिथे नउ सदस्य आहे. म्हणून जरी आमचे सन्मा. काँग्रेस पक्षाचे असे मत असेल की, संख्याबळ जास्त झाले पाहिजे. ह्याच्यात कोणाचेही दुमत नाही. एकतर हा विषय पुढच्या मा. महासभेत घ्यावा आणि जर तुम्हांला असे वाटते की हे ॲड केले पाहिजे. तर दोन तृतीयांश पक्षाचे मतदान झाले पाहिजे ते शक्य होणार नाही. म्हणून आपण महिलांवर अन्याय करु नका आणि एका वर्षासाठी नउ सदस्यांची निवड करण्याची कार्यवाही करावी.

**नयना म्हात्रे :-**

मा. महापौर साहेब, महिला व बालकल्याण समितीमध्ये जास्तीत जास्त महिला निवडून आल्या तर या मिरा भाईंदर शहराचा इतिहास घडवतील असा मला महिलांबद्दल गर्व आहे. हा आजच्या सभेचा विषय आहे आणि आजच्याच सभेला हा विषय आटपून घ्यावा. आम्ही पुढच्या मिटींगची वाट बघणार नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहेब, आज महिलांबद्दल ही आपुलकी आलेली आहे आणि ज्यावेळी जे सत्तेत होते त्यावेळी भारतीय जनता पक्षाची एक महिला त्या बालकल्याण समितीमध्ये घेतली नाही तेव्हा त्यांना महिलांची आठवण आली नाही. आज विरोधी पक्षामध्ये बसून त्यांना महिलांची आठवण येते. म्हणून सर्वांनी कधी सत्तेवर यावे पक्षविरोधीवर जाउ नये. याचे भान ठेवावे. आम्हांला महिला महिला म्हणून सांगायला नको.

**नयना म्हात्रे :-**

मा. महापौर साहेब हे माझ्यावर आरोप करत आहेत.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

तुमच्यावर आरोप करत नाही. जे कोणी सत्तेवर होते त्यावेळी महिला व बालकल्याण समितीमध्ये आमच्या पक्षाची महिला घेतली नाही.

**नयना म्हात्रे :-**

सन्मा. सदस्य मिलन पाटील ह्याच्या जोडीला भानगडया करुन गेले पाच वर्षे महेंद्रसिंग चौहाण यांच्या जोडीला भांडण केले आणि आता सत्तेच्या गोष्टी करतात.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

सन्मा. सदस्य चंद्रकांत वैती हे त्यावेळेला उपमहापौर होते त्यावेळी त्यांना महिलांची आठवण आली नाही का, त्यांच्या सन्मानाची आठवण आली नाही का? म्हणून सन्मान आणि असन्मान किंवा अपमान हे शब्द इथे वापरू नये. फक्त मा. महापौरांनी आपल्या अधिकाराचा वापर करावा आणि नउ समिती सदस्यांच्या पदाची घोषणा करावी.

**नयना म्हात्रे :-**

मा. महापौरांना विनंती आहे की, जे कायदयामध्ये आहे तेच आपण करा.

**चंद्रकांत वैती :-**

सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवालजी आपण कुठे बसला आहात त्याची जाणीव आपल्याला असेल. आपल्याला विरोध कुठे होता. आत्ताच्या निवेदनामध्ये आपण सांगितले की, कोकण आयुक्तांकडून नउची फिगर दिलेली आहे. सचिव साहेब, आयुक्त साहेब, आपण या गोष्टीचा खुलासा करावा की, कोकण आयुक्तांकडून ९ ची संख्या पाठवली कारण नुकतेच आमच्या मित्रांनी सांगितले की आम्हांला कोकण आयुक्तांकडून ही ९ ची फिगर आलेली आहे तर हे फिगर ठरवण्याचे काम माझ्या माहितीप्रमाणे सचिव कार्यालयातून करण्यात आलेले आहे. कोकण आयुक्तांकडे फक्त तौलानिक संख्या काय आहे? तेवढीच पाठवलेली आहे. तर कोकण आयुक्तांकडून ९ ची संख्या काय आहे तेवढीच पाठवलेली आहे. कोकण आयुक्तांकडून ९ ची संख्या आली आहे किंवा काय, आयुक्त साहेब आपण याबाबतीत सभागृहासमोर खुलासा करावा.

**प्रफुल्ल पाटील :-**

सचिव गोषवारा देतात. सचिवांनी कायदयाची तरतुद काय आहे ती सांगितली पाहिजे. बरेचसे नगरसेवक नविन आहेत काही जुने आहेत. जुने आहेत ते काही चुकीचा अर्थ लावता तर काही बरोबर अर्थ लावता. सचिवांनी याठिकाणी सांगितले पाहिजे की, हा मा. महासभेचा अधिकार आहे की नाही. ही समिती गठीत करताना संख्याबळ ठरविण्याचे अधिकार कोणाचे आहेत आणि कशाप्रकारे आहेत. जर त्यांनी सांगितले तर अधिक जास्त होईल. कारण त्यांनी गोषवारा देवून सगळ्यांना दिशाहीन करुन ठेवले. त्यांनी असे म्हणायला पाहिजे होते की ९ संख्या होती पण तो किती आणि कधी ठरविण्याचा अधिकार मा. महासभेचा आहे. त्यांनी हे सरळ स्पष्ट म्हणायला पाहिजे आणि अजूनही त्यांनी म्हणावे.

**एस. ए. खान :-**

सचिव साहेब खरं काय आहे ते आपण सांगा.

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर महोदय, आपण हा जो विषय आणला आहे तो कायदयाची पूर्ण शहानिशा केल्यानंतर हा विषय आणलेला आहे. सभागृहाला आमच्यावतीने जो ठराव दिलेला आहे त्यावर आपली बरीचशी चर्चा झाली. सन्मा. सदस्य जयंत (दादा) पाटील बोलले. प्रशासनाच्यावतीने प्रत्येक गोषवारे आणि फिगर्स त्यांच्यातली सत्यता काय असते, खरेपणा काय असतो हे आपण गेल्या पाच वर्षामध्ये बघितलेले आहे. सचिवांनी दिलेला गोषवारा हा शंभर टक्के, शंभर रुपयाच्या नोटाप्रमाणे करकरीत आणि व्यवस्थित असतो ह्याचे अगदी काही प्रमाण नाही. मिनिटस येतात त्यासुद्धा आपण बघितलेल्या आहेत. अनेक चुका असतात. फिगर्स, बजेट आम्ही हा जो प्रस्ताव आणलेला आहे हा अगदी पुर्णपणे ठणठणीत प्रस्ताव आहे. कायदयाचा संपूर्ण कीस पाडून त्याच्यावर दोन-तीन दिवस बैठका घेउन आम्ही सर्व काय व्यवस्थित आणलेला आहे. हा ठराव आपल्याकडे अगदी व्यवस्थित आणलेला आहे. आपण हे चांगले आणि उदारमताने पास करावा या उद्देशाने आणला होता. आपण त्याच्यावर ही जी चर्चा घडवून आणली पण मला मनोमन खात्री वाटते की हा ठराव अगदी व्यवस्थित आणि सुस्थितीत, कायदेशीररित्या असल्याकारणाने हा ठराव आपण या सभागृहात आजच्या तारखेला मतदानाला घ्यावा अशी आम्ही मागणी करत आहोत. आमच्या चार नगरसेवकांची मतदानाची मागणी आहे.

**मिलन पाटील :-**

मा. महापौर साहेबांच्या परवानगीने बोलत आहे की, सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे साहेब, हे कायदयाचे पुस्तक जणू काय त्यांनीच छापलेले आहे. हा ठणठणीत ठराव आहे आणि तो पास झालाच पाहिजे. कायदयाचे पुस्तक त्यांनी छापले आहे का? कलम ३०(२) बघा. नियमाप्रमाणे तुम्ही बघा.

**शशिकांत भोईर :-**

मा. महापौर साहेब, सचिवांनी ह्याचा खुलासा करावा.

**चंद्रकांत वैती :-**

सचिव साहेब, मतदानाची मागणी करण्यांत आलेली आहे. कृपया दरवाजे ताबडतोब बंद करण्यांत यावे.

**एस. ए. खान :-**

सचिव साहेब, दरवाजे ताबडतोब बंद करण्यांत यावे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

सचिव साहेब, एका बाजूला सन्मा. नगरसेवक चंद्रकांत वैती साहेब सांगतात की, महापालिकेच्या सभागृहाला हा अधिकार आहे. तर सभागृहाचा अधिकार केव्हा असतो, एकतर विषयपटलावर मा. महापौरांनी विषय आणला असता आणि त्याच्यावर चर्चा घडून मग मतदान झाले असते. हा विषयच नाही आणि कोण कुठल्यावेळी ठराव ठेवणार ते मान्य होत नाही. महापौरांना आमचा आग्रह आहे की जर त्यांना तेच पाहिजे तर हा ठराव पुढच्या महासभेमध्ये रितसर आणावा अन्यथा महापौरांनी आजच्या अजेंडयावरची कार्यवाही सुरु करावी. सर्व समिती सदस्यांची संख्याबळ मागवून समिती गठीत करावी अशी आम्ही आपल्याला सुचना करीत आहे.

**चंद्रकांत वैती :-**

सन्मा. सदस्य आपण असे कसे सांगता. हा सभागृहाचा विषय नाही. आपण विषय वाचा. विषयामध्ये काय लिहिले आहे ते वाचा. महिला व बालकल्याण समिती गठीत करणे असा विषय लिहिलेला आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

विषय पत्रिकेत सदस्य गठीत करणे व त्यामध्ये संख्या वाढवणे असे काहीही दिलेले नाही. आपण सांगता तसा विषय विषयपत्रिकेवर नाही.

**चंद्रकांत म्हात्रे :-**

सन्मा. सदस्य महिला व बालकल्याण समिती गठीत करणेबद्दलचा विषय आहे. संख्याबळचे वाचन करा.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहेब, संख्याबळ कमी करावे असे कुठल्याही विषयपत्रिकेमध्ये विषय नाही.

**प्रेमनाथ पाटील :-**

सचिवजी आम्ही मतदानाची मागणी केली आहे त्याप्रमाणे आपण मतदान जाहिर करा ना.

**एस. ए. खान :-**

सचिव साहेब मतदान घ्या.

**निर्मला सावळे :-**

सचिवांनी मतदानाला विषय घ्यावा.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य आपण एकेकाने बोला.

**एस. ए. खान :-**

आम्ही मतदानाची मागणी केली आहे आपण मतदान प्रक्रीयेला सुरुवात करा.

**नयना म्हात्रे :-**

मा. श्रीम. सोनिया गांधीजी देश चालवतात. मा. श्रीम. मायावतीजी देश चालवता. महिला राष्ट्रपती देश चालवतात आणि मिरा भाईंदरमध्ये एवढा विरोध हे चालले काय? आपण हा विषय मतदानाला घ्या.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

सन्मा. नगरसेविका नयना म्हात्रेजी आपण ह्या सभागृहामध्ये होता.

(सभागृहात गोंधळ)

**चंद्रकांत म्हात्रे :-**

मा. महापौर साहेब, मतदानाची मागणी केलेली आहे आपण सभागृहाचे दरवाजे बंद करा आणि मतदानाला सुरुवात करा.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. महापौर महोदय, प्रशासनाला हे गंमत वाटते का? इथे पक्ष भांडताहेत आणि प्रशासन गंमत बघते. सचिवजी आपण खुलासा करायला पाहिजे होता तर आपण अजून खुलासा का केला नाही. त्याशिवाय ही चर्चा थोडीच बंद होईल.

**नगरसचिव :-**

ही उपविधी आहे. महिला व बालकल्याण समितीसाठी जी उपविधी केली होती. महिला व बालकल्याण समितीमध्ये ९ पालिका सदस्यांची निवड होईल असे आहे आणि पुढे नियम २(अ) आणि १७ खंड (अ) मध्ये खालील महापालिकेच्या अधिकारात बाधा न आणता महापालिकेचा वेळोवेळी ठराव करुन विशेष समितीवर पालिका सदस्य नेमता येतील. किंवा तत्सम ठरावाने त्यांना काढून टाकतील अशी तरतुद आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

हा विषय नाही. मग ठराव कुठला येणार आहे. हा ठराव ही नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

विषयपत्रिकेवर फक्त ९ सदस्यांचा विषय आहे. गोषवाऱ्यामध्ये ९ सदस्य आहेत आणि हे १५ सदस्य सांगतात असे होउ शकते का?

**जयंत पाटील :-**

आपण वेळेवर सदस्य संख्या वाढवू शकता का? हा महत्त्वाचा प्रश्न आहे. प्रश्न असा आहे की तुम्ही विषयपत्रिकेमध्ये व सदस्यांची नेमणुक करावी.

**याकुब कुरेशी :-**

त्याच्यामध्ये तशी तरतुद आहे.

**जयंत पाटील :-**

सभा भावनेवर चालत नाही. राष्ट्रपती कोण आहे? श्री. झेळसिंग राष्ट्रपती होते म्हणून येथे काय सर्वच सरदार नव्हते. प्रश्न असा आहे की, नियमानुसार तुम्हाला सभा चालवावी लागेल. आपण विषयपत्रिकेमध्ये ९ सदस्यांची नेमणुक करावी असे जर आपण येथे लिहिता आणि वेळेवर कोणी सांगितले की तुम्ही २० सदस्य करा. आमच्याकडे बरीच समीकरण बदललेली आहेत. काही लोकांची स्वप्न वेगळी होती. त्या स्वप्नांचा चक्काचुर झालेला आहे आणि त्याच्यामुळे वाढलेली संख्या कुठेतरी ॲडजेस्ट करायची, कुठेतरी बसवायची म्हणून ही सगळी गणित चालू आहेत. हे काय आता लपून राहिलेले नाही. मा. श्रीम. प्रतिभाताई तिथे राष्ट्रपती आहेत म्हणून इथल्या सगळ्या महिलांना तिथे बसवा ना. महापौरांना बसवा. आम्ही कुठे नाही म्हणून सांगतो. या संयुक्त आघाडीने महापौरांसाठी महिलेचे नाव का दिले नाही तर दयायला पाहिजे होते. पुरुषांचे का दिले? आम्हांला मान्य आहे. महिलांबद्दल आम्हाला जबरदस्त आदर आहे. आम्ही म्हणतो १५ नाहीतर २० अशी संख्या करा. पण तुम्हांला नियमाप्रमाणे जावे लागेल.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आणि भारतीय जनता पक्षाने तर राष्ट्रीय कार्यकारणीने आम्ही प्रस्ताव पास केला होता.

**जयंत पाटील :-**

कसा ही चुकीचा ठराव करा आणि कोणीतरी सांगते, दरवाजे लावा आणि दरवाजे बंद करा. गेली अनेक वर्षे आम्ही या सभागृहात आहोत. अशातऱ्हेचे ठराव होत नाही. तुमचा नियम काय म्हणतो, समिती गठित झालेली आहे. ३० (२) मध्ये काय आहे तेही वाचा ना. तुम्हांला त्यानुसार पुन्हा सदस्य संख्या वाढवायची असेल तर पुन्हा ठरावामध्ये दोन तृतीयांश पारित करुन सदस्य संख्या वाढवा. आम्ही म्हणतो २० संख्या करा. आम्हांला मान्य आहे. परंतु, आपण ते सर्व नियमानुसार करा.

**प्रफुल्ल पाटील :-**

सभागृहामध्ये सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवालजींनी दोन गोष्टी केल्या. महिलांची संख्या वाढविणेबद्दल त्यांना काही ऑब्जेक्शन नाही. दुसरे त्यांनी असे म्हटले की, महानगरपालिकेला कुठे अधिकार आहेत. कलम ३० चा (७) वाचून दाखवितो.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महासभेला अधिकार नाही. मा. महासभेमध्ये तसा प्रस्ताव आला पाहिजे. जेवढे अधिकार मा. महासभेला आहेत तेवढे अधिकार कोणालाही नाही.

**प्रफुल्ल पाटील :-**

म्हणजे तुम्ही हे मानता की, मा. महासभेला हे अधिकार आहेत.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

पण त्यापद्धतीने तसा ठराव मा. महासभेत आला पाहिजे. सभेत तशी चर्चा झाली पाहिजे. आज ९ सदस्यांच्या नेमणुकीचा प्रस्ताव आलेला आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

मला मघाशी तसे ऐकायला आले होते. आता तुम्ही बरोबर सांगितले. ते सांगतात मा. महासभेला अधिकार आहे. कलम ३० चा (७) वाचतो. महानगरपालिकेस कोणत्याही वेळी विशेष समित्यांचे विर्सजन करता येईल. दुसरा विर्सजन म्हणजे हा विर्सजनाचा भाग झाला. म्हणजे आता विर्सजित झालेले आहे. नविन समिती नाही किंवा तिच्या रचनेत फेरफार करता येईल. गठीत करणे ह्याचा अर्थ काय आहे तर रचना करणे. दोन्हींचे इंग्रजीमधले वर्जन काय, कॉन्सीटयुशन जेव्हा गठीत करणे, रचना करणे, ह्याचा अर्थ ह्याचा अधिकार जेव्हा मा. महासभेला, महापालिकेला दिलेला आहे. जेव्हा ३०(१) (अ) च्या आणि कलम ३०(७) च्या अनुषंगाने ही सदस्य संख्या ठरविण्याचे अधिकार हे मा. महासभेचे आहेत. सन्मा. सदस्य मिलन पाटील साहेबांनी असे सांगितले की, ३० चे (२) वाचा. त्यांनी वाचलेच नाही आणि ३० चे (२) वाचा म्हणून सांगितले. ते मी वाचून दाखवितो. महानगरपालिकेस तिच्या सभेत उपस्थित असलेल्या व मत देणाऱ्या पालिका सदस्यांपैकी कमीत कमी दोन तृतीयांश पालिका सदस्यांनी मत देवून पारित केलेल्या विशिष्ट ठरावाव्दारे प्रत्येक विशेष समितीच्या कामकाजाचे क्षेत्र निश्चित करता येईल. कामकाजाचे क्षेत्र, सदस्य संख्या ९ आहे आणि अशा कोणत्याही

क्षेत्रात समाविष्ट केलेल्या सर्व बाबी व प्रश्न प्रथमतः समोचित समितीपुढे ठेवले पाहिजे व ते अशा समितीच्या शिफारशीसह महानगरपालिकेस सादर केले पाहिजे. असे निर्देश देता येईल. तसेच, महानगरपालिकेस तशा ठरावाव्दारे आपले अधिकार व कर्तव्ये यापैकी कोणते अधिकार व कर्तव्ये विनिदेश केलेल्या विशेष समित्यांकडे प्रत्यायोजित करता येतील. आता सन्मा. सदस्य मिलन पाटील यांनी सांगावे की येथे कुठे सदस्य संख्या ठरविण्याचा विषय आहे. येथे कायदेक्षेत्र, तुमचे कामकाज क्षेत्र तुम्हांला मिरा भाईंदरच्या बाहेर जावून पण काय करायचे असेल. तुम्हांला एखादया महिला व बालकल्याण समितीच्या अधिकार व कर्तव्यामध्ये वाढ करायची असेल तर ते तुम्हांला करता येईल म्हणून हा जो ठराव मांडलेला हा तंत्र शुद्ध ठराव आहे. प्रारुप नियमामध्ये स्पष्ट म्हटलेले आहे की ९ सदस्य असतील परंतु तसा बदल करण्याचा अधिकार हा महानगरपालिकेचा आहे. मा. महापौर साहेबांच्या माहितीसाठी सांगतो, ही जी माहिती आता मी तुम्हांला देत आहे. ती तुमच्या संपूर्ण कालावधीकरिता कामाला येईल. जेव्हा कोणी तुम्हांला नियमांच्या बाबतीत बोलेल. हे प्रारुप नियम आहेत. नगरसचिवांना मी एक प्रश्न विचारतो की, जे प्रारुप नियम आपण आता वाचले त्याला अंतिम मंजूरी मिळाली नाही का?

**नगरसचिव :-**

नाही.

**प्रफुल्ल पाटील :-**

प्रारुप नियम मंजूर झालेले नाही. जरी प्रारुप नियमांचा आधार घेतला तरी महापालिकेच्या मा. महासभेच्या अधिकाराचा हा विषय आहे आणि म्हणून तुम्हांला ही माहिती देतो. जर कधी काय नियमामध्ये अंतर्भूत केले असेल पण नियमापेक्षा वेगळे हे ॲक्टमध्ये आहे तर नियमातल्या सगळ्या गोष्टी चुकीच्या तर त्याच्या विरुद्ध कुठलाही नियम टिकू शकत नाही. हे आपण ह्याच्यापुढे ध्यानात ठेवा. त्याच्यामुळे ॲक्टमध्ये मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम ३०(७) मध्ये जेव्हा असे स्पष्ट लिहिलेले आहे की तिच्या रचनेमध्ये फेरफार करण्याचा बदल करण्याचा अधिकार मा. महासभेला आहे. तेव्हा नियमांमध्ये काहीही जरी असले तरी ते त्याला लागू होत नाही म्हणून हा ठराव आणलेला आहे. या ठरावावर मतदान घ्यावे. अशाप्रकारे चार सदस्यांनी उठून मागणी केलेली आहे. आपण त्याच्यावर मतदान घ्या. अन्यथा जर समोरच्या गटाला असे वाटते की, त्यांना असा ठराव आहे तर तो त्यांनी मांडावा. आम्हांला त्याच्याबद्दल काही वाद नाही. येथे कोणाला मान देण्याचा, सन्मान देण्याचा विषय नाही. आम्ही जो ठराव मांडला आहे त्याच्यामध्ये कुठे भावना आल्या आहेत का, ते बघा. ठरावात सगळे कलमच आलेले आहेत. कलमाच्या व्यतिरिक्त काय आलेले नाही. रोप, मूळ आणि झाडं ही आले नाहीत. नुसती कलम आलेली आहेत.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. महापौर साहेब, सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील साहेब असे बोलले की महानगरपालिकेस कोणत्याही वेळी विशेष समितीचे विर्सजन करता येईल. परंतु ती विशेष नाही मग हा फेरफार कसा करणार. आमचा विरोध नाही. परंतु, तुम्ही रितसर विषय आणा. ९ सदस्यांऐवजी १५ सदस्य करा आणि त्याच्यानंतर हे घ्या.

**प्रफुल्ल पाटील :-**

म्हणूनच सचिवांनी याठिकाणी सांगावे, गठीत करणे हा विषय काय आहे? गठीत करणे म्हणजे रचना करणे, असा होतो की नाही. गठीत करणे म्हणजे त्याची सदस्य संख्या किती असावी हे ठरवायचे की नाही.

**मिलन म्हात्रे :-**

सचिव साहेब, होय किंवा नाही असे व्यवस्थित बोला. हादरवेळेला सभागृहातला शिरस्त आहे. एखादे मतदान आले की, वेळ काढायचा आणि माणसं जमा करायची आणि मग शेवटी मतदान घ्यायचं. दरवाजे बंद करा. मतदानाची मागणी केलेली आहे.

**एस. ए. खान :-**

आम्ही चार लोकांनी मतदानाची मागणी केलेली आहे. आपण मतदानाला सुरुवात करा.

**मिलन म्हात्रे :-**

आयुक्त साहेब, आपण मतदानाला सुरुवात करा आणि जर त्यांना ठराव मंजूर नसेल तर आम्ही मंजूर केलेल्या ठरावात ते अपील करतील. आयुक्त स्टेंट गर्व्हमेंटकडे अपीलाकरिता पाठवतील आणि ठराव रद्द करण्याचे ते तरतुद करतील.

**नयना म्हात्रे :-**

मा. महापौर साहेब, सन्मा. सदस्य जयंत पाटील साहेब असे बोलले की....

(सभागृहात गोंधळ)

**मिलन पाटील :-**

सन्मा. महापौर साहेब दोन सदस्यांनी बोलायचे की दहा सदस्यांनी बोलायचे.

(सभागृहात गोंधळ)

**चंद्रकांत वैती :-**

सन्मा. सभागृह एवढे आमच्या मित्रांना काही गांगरून जाण्याचे कारण नाही. सभागृहासमोर ठराव मांडलेला आहे. मतदानाची मागणी केलेली आहे.एवढे कशाला गांगरून जायचे? आणि फार मोठया मोठया गोष्टी करायची गरज काय आहे, आपण हा विषय समजून घ्या आणि या विषयावर मतदानाला सुरुवात करावी.

**चंद्रकांत म्हात्रे :-**

मा. महापौर साहेब, हा खेळ चालला आहे का? एवढया वेळेपासून काय चाललेले आहे. मतदानाची मागणी केलेली आहे त्याप्रमाणे आपण कामकाजाला सुरुवात करावी.

**नयना म्हात्रे :-**

मा. महापौर साहेब, आता सन्मा. सदस्य जयंत पाटील साहेब असे बोलले की जे राष्ट्रपती वगैरे काढून दाखविले तर महिलांना यंदा महापौरांना संधी का दिली नाही, पण आम्ही महिला हुशार आहोत २००२ नंतर लगातार दोन वेळा महापौर महिला बनल्या. आम्ही महिलांनी विचार केला की आता पुरुषांना ही संधी दयावी. आम्ही महिला एवढया गद्दार नाही.

(सभागृहात गोंधळ)

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य मिलन पाटील साहेब, आपण खाली बसा. सन्मा. सभागृहाची भावना लक्षात घेउन आपण गोषवारा दिला होता की नउ सदस्यांची समिती गठीत करावी असा आपल्याला गोषवारा दिला होता. सन्मा. सभागृहाची भावना लक्षात घेउन परत हा पूर्ण विषय पुढच्या सभेमध्ये रितसर आणून त्याच्यावर...

**चंद्रकांत वैती :-**

मा. महासभेला पुर्ण अधिकार आहेत आणि मा. महासभेमध्ये ठराव झाला की मतदानाची मागणी केलेली आहे. आपण असे कसे बोलता?

**एस. ए. खान :-**

मा. महापौर साहेब, मतदानाची मागणी केलेली आहे.

**शशिकांत भोईर :-**

सचिव साहेब आम्ही मतदानाची मागणी केलेली आहे आपण मतदान घ्यावे

**प्रफुल्ल पाटील :-**

निवडणुकीचा निकाल असतो. रुलिंग नसते. सचिव साहेब, आपण या गोष्टी स्पष्ट करा की, निवडणुकीचा असा प्रोग्राम तुम्हांला पुढे ढकलता येतो का?

**नगरसचिव :-**

नाही.

**प्रेमनाथ पाटील :-**

सचिव साहेब, मग आपण मतदान घ्या ना.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहेब, आपण आजच्या अजेंड्याप्रमाणे ९ लोकांची घोषणा करावी आमच्या पक्षाची नावे देत आहोत.

**लक्ष्मण जंगम :-**

सभागृहाच्या नियमांचे पालन करावे व विषय मतदानाला घ्यावा.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

विषयपत्रिकेप्रमाणे आपण ९ लोकांची नावे जाहिर करावी आणि आजचा हा विषय त्वरित पूर्ण करावा. अशी आमची विनंती आहे व ह्यांची जर एवढीच भावना असेल की ही संख्या वाढवावी तर हा विषय पुढच्या मा. महासभेत ह्यांच्या सुचनेसह आपण घ्यावा. त्याला आमची मान्यता आहे. नाहीतर आजच्या आज नावे डिक्लेर करावीत.

**निर्मला सावळे :-**

सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवालजी महिला व बालकल्याण समितीवर जर जास्त महिला गेल्या तर पूर्ण शहरामधील महिला व बालकल्याण हे सुदृढ, निरोगी होतील व पूर्ण शहराचा विकास होईल. याला आपण विरोध केला म्हणजे महिलांच्या या कामाकरिता कमिटीवर जाण्याचा विरोध आहे. पाच वर्षे महिलांनी सभागृह चालवून दाखविले आहे. आपण आपला विरोध नोंदवत आहात.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

माजी महापौर मॅडम, आपल्याला असे बोलण्याचा अधिकार नाही.

**हेलन गोविंद :-**

सन्मा. सदस्या निर्मला सावळे मॅडम, आपण गेली अडीच वर्षे व्यासपिठावर होत्या तेव्हा तुम्हाला महिलांची संख्या वाढवावी याबाबत आठवण झाली नाही का? आम्हांला मान्य आहे की, महिलांची संख्या वाढली पाहिजे मग तेव्हा तुम्ही आवाज का उठविला नाही?

**निर्मला सावळे :-**

नियम आता आलेले आहे व कायदयानुसार आपण कमिटी गठीत करित आहोत.

**मिलन पाटील :-**

मा. महापौर साहेब, महिलांचा आदर फक्त राष्ट्रवादीच करु शकते. राष्ट्रवादीने दोन्ही महिला महापौर दिल्या.

**निर्मला सावळे :-**

कायदयामध्ये तरतुद होती म्हणून तुम्ही दिले होते. तुम्ही एवढे उदारमताचे नाही. कायदयामध्ये तरतुद होती म्हणून महिला महापौर झाल्या.

**चंद्रकांत म्हात्रे :-**

मा. महापौर साहेब, सन्मा. सदस्य बोलतात की महिलांचा आदर राष्ट्रवादी करु शकते. मग आपण ह्याला विरोध का करता?

**एस. ए. खान :-**

आपला स्वार्थ आला की, लोकशाही आहे. नाहीतर, मग सगळे गेले.

(सभागृहात गोंधळ)

**निर्मला सावळे :-**

सचिव साहेब, मतदानाला उशीर का होत आहे?

**चंद्रकांत म्हात्रे :-**

अध्यक्ष महोदय हे काय चालले आहे. हा खेळ चालला आहे का?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

सन्मा. सदस्य चंद्रकांत म्हात्रे साहेब, हा खेळ आधी पण चालत होता.

**मधुसुदन पुरोहित :-**

मा. महापौर साहेब, सचिव साहेब, मला वाटते या नियमाबद्दल आपल्याला भरपूर काही माहिती असेल, मला वाटते की, अर्धा तास एक तास झाला लोक आपआपल्या विषयाबद्दल नियमाबद्दल आपल्याला सांगत आहेत. पण मला असे वाटते की, या नियमाबद्दल आपल्याला या सर्वांबद्दल आणि या लेखीमध्ये जे काय लिहिलेले आहे ह्याच्यात काय तरतुद असेल ह्याची माहिती आपल्याला असेल तर वेळ न घालवता याचा पर्याय काय आहे, याला उत्तर काय आहे हे देण्यासाठी मला वाटते तुम्ही वेळ न घेता लवकरात लवकर सांगावे अशी तुम्हांला नम्र विनंती आहे आणि जर कुठलाही नियम, कानून, कायदा आपल्याला माहित नसेल व त्याला तुम्हांला दहा वेळा विचारपूस करताना वेळ लागत असेल तर मला वाटते की, मतदान घेणे हे सर्वांत गरजेचे आहे. मतदान घेण्यास आपण सुरुवात करावे व पटकन मतदान घ्यावे असे माझे मत आहे.

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर साहेब, सकाळपासून अर्धा तास गेला ते नउ पदांकरिता पण आपण सर्वजण एका सभागृहात गेल्या पाच वर्षापासून होतो. अनेक कर्मचारी भरतीचे प्रस्ताव जेव्हा आले त्याच्यात १५-२० कर्मचाऱ्यांची पद वाढवून घेतली म्हणजे जर प्रशासनाने १० पद दिली आहेत तर नगरसेवकांनी सांगितले की आणखिन १० पद वाढवा, कोण बोलते १२ वाढवा अशी पद वाढली गेली. तो एक नियम आणि आता फक्त संख्येचा तुमच्या या गोषवाऱ्यामधल्या एका नउ या संख्येवर वाद चालला आहे. सन्मा. सदस्य जयंत (दादा) पाटील यांना मी सांगू इच्छितो की, त्यांनी ही काही पदे वाढवायला सांगितलेली आहे. त्याचे इतिवृत्तांत आहे.

**जयंत पाटील :-**

कुठली पद हे मला माहित नाही.

**मिलन म्हात्रे :-**

परिचारिकांचे पद, एका मुलीला कमिटीने काढून टाकले त्या मुलीकरिता ती मुर्धा गावातील मुलगी माझ्या वॉर्डमध्ये परिचारिका आहे. तिचे त्या लिस्टमध्ये नाव नव्हते आणि त्याबाबत आम्ही आपले अर्धा तास भाषण ऐकले आहे व तिथे नाव कळविण्यात यावे असे आपण सांगितले आपण जर प्रत्येक वेळी फिगर बदलता तर सगळ्या ठिकाणी नियम हा सारखाच पाहिजे.

**मिलन पाटील :-**

सन्मा. सदस्य जयंत (दादा) पाटील ह्यांनी जो आवाज उठविला होता. तो अन्याय विरुद्ध आवाज उठविला होता.

(सभागृहात गोंधळ)

**मधुसुदन पुरोहित :-**

मग आपण आज महिलांवर अन्याय कशाकरिता करत आहात. तुम्ही न्याय देण्यासाठी आहात तर आपण अन्याय करु नका.

**जयंत पाटील :-**

विषय काय चालू आहे आणि आपण कुठल्या कुठे विषय फरफटत नेत आहात.

**मिलन म्हात्रे :-**

संख्या बदलायची नाही हा विषय आहे. आपण नउ वर स्टिकअप आहात आम्ही २१ म्हणत आहोत. म्हणून तुम्हांला त्या ठरावाची आठवण करुन दिली.

**जयंत पाटील :-**

आम्ही २५ म्हणतो.

**मधुसुदन पुरोहित :-**

सचिव साहेबांनी वेळ न घालवता मतदानाच्या प्रक्रियेला सुरुवात करावी. या एका विषयाबद्दल भरपूर वेळ गेलेला आहे.

**जयंत पाटील :-**

सन्मा. नवनिर्वाचित सदस्य, आपल्याला माहित नसेल या सभागृहाची वेळ संध्याकाळी ७.०० वाजेपर्यंत आहे आणि आम्ही ७.०० वाजेपर्यंत सभा चालवलेली आहे. या शहराच्या विकासासाठी आपल्याला भरपूर चर्चा करायची आहे.

**मिलन म्हात्रे :-**

आपण सभागृहाचे दरवाजे बंद करा.

**मधुसुदन पुरोहित :-**

सचिवांनी लवकरात लवकर सांगावे की नियमाप्रमाणे ह्याच्यामध्ये काय तरतुद आहे. मतदान घेणे गरजेचे आहे. मतदानाची मागणी केलेली आहे. आपण वेळात वेळ कशाला घालवता?

**मिलन म्हात्रे :-**

मतदानाची मागणी केलेली आहे. मतदानाला सुरुवात करा.

**निर्मला सावळे :-**

सचिवांनी मतदानाला सुरुवात करा.

**मिलन पाटील :-**

आपण हा विषय नेउ शकता. आपण याचे रुलिंग दयावे.

**मा. महापौर :-**

सर्व सन्मा. सदस्यांची भावना हिच आहे की, संख्या वाढली पाहिजे आणि आमची भावना ही हिच आहे की संख्या वाढली पाहिजे, पण रितसर पुढच्या मिटींगला आपण हा विषय आणून संख्या वाढवू या.

**प्रेमनाथ पाटील :-**

आम्ही मतदानाची मागणी केली आहे.

**चंद्रकांत वैती :-**

सचिव साहेब, आयुक्त साहेब, ठराव झालेला आहे. असे ठराव झालेले विषय पुढच्या सभेत घेता येतात का? ठराव झाला आहे, मतदानाची मागणी झाली आहे. असा पळपुटेपणा चालत नाही. मतदानाची मागणी केलेली आहे आणि आपण ठराव कसा काय पुढे नेता?

**शशिकांत भोईर :-**

नियमानुसार सचिवांनी मतदानाची प्रक्रिया सुरु करावी.

**एस. ए. खान :-**

कुठल्या कायदयाने आपण ठराव पुढे घेता?

**लक्ष्मण जंगम :-**

या सभेची सुद्धा १० दिवस अगोदर पत्र काढली होती म्हणजे हे सर्वांना माहित होतेच. परत तयारी करण्याचा विषय कसा येतो?

**शरद पाटील :-**

मा. महापौर साहेब, सचिवांनी आम्हांला सांगावे की जर तुम्ही कायदयाने हा विषय आणला त्यावेळेस कायदयाचा अभ्यास करुन आणला होता का?

**प्रफुल्ल पाटील :-**

मा. महापौरांनी काय सांगितले की हा विषय पुढे घ्या. हा विषय आहे की, निवडणूक आहे? निवडणूक पुढे ढकलता येते का?

**शरद पाटील :-**

मा. महापौर साहेब, निवडणूक पुढे ढकलता येत नाही. सचिव साहेब, आपण हा विषय आणते वेळी ही निवडणूक लावताना जेव्हा आपण नउची संख्या दिली मग आता आपण कशी संख्या वाढवू शकतो? जेव्हा आपण ९ संख्येबाबत इलेक्शन लावले आहे तर ती संख्या १५ कशी वाढवू शकता. हा नियम आहे का? तो गोषवारा देताना त्यापद्धतीने तुम्ही दिला पाहिजे होता. आपण त्यावेळी विचार केला नाही का, ही संख्या १५ असू शकते?

**प्रफुल्ल पाटील :-**

९ संख्येचे इलेक्शन दिलेले नाही. ही समिती गठीत करण्याचा विषय आहे. गोषवाऱ्यामध्ये त्यांनी माहिती दिलेली आहे. तुम्हांला गोषवारा कशापद्धतीने घ्यायचा आहे तो घ्या. पूर्वीसुद्धा प्रशासनाने गोषवाऱ्यामध्ये जे दोष ठेवले होते ते काढलेले आहेत. मा. महासभेपुढे असे अनेक गोषवारे आले. कित्येक दोषी म्हणून परत पाठवले. कित्येक अपूर्ण म्हणून परत पाठवले सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवालजींनी तर पन्नास एक गोषवारे मागच्या पाच वर्षात परत पाठवले.

**शरद पाटील :-**

पन्नास पाठवले तर हा एकान्नवा ही पाठवून द्या.

**प्रफुल्ल पाटील :-**

गोषवारा हा कायदयाची तरतुद नाही. गोषवारा हा निवडणूक कशी करायची त्याची माहिती देणारा आहे.

**शरद पाटील :-**

निवडणूक कशी करायची त्याची माहिती गोषवाऱ्यामध्ये देवू शकतो पण त्याची संख्या देवू शकत नाही. तर त्याचवेळी ही संख्या दयायला पाहिजे होती ना.

**प्रफुल्ल पाटील :-**

संख्या बदलण्याचे अधिकार मा. महासभेचे आहेत.

**अनंत पाटील :-**

सचिव साहेब, आपण जी विषयपत्रिका दिलेली आहे. या पत्रिकेनुसार नउ सदस्यांची निवड करायची आहे. मग हा जो नियम आहे.

**मॉरस रॉड्रीक्स :-**

सचिव साहेब, मी आपल्याला रिक्वेस्ट करतो की, सर्व झोपी गेलेले जागे झालेले आहेत. आता याचा तुम्ही खुलासा देणार अशी मी आशा बाळगतो. कारण नविन महापौर, नविन नगरसेवक आले आहेत त्यांना काही कल्पना नाही की, मिटींग कशी चालवायची हे मला खुल्लमखुल्ला दिसत आहे. येथे ठराव मंजूर झालेला आहे. दुसऱ्या कोणाचाही ठराव आलेला नाही. याला मतदानाची गरज नाही. यावर ताबडतोब निर्णय दया व विषय संपवून दुसरा विषय घ्यावा.

**अनंत पाटील :-**

सचिव साहेब, आपण जी विषयपत्रिका या सर्व सभासदांना दिलेली आहे. यात तौलानिक संख्या बळाप्रमाणे तुम्ही हा सभेचा विषय चालवायचा आहे. तौलानिक संख्येप्रमाणे जर तुम्हांला कोकण आयुक्तांनी पत्र दिले असेल व त्या नियमानुसार सभा चालवायची असेल तर नउ सदस्य व्यतिरिक्त वाढीव संख्या असेल तर हे नउ सदस्य निवडून घ्या आणि निवडून झाल्यानंतर पुढच्या सभेमध्ये प्रत्येक पक्षांना, गटनेत्यांना पत्रक दया. तुमची कुठली, किती सदस्य संख्या ठरवणार आहोत त्याप्रमाणे देउन दया. त्याप्रमाणे आता तुम्ही नउ सदस्य दया.

**प्रफुल्ल पाटील :-**

आमचे जुने जाणते, अतिशय अनुभवी नगरसेवक सन्मा. नगरसेवक अनंत पाटीलजी बोलतात की जर तुम्हांला कमिशनरने नउ संख्या दिली तर नउप्रमाणे करा. त्याला आम्ही तयार आहोत. तसे कोकण कमिशनरने नउ ही संख्या दिलेली आहे का?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

सचिव साहेब, ह्याच्यामध्ये क्लिअर लिहिलेले आहे. १९४९ चे कलम ३०(१) च्या तरतुदीनुसार महिला व बालकल्याण समिती गठीत करणे आवश्यक आहे. सदर समितीचे एकूण नउ सदस्य असतील आणि जर आपल्याला हे म्हणायचे असेल की ह्याच्यात कमी जास्त करण्याचा अधिकार महापौर किंवा सभागृहाला आहे ह्याचा आपण जर उल्लेख केला असता तर....

**चंद्रकांत वैती :-**

कायदयाचा आपण काहीही गैर अर्थ काढू नका. तो अधिकार सभागृहाला आहे. मा. महासभेला तो अधिकार आहे, मा. महासभेने ठराव केलेला आहे आणि आपण अजूनपर्यंत कितीवेळ सल्लामसलत करणार आहात. ठराव झालेला आहे वास्तविक सन्मा. सदस्य मॉरस रॉड्रीक्स साहेबांनी जी सुचना केलेली आहे त्याला दुसरा पॅरेलल ठराव आलेला नाही. हा ठराव अंतिम ठराव आहे असे समजून मतदान ही घेण्याची आवश्यकता नाही. आमच्या मित्रांना थोडेसं मानसिक समाधान मिळावे. गांगरून जाण्याचे कारण नाही. घाबरून जायचे कारण नाही. आपण शिष्टासनामध्ये जास्त वेळ राहू शकत नाही. पाय वर डोकं खाली ठेवून अख्खा दिवस राहू शकणार नाही. आता आपण ठराव पारित केलेला आहे त्या ठरावानुसार कार्यवाही करावी आणि त्याच्या ही उपर आम्ही मतदानाची मागणी केलेली आहे. आपण प्रत्यक्ष मतदानाला सुरुवात करावी व पुढील कामकाजाला सुरुवात करावी.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहेब, मराठीत म्हण आहे की, " ज्याचे जळते त्यालाच कळते " आता जळले आहे म्हणून सगळं कळते. आता पर्यंत त्यांना कळले नसेल की हे काय आहे म्हणून आपण क्लिअर नउ सदस्य असतील ते महापालिकेच्या गटाच्या संख्याबळाप्रमाणे तुम्हांला घ्यायचे आहे.

**चंद्रकांत वैती :-**

मी आपल्याला याही उपर सांगतो की जर आमचा ठराव बेकायदेशीर असेल तर आपण तसे घोषित करावे की हे बेकायदेशीर आहे. आम्हाला आता जास्त चर्चा करण्याचे कारण नाही. हा ठराव बेकायदेशीर असेल तर सभागृहासमोर आयुक्तांनी, सचिवांनी किंवा मा. महापौरांनी किंवा आपण सर्व ज्ञानी मंडळींनी तसे आमच्या निर्दशनात आणून दया की, तो ठराव बेकायदेशीर आहे हा ठराव कायदेशीर आहे व त्याच्यामध्ये प्रत्येक शब्द कायदेशीर आहे आणि मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या ३० च्या तरतुदीनुसार केलेले आहे. त्यात एक शब्द देखिल चुकीचे नाही. चुकीचा असेल तर दाखवावा बाकी चर्चा करण्याचे कारण नाही. ठराव जसा आहे तसा स्विकारा. अन्यथा मतदानाला सुरुवात करा.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

सन्मा. सदस्य चंद्रकात वैती साहेब, आपल्या बाजूला बसलेले सन्मा. नगरसेवक मिलन म्हात्रे यांनी अनेक चुका दाखविल्या पण त्या चुकांना आपण कधीही मान्यता दिलेली नाही. म्हणून काय चुकले आहे हे सांगण्याची गरज नाही. या सभागृहामध्ये सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे हे कोर्टामध्ये गेले. मा. महापौर साहेब आपण प्रक्रिया सुरु करा. नउ सदस्यांची नेमणुक करा. अन्यथा आमची सुचना आहे की, आपण हा विषय पुढे घ्यावा.

**एस. ए. खान :-**

सचिव साहेब, आम्ही मतदानाची मागणी केलेली आहे. आपण मतदानाची प्रक्रिया सुरु करा.

**शशिकांत भोईर :-**

मतदानाची मागणी केलेली आहे. कृपया आपल्या प्रक्रियेला सुरुवात करावी. सचिव साहेब, नियमाप्रमाणे चार नगरसेवकांनी मतदानाची मागणी केलेली आहे.

**मिलन पाटील :-**

मा. महापौरांनी तुम्हांला रुलिंग दिलेली आहे.

**एस. ए. खान :-**

ती रुलिंग नाही.

**मिलन पाटील :-**

हा विषय पुढे घ्या म्हणून सांगितले आहे ना.

**चंद्रकांत वैती :-**

असा विषय पुढे घेता येणार नाही आणि जर घेता येत असेल तर सचिव साहेब आयुक्त साहेब आपण त्यांना एकदा सल्ला दया.

**प्रफुल्ल पाटील :-**

मा. महापौर साहेब, आपल्याकडे ठराव आलेला आहे. ठरावावर मतदानाची मागणी झालेली आहे. या विषयावर आपण पुढे चाल करावी. आपण डिसक्शन करण्यामध्ये एवढा वेळ घालवण्याची मला गरज वाटत नाही. हा विषय तुम्हांला पुढे नेता येणार नाही. कारण हा निवडणुकीचा विषय आहे. निवडणुकीचा कुठलाही विषय तुम्हांला पुढे नेता येत नाही.

**मिलन पाटील :-**

नउची संख्या दिलेली आहे त्याच्यामध्ये बदल करता येते का?

**प्रफुल्ल पाटील :-**

तुम्हांला जर वाढवायचे नसेल तर तसा ठराव दया.

**मिलन म्हात्रे :-**

कुठल्याही उमेदवाराचे मरण झालेले नाही त्यामुळे निवडणुक पुढे ढकलता येणार नाही.

**प्रफुल्ल पाटील :-**

मा. महापौर साहेब, आमच्या मित्रांना आमच्याबद्दल एवढी कळकळ आहे. आमच्या खोडया ही काढतात आणि आमच्यावर प्रेमही करतात. आता खोडया काढायच्या तर त्यांनी काय करायचे की त्यांचा ठराव दयायला पाहिजे आणि जर प्रेम करत असतील तर त्यांनी आमचा ठराव एक्सेप्ट करावा.

**जयंत पाटील :-**

त्यांच्यावर आम्ही खूप प्रेम करतो व निवडणुकीचा अनुभव त्यांना एक महिन्यापूर्वी आलेला आहे. त्यामुळे प्रेमात त्यांनी पुन्हा पडू नये. माझा असा विषय आहे की, आपण वेळेवर नउ सदस्यांची संख्या पंधरा करु शकत नाही. मघाशी सन्मा. नगरसेवक अनंत पाटील यांनी सांगितले की येथे तुम्ही तौलानिक संख्या दिलेली आहे. संयुक्त लोकशाही आघाडीचे ४, भारतीय राष्ट्रवादी काँग्रेस ३, भारतीय जनता पक्ष १ आणि

शिवसेना १ त्याप्रमाणे सदस्य संख्या बनवायची आहे. हा संपूर्ण गोषवारा आपण पद्धतशीरपणे दिल्यानंतर आपण वेळेवर १५ सदस्य करुच शकत नाही. हा नियम नाही म्हणूनच तुमचा ठराव चुकीचा आहे.

**ग्रिटा फॅरो :-**

आपल्याला हे जर मान्य नव्हते तर आपण हे आधी कळवायला पाहिजे होते ना.

**जयंत पाटील :-**

हे कुठेतरी एकत्र बसले. चला करुया, १५ काय १६ करु या. पण असे होत नाही.

**प्रफुल्ल पाटील :-**

प्रशासनाने सांगावे की, नगरसेवकांनी गोषवाऱ्याच्या पलिकडे कधीच काही ठरवायचे नाही.

**जयंत पाटील :-**

मग गोषवाऱ्याची आवश्यकताच काय आहे?

**प्रफुल्ल पाटील :-**

आम्ही गोषवारा दिला आहे. त्याच हिशोबाने तुम्ही ठराव करायचे असे प्रशासनाने आम्हांला सांगावे.

**जयंत पाटील :-**

गोषवाऱ्याच्या पलिकडे जायचे असेल तर तुम्ही हा विषय पुढच्या मिटींगला आणा ना. आम्ही कुठे नाही म्हणून सांगतो.

**मा. महापौर :-**

सन्मा. नगरसेवक/नगरसेविका आपण हे पत्र दिले होते की नउ सदस्यांची समिती गठीत करायची आहे. त्याप्रमाणे बरेचसे नगरसेवक येथे उपस्थित नाही. त्यांना प्रशासनाने अशी माहिती दिली होती की, नउ सदस्यांची समिती गठीत करायची आहे. आता आपली भावना लक्षात घेउन जो बदल करायचा आहे ते करता येईल. पण आपण म्हणता की निवडणुक आहे व त्याच्यामध्ये बदल करता येत नाही. पण आपल्याला सदस्य संख्येमध्ये बदल पाहिजे.

**प्रफुल्ल पाटील :-**

निवडणुक गठीत करायची तर समिती गठीत करण्याकरिता निवडणुक आहे. सदस्य संख्या ठरविण्याचे अधिकार मा. महासभेचे आहेत.

**मा. महापौर :-**

आपण गोषवाऱ्यामध्ये नउ सदस्यांची समिती गठीत करायची अशी माहिती दिली होती. आता आपल्याला जर २१ सदस्य गठीत करायचे असेल तर पुढच्या सभेला व्यवस्थित रितसर आणून करु या.

**प्रफुल्ल पाटील :-**

निवडणुकीचा विषय पुढच्या सभेत घेता येत नाही.

**मा. महापौर :-**

निवडणुकबद्दल नाही, मी विषयाबद्दल बोलत आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

आपल्याला गठीत करणे याचा अर्थ तुम्ही मराठी डिक्शनरी मध्ये साधी मराठी बघा. सचिव साहेबांनी यावर रुलिंग दयावे. सचिव साहेब निवडणुकीच्या प्रोसेसमध्ये तुमचा महत्त्वाचा भाग आहे. आज सभा स्थानी मा. महापौर आहेत. आम्ही त्यांचा आदर करुन बोलतो. अन्य जर दुसरी निवडणुक असती तर सभा स्थानी मा. महापौर असते का? मा. महापौर साहेब, सभा स्थानी नसते पण ते आज सभास्थानी आहेत. कारण नियमामध्ये एक सभेनंतरची सर्व सभा ही मा. महापौर साहेबांनी बोलवलेली आहेत. परंतु, निवडणुकीच्या प्रक्रिया सांभाळण्याची संपूर्ण जबाबदारी नगरसचिवांची आहे. आणि म्हणून मा. नगरसचिवांनी याठिकाणी स्पष्टपणे म्हटले पाहिजे आणि आम्ही ठरावा विग्रही कार्यवाही करा. फेटाळायचा असेल तर फेटाळा. तुम्हांला विखंडीत करायचे असेल तर विखंडीत करा. जर समोरच्या गटाचा तुम्हांला ठराव पाहिजे. असेल तर तो तुम्ही मागवा. अजून तुम्हांला मुभा देतो. ठराव देण्याची वेळ निघून गेली. आम्हांला त्यांच्यावर अन्याय करायचा नाही. आणि आम्ही कुरघोडीही करत नाही. शब्दाची खोटीही करत नाही. त्यांनी अजूनही अशा पद्धतीचा ठराव दयावा. दोन्ही ठराव घ्या पण तुम्ही प्रक्रियाच कशी थांबविली? प्रक्रिया तुम्हांला थांबविता येत नाही.

**चंद्रकांत वैती :-**

आतापर्यंत वर डायसवर बसलेल्या सर्व सन्मा. अधिकाऱ्यांनी जवळ जवळ बऱ्याच तज्ञ लोकांशी चर्चा केलेली आहे. कायदयाचे पुस्तक तीन तीन वेळा पाहिलेले आहे. अजूनपर्यंत आपल्याला कुठल्याही प्रकारच्या योग्य रस्ता किंवा योग्य सल्ला मिळालेला नाही आणि आपण आता मा. सभागृहात चर्चा झालेली आहे. मा. सभागृहासमोर ठराव आलेला आहे. दुसरा ठराव आलेला नाही. मतदानाचीही मागणी झालेली आहे. आपण काहीच मंजूर करणार नाहीत का? काहीतरी मंजूर करावे लागेल ना? उगीच काहीतरी चर्चा करायची. मा. महापौर साहेब विनंती करण्याचे काही कारण नाही. विषय असा आहे की, महिला बालकल्याण समिती गठीत करायची. अजेंडयावर इतर समित्यांमध्ये सदस्य देण्याचे विषय आहे. त्याच्यामध्ये आज सगळेच सदस्य दयायचे आहेत. आणि आजच्या सभेमध्ये कुठल्याही परिस्थितीमध्ये महिला बालकल्याण समितीचे सदस्य देणे क्रमप्राप्त आहे. मा. सचिव साहेब, मा. आयुक्त साहेब, मा. महापौर दस्तूर खुद्द आपण आपल्या सहकाऱ्यांना

विश्वासात घ्या आणि सरळ आमचा हा ठराव फेटाळून टाका. तुम्हांला वाटत असेल मा. आयुक्त साहेबांना ठराव विखंडीत करण्याचे पॉवर आहेत. त्यांना तो ठराव विखंडीत करता येईल. विखंडीत करण्यासाठी महापालिकेच्या अधिनियमाप्रमाणे त्यांना तो पाठविता येईल. पण तुम्हांला काहीतरी करावे लागेल ना? उगीच कोणीतरी काहीतरी बोलायचे? मला खूप बोलता येते म्हणून सांगायचे? असे काही कारण नाही. कायदेशीर रित्या जे आहे. जे बोलता येते. बोललात आम्ही आमचे मत व्यक्त केलेले आहे. आमच्या ठरावात कुठच्याही प्रकारची चूक नाही. असेल तर कोणीही ते दाव्याने सिद्ध करावे. आमचा ठराव फेटाळून टाकावा. नसेल तर विधीवात कार्यवाही सुरुवात करावी. मा. सचिव साहेबांनी आकडेमोड केलेली आहे. प्रत्यक्ष मतदानाला सुरुवात करावी.

**मा. महापौर :-**

साहेब, आपण सर्व सदस्यांना गोषवाऱ्यामध्ये अशी माहिती दिलेली होती की सदर समितीमध्ये एकूण ९ सदस्य असतील आता तुम्हांला जे चेंजेस करायचे आहेत. त्या भावनेशी आम्ही सहमत आहोत. पण ते रितसर आणून, आपण पुढच्या मिटींगमध्ये २१ करा, १५ करा. जसा वाटेल तसा निर्णय घ्या.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. सचिव साहेब तुम्हांला निर्णय घेता येत नाही म्हणून तुम्ही ९ संख्या दिली. मग तुम्ही सभागृहाची दिशाभूल केली. तुम्ही बाकीची टोटल दिली नाही. त्याच्यामध्ये तुम्ही उल्लेख केला पाहिजे. की मा. महासभा त्यावेळी असा ठराव करून अशी संख्या वाढवता येईल.

**मॉरस रॉड्रीक्स :-**

दिशाभूल कोणीही केलेली नाही.

**जंयत पाटील :-**

सचिव साहेब, तुम्ही मला एक गोष्ट सांगा की तुम्ही वेळेवर १५ सदस्य करु शकता का? तुम्ही गोषवाऱ्याच्या पलिकडे जाउ शकता का? याची माहिती मला तुमच्याकडून पाहिजे.

**नगरसचिव :-**

जी उपविधीमध्ये तरतुद आहेत. त्याप्रमाणे गोषवारा तयार केलेला आहे. उपविधीत ९ ची तरतुद आहे पण कलम ३०(७) च्याप्रमाणे सभागृहाला अधिकार आहेत. त्याप्रमाणे सभागृहाने ठरवायचे आहेत.

**एस. ए. खान :-**

सभागृहाचे जे अधिकार आहेत. तसे सभागृह करु शकत नाही.

**जयंत पाटील :-**

सभागृहाला वेळेवर ठरवता येत नाही. सभागृहामध्ये ठराव पारित व्हायला लागेल. २/३ नाही हे तुम्ही लक्षात घ्या. ९ सदस्यांची नेमणुक करावी असे आपण गोषवाऱ्यामध्ये दिलेले आहे. आमच्या ५ सदस्यांची नावे आम्ही दिलेली आहेत. त्याप्रमाणे तुम्ही करा. आणि पुढची कार्यवाही करा.

**प्रफुल्ल पाटील :-**

सन्मा. सदस्य श्री. जयंत पाटील बोलल्याप्रमाणे की असे अचानकप्रमाणे बदलू शकत नाही. पुन्हा ३०(७) एकदा वाचून दाखवतो. महानगरपालिकेस कोणत्या ही वेळी विशेष समितींचे विर्सजन करता येईल किंवा तिच्या रचनेत फेरफार करता येईल. कोणत्याही वेळी जरी ही समिती गठीत झाली. आता गठीत करा. मा. महापौर साहेबांच्या म्हणण्याला जर मान देवून पुढे मागे विसर्जित करुन पुन्हा नविन समिती गठीत करुया. विषय कोणत्याही वेळी विसर्जीत करता येते व तिच्या रचनेत बदल करता येतो आणि म्हणून हीच योग्य वेळ आहे. गठित करण्याच्यावेळी तिच्या रचनेत बदल केलेले आहे. नियमानुसार आम्ही ठराव दिलेला आहे. आपण पुढील कार्यवाही करा.

**जयंत पाटील :-**

प्रश्न असा आहे की आपण त्या शब्दांचा अर्थच चुकीचा लावता आहेत. असे माझे मत आहे. कुठल्याही महानगरपालिकेमध्ये कोणत्याही वेळेस विशेष सभेचे विर्सजन करता येईल? याचा अर्थ ते आजच्या आज निवडणुकीची प्रक्रिया चालू असतांनाही तुम्ही गोषवाऱ्यामध्ये ९ सदस्य करतो असे देता. ते तुम्ही कसे काय बदल करणार?

**प्रफुल्ल पाटील :-**

गोषवारा हा नगरसेवकांना बायडिंग नसतो. गोषवाऱ्यानुसार नगरसेवकांनी निर्णय घ्यायचा असतो. गोषवारा इन वन काईन्ड ऑफ इर्न्फोमेशन, हाउ टू मेक रिझॉलेशन गोषवाऱ्याच्या रितीने ठराव करावा. तुम्हांला विषयासंबंधी माहिती नसेल तर गोषवारा दिला जातो. आता याठिकाणी तौलानिक संख्याबळ त्यांनी काढून दिलेले आहे. त्याप्रमाणे तुम्ही इतर संख्याचा विचार घेवून...

**जयंत पाटील :-**

सन्मा. सदस्य श्री. प्रफुल्ल पाटील साहेब, गोषवारा हा नियमाप्रमाणे दिला जातो, हे लक्षांत घ्या. जर गोषवारा चुकीचा असेल तर तुम्ही त्याप्रमाणे सचिव साहेबांना सांगा. गोषवारा चुकीचा आहे. नियमबाह्य आहे. गोषवारा नियमाला धरुन आहे. सदस्य संख्या वाढवण्यास आमची कुठल्याही प्रकारची हरकत नाही. पण ते आज कसे काय वाढवणार?

**मिलन म्हात्रे :-**

मतदान घेण्याकरिता तुम्हांला काय अडचण आहे? आमचा ठराव दिलेला आहे. मा. महापौर साहेबांचे त्यानंतर रुलिंग दिलेले आहे. म्हणजे त्यांनी आमच्या ठरावाची अवहेलना केली. आता त्यांना काय विचारता? तुमचा जॉब फक्त मतदान घेणे तुम्ही मतदानाचे डिक्लरेशन करा.

**गणेश शेट्टी :-**

सचिव साहेब, आपण नियमाप्रमाणे मतदान घेवू शकता ना?

**प्रफुल्ल पाटील :-**

सचिव साहेबांनी प्रत्येकाला तौलानिक संख्याबळ कळवावे मतदान घ्या. जर ठराव पाहिजे असेल नाही तर नविन तौलानिक संख्याबळ काय आहे ते सांगावे. म्हणजे त्यानुसार आम्हांला सदस्य देता येईल. आणि वेळ घालवू नका. दुसऱ्याही निवडणुका, नियुक्त्या व्हायच्या आहेत. कारण गोषवाऱ्यामध्ये ९ तौलानिक संख्याबळ दिले होते. आता ते २१ चे करुन दया.

**मा. आयुक्त :-**

सन्मा. महासभेपुढे बऱ्याच वेळेपासून एक विषय चर्चेला जात आहे की, अजेंडयावर जो विषय नगरसचिवांनी दिलेला आहे. त्यांच्याकडून आपल्याला जो गोषवारा प्राप्त झालेला आहे. तो जो गोषवारा आहे. तो गोषवारा हा मिरा भाईंदर महापालिकेची स्थापना झाल्यानंतर सदस्य सभेच्या कामकाजाचे जे नियमन तयार केलेले होते. आणि ते राजपत्रामध्ये प्रसिद्ध केलेले होते. सन्मा. सदस्य श्री. प्रफुल्ल पाटील यांनी मगाशी सांगितले की नियम मंजूर आहेत का? वगैरे परंतु, आतापर्यंतचे महापालिका स्थापन झाल्यापासून कामकाज जे चालले आहे. ते आपण राजपत्रामध्ये प्रसिद्ध झालेल्या उपविधीप्रमाणे, नियमाप्रमाणे आपण आतापर्यंत केलेले आहे. पहिल्याच विषयाला ही चर्चा सभागृहामध्ये सुरु आहे. त्याच्यमाध्ये आपल्या महापालिकेच्या, मुंबई प्रांतिक महापालिका अधिनियम १९४९ मध्ये ज्या काही तरतुदी आहेत. त्या तरतुदीच्या उहापोह याठिकाणी झालेला आहे. सन्मा. सदस्यांकडून एक ठराव मा. महापौर साहेबांकडे प्राप्त झालेला आहे. आणि त्या ठरावामध्ये महिला व बालकल्याण समितीची जी रचना आहे. त्या रचनेच्या बाबतीमध्ये मा. महासभेचे जे अधिकार आहेत. त्या अधिकाराप्रमाणे त्याच्यामध्ये बदल करावा. अशाप्रकारे सुचित करण्यांत आलेले आहे. सदर ठरावामध्ये ज्या तरतुदी नमुद केलेल्या आहेत. त्या तरतुदी ३०(७) मध्ये नमुद केलेल्या आहेत. ते मी आपल्याला वाचून दाखवितो. महापालिकेस कोणत्याही वेळेस समितीचे विर्सजन करता येईल. किंवा तिच्या रचनेत बदल करता येईल. आणि ३०(८) मध्ये अशी तरतुद आहे की, विशेष समित्यांची रचना व अशा समित्यांच्या सभा कामकाज चालविणे, कामकाजाच्या टिपण्या ठेवणे, व प्रतिवृत्त सादर करणे आणि अशा समित्यांपुढील अन्य बाबी यांचे नियमन नियमाव्दारे करता येईल. म्हणजे ७ मध्येही तरतुद आहे. आणि ८ मध्येही तीच तरतुद आहे. आपण जे ७ मध्ये नमुद करता की, रचनेमध्ये बदल करण्याचे अधिकार मा. महासभेकडे आहेत. हे अधिकार महासभेकडेच आहेत. नो डाउट. परंतु, ८ मध्येही अशा जेव्हा रचनेमध्ये जर बदल करायचे जर असेल तर ते रचनेमध्ये बदल करताना जे आपले नियम आहेत. त्या नियमांचे पालन करणे आवश्यक आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

मा. आयुक्त साहेबांनी छान माहिती दिली. ३० च्या (७) प्रमाणे ते ॲग्री करतात की मा. महासभेचे अधिकार आहेत. दि. ३०(८) चे नियमपण मानले पाहिजे. मगाशी मी म्हटले की कधी कुठलाही कायदा या देशांतला या देशाच्या संविधानाच्या विरुद्ध असू शकत नाही. जर कुठला कायदा या देशांमध्ये बनविला गेला तर तो संविधानाच्या विरोधात असेल. तो रद्द केला जातो. अशा अनेक घटना पेपरातून वाचल्या. प्रत्यक्ष बघितलेल्या आहेत. त्याप्रमाणे कुठल्याही नियमांच्या जे प्रत्यक्ष कायदयाच्या कलमाच्या कुठल्याही विरोधात असतील ते नियम कधीही टिकत नाही. ३०(७) प्रमाणे महापालिकेच्या मा. महासभेचे अधिकार आहेत रचना बदलण्याचे ३०(८) वेगळे नियम केले असले ९ जरी ठरविले असले तरी की तुम्ही ४(क) वाचा, पुन्हा ४(क) मध्ये काय म्हटले आहे? महापालिकेच्या अधिकारांस बाधा न आणता. इट मिन्स ३०(७) च्या अधिकारांस बघा न आणता म्हणजे नियमांत पण तेच आले. ३०(७) लाच त्यांनी महत्त्व दिलेले ही यु कॅन नॉट इरॅडिकेट अस अर्लिअर सेक्शन जर ३०(७) च्या ऐवजी ३०(८) भाग इनवर्ट समाविष्ट केला असता. ३०(७) हा काढला तर ३०(७) चा अस्तित्व संपला असता. ३०(७) चे अस्तित्व आहे आणि नियम आहे म्हणून तो नियमापेक्षा मोठा आहे. कायदयांचे कलम आहे म्हणून तो नियमांपेक्षा मोठा आहे. ३०(८) व्दारे नियम बनवायचे आहेत. त्या नियमांमध्ये सुद्धा पुढे, महानगरपालिकेच्या अधिकारास बाधा न आणता. हे जे दिले आहे त्याचे सर्व अधिकार, सर्वोच्च अधिकार, ३०(७) व्दारे महानगरपालिकेचा आहे म्हणून याठिकाणी मा. महासभेने हा ठराव केलेला आहे. ह्याच्यावर सचिवांनी स्पष्टपणे जे सांगितले आहे त्याप्रमाणे पुढे कार्यवाही करा. आता खूप झाले. अजून किती स्पष्ट करायचे?

**मिलन म्हात्रे :-**

नाहीतर, आता तुमच्यावर कार्यवाही करायचा ठराव ठेवावा लागेल.

**मधुसुदन पुरोहित :-**

सचिव साहेब, कितीही पुस्तक उलटले तरी कायदा आणि कलम बदलत नाही.

**चंद्रकांत वैती :-**

आयुक्त साहेब, आपण नियम वाचून दाखवला. त्याच्यामध्ये ही आपण आज मा. महासभेमध्ये बसलो आहोत व महासभेचा पूर्ण अधिकार आहे. त्याच्यामुळे महासभेने घेतलेला निर्णय चुकीचा निर्णय नाही. तर आपण पुढील कार्यवाही सांगावी कारण चर्चा करुन काही निघणार नाही. आपण जिथे आहोत तिथेच राहणार वेळ फक्त पुढे जाणार आहे.

**मिलन म्हात्रे :-**

आयुक्त साहेब, आपण जास्त विचार करु नका. आमचा ठराव चुकीचा असेल तर ४५१ ला पाठवा स्टेंट गर्व्हमेंटकडे जाउ दे. तुमच्याकडे दोन अडीच महिने होते. पहिली कमिटी डिझॉल झाल्यानंतर तुम्हांला कळले पाहिजे होते २००१ च्या सेन्सरचा रिपोर्ट काय होता? लोकसंख्या काय होती? त्यानंतर आता लोकसंख्या किती बदलली? त्यांनतर वॉर्डाची प्रभाग संख्या बदलली. प्रभाग समित्या तयार झाल्या. हा सर्व सारासर विचार सचिवांनी करायला पाहिजे होता. ठराव मतदानाला टाका. ठराव पास होईल किंवा नाही. तुम्ही जा, ते विखंडीत करायला. बहूमताने मंजूर झाला तरी विखंडनाचे तुम्हांला अधिकार आहे. मंत्रालयात ते ठरवतील काय करायचे आहे.

**चंद्रकांत वैती :-**

मा. महापौर महोदय, सचिव साहेब, आपण सदस्य येण्याची वाट बघत आहात का? जर सदस्य येण्याची वाट बघत असाल तर तसे सांगा की, आम्ही मतदानासाठी काही सदस्य येण्याची वाट बघत आहोत. तसे नसेल तर आपण सरळ मतदानाला सुरुवात करावी. आपण कायदा काय सांगणार आहात ते सांगा. आजचा विषय आपल्याला टाळता येतो का? आपण ह्याच्यात काहीच करु शकणार नाही. फक्त वेळ काढायची असेल तर भाग वेगळा आहे. आपण कशाची वाट बघत आहात. आपण मतदान प्रक्रियेला सुरुवात करावी.

**एस. ए. खान :-**

आम्ही मतदानाची मागणी केलेली आहे. सचिवांनी याबाबत नियम काय आहे ते सांगावे. याला किती वेळ झाला आहे. किती तासांनी मतदान घ्यायचे आहे त्याबाबत आम्हांला नियम सांगा.

**नगरसचिव :-**

ताबडतोब करायचे असते.

**एस. ए. खान :-**

ताबडतोब करायचे असते तर सुरुवात करा ना. मग आपण का थांबला आहात? मतदानाची मागणी करुन दोन तास झाले आहेत.

**नगरसचिव :-**

आपल्या उपविधीमध्ये ९ सदस्य समिती गठीत करण्याची तरतुद आहे. आपल्याला जर २१ सदस्य करायचे असेल तर पहिले ९ ची संख्या अस्तित्वात आणावी लागेल व २१ सदस्यांचा ठराव करुन शासनाकडे नियमानुसार बदल करण्यासाठी पाठवावा लागेल.

**एस. ए. खान :-**

असा नियम कुठे आहे ते आपण दाखवा.

**चंद्रकांत वैती :-**

मा. महासभा म्हणजे काय? महासभा अधिकार बनवते. महासभा नियम बनवते.

**मा. महापौर :-**

नउ सदस्यांची समिती ही देखिल मा. महासभेनेच बनवले आहे.

**चंद्रकांत वैती :-**

मा. महासभेने बनवलेले नाही. काहीतरी सांगू नका. नसेल माहित ती गोष्ट बोलू नका. मा. महासभेने नउचा नियम कधी बनवला? कशाला दिशाभूल करता?

**नगरसचिव :-**

प्रशासकीय कालावधीमध्ये तयार केले होते.

**प्रफुल्ल पाटील :-**

सचिव साहेब, तुम्ही सांगता की, या नियमांना अंतिम मंजूरी नाही. हे नियम मा. महासभेने बनवले नाही. ते प्रशासकीय काळात बनवले. तुम्ही सांगितले अंतिम मंजूरी नाही हे बरोबर आहे का?

**नगरसचिव :-**

बरोबर आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

कुठल्या नियमामध्ये जरी काय लिहिले असेल तर ॲक्टची तरतुद कॅन्सल होते का? ३०(७) कॅन्सल होते का, ते सांगा.

**नगरसचिव :-**

३०(७) चा कलम कॅन्सल होत नाही.

**प्रफुल्ल पाटील :-**

मग ३०(७)च्या आधारेच तुम्हांला ठराव दिलेला आहे.

**नगरसचिव :-**

नियमात बदल करायचे असले तर शासनाकडे पाठवावा लागेलच.

**प्रफुल्ल पाटील :-**

आपल्याला काय करायचे आहे ते करा. आम्ही ठराव दिलेला आहे.

**चंद्रकांत वैती :-**

आपल्याला हा ठराव तर पारित करायला लागेल किंवा निदान मतदान तरी घ्यावे लागेल ना.

**मिलन म्हात्रे :-**

जेव्हा आकृतीबंध आयुक्तांनी पाठवले तेव्हा त्याच्यावर ॲमेजमेन्ट झाले.

**एस. ए. खान :-**

तुम्ही मंजूरीसाठी पाठवा.

**मिलन म्हात्रे :-**

आकृतीबंधला जेव्हा तुम्ही नोकरभरती केली तेव्हा किती पद वाढवले? त्याला मान्यता होती का? पण सभागृहामध्ये पद वाढवली व त्याला नंतर मान्यतेला पाठवले. सचिव, सर्वांकडे निरनिराळे कायदे करुन चालत नाही. आकृतीबंधनुसार ठराव झाले का? तर नाही. तुम्ही सोयीस्कररित्या वाढवून पाठवले.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

सचिव साहेब, आपण पुढची कार्यवाही सुरु करा.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य हा ठराव पारित केल्यानंतर तो शासनाकडे मंजूरीला पाठवावा लागेल.

**प्रफुल्ल पाटील :-**

तुम्ही मतदान घ्या. या ठरावाबाबत प्रशासनाला जे योग्य वाटेल ते करतील.

**मिलन म्हात्रे :-**

सभागृहामध्ये कुठलाही धोरणात्मक निर्णय घेताना सभागृहात ठराव पास करुनच तो पाठवावा लागतो. हा नियम आहे. त्यानुसार पाठवा. आम्ही कुठे नाही बोलतो आणि ज्यांच्या कुणाच्या हरकती आहेत तेही पाठवा.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

सचिव साहेब, आपण टिपणी देताना नउची संख्या पंधरा करायची आहे की, सोळा करायची आहे असा कुठलाही उल्लेख ह्याच्यात केलेला नाही. पुन्हा पुन्हा विषयांतर करु नका. तुम्ही एकतर नउ सदस्य नेमायचे...

**चंद्रकांत वैती :-**

आपण दुसरा ठराव मांडा. नाहीतर, मांडलेला जो ठराव आहे त्याच्यावर कार्यवाही करा.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

सचिव साहेब, आपण एकतर नउ सदस्यांची नेमणूक करा आणि खरोखर सगळ्यांची भावना आहे की, संख्येमध्ये वाढ झाली पाहिजे, ही आमची सुचना आहे हा विषय तुम्ही नंतर घ्या. त्याला आम्ही विरोध करत नाही.

**चंद्रकांत वैती :-**

तुम्ही नविन ठराव आणा ना.

(सभागृहात गोंधळ)

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

सचिव साहेब, आम्हाला ठराव मांडायची गरज नाही. आम्ही आपण दिलेल्या टिपणीनुसार चालतो. पण मा. महासभेची व या सभागृहाची भावना असेल की, संख्या वाढली पाहिजे तर या गोष्टीला आम्ही सहमत आहोत. पण मी ठाणे महानगरपालिकेमधील काही लोकांशी मी बोललो की तुम्हांला जर नउची संख्या वाढवून पंधरा करायचे असेल तर तुम्हांला रितसर ठराव आणावा लागेल तो ठराव महाराष्ट्र शासनाकडे नगरविकास सचिवाकंडे पाठवावा लागेल त्यांनतर त्याला मान्यता येईल म्हणून आपण त्याना आग्रह धरु नका. शेवटी महिलांचे जर कल्याण करायचे असेल तर ही सुचना घ्या व हा विषय पुढच्या मा. महासभेत घ्या.

**मिलन म्हात्रे :-**

आपण आपल्याच भाषणात बोलला की, ठराव पास करावा लागेल.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

नउ सदस्यांची नेमणुक करा.

**चंद्रकांत वैती :-**

आपले सचिव सल्ला दयायला कुठेतरी कमी पडत आहेत. म्हणून ठाणे महानगरपालिकेकडून सल्ला घेतला तोही चुकीचा घेतला. डायसवर बसलेल्या मंडळींनी सांगावे, आपण तज्ञ आहात. आमच्या येथे बसलेल्या

तज्ञ मंडळींनी सांगावे हा ठराव पुढे पाठवता येतो की रद्द करता येतो ते सांगावे. एवढा वेळ काढायची गरज नाही. जर आपण कोणाची मतदानासाठी वाट बघत असाल तर तो भाग वेगळा आहे. पण एवढी ही संधी दयायची गरज नाही. आपण दोन तास वाट बघितली आहे आणि अजून किती वाट बघणार आाहोत. सचिव महोदय, आपल्याला मतदान घ्यायचे आहे. आपण मतदान घेणार की सभागृहाचा अपमान करणार ते सांगा. आमची मित्रमंडळी अजूनपर्यंत दुसरा ठराव ही देत नाही. निदान ठराव तरी दयावा. आम्ही तर मतदानाची मागणी केली आहे. ही स्टॅच्युटरी कमिटी आहे. होय नाही नाही होय करुन काही चालणार नाही. आपण पुन्हा पुन्हा किती रेगोटया मारणार आहात? प्रत्यक्ष सभा कामकाजाला सुरुवात करावी. आपण आतापर्यंत बऱ्याच लोकांशी सल्लामसलत केलेली आहे. यातून जर काय निष्पन्न होत असेल तर तसे सांगा की, यातून असे निष्पन्न होते.

**एस. ए. खान :-**

आपण अजून किती लोकांशी सल्लामसलत घेणार आहात? सचिव साहेब, आम्ही मतदानाची मागणी करुन दोन तास झाले आहेत. नियमात प्रोव्हीजन काय आहे?

**जयंत पाटील :-**

विषयपत्रिकेनुसार आमच्या पाच सदस्यांची नाव दिलेली आहेत. आपण ती जाहिर करा. संयुक्त लोकशाही आघाडीचे चार नाव आहेत. त्यांनी दिले नसेल तर हरकत नाही...

**एस. ए. खान :-**

सचिवांना तसे घोषित करता येते का?

**चंद्रकांत वैती :-**

सचिवांना तसे घोषित करता येत असेल तर तेही त्यांनी करावे. पण आमच्या ठरावावर काय केले ते सांगा?

**जयंत पाटील :-**

तुम्हांला गोषवाऱ्यानुसारच चालावे लागेल. कारण गोषवारा तुम्ही नियमानुसार आणलेला आहे.

**एस. ए. खान :-**

गोषवारा नियमानुसार नाही. तो चुकीचा आहे.

**जयंत पाटील :-**

तुम्हांला नाव जाहिर करावे लागतील. अन्यथा हा विषय पुढच्या सभेत घेउन या.

**प्रफुल्ल पाटील :-**

सचिवांनी आमचा ठराव वाचून दाखवा व मतदान घ्या. प्रशासनाला जे योग्य वाटेल ते करा.

**चंद्रकांत वैती :-**

मा. महापौर साहेब, आपण आता अजून वाट बघायला लावू नका. मा. महासभेचा अधिकार आहे हे निदान आपल्याला अधिकाऱ्यांकडून समजले असेल आणि मा. महासभेच्या अधिकाराची पायमल्ली नको. वाट बघायचे कारण नाही. आमचा ठराव आहे. दुसरा ठराव नाही आहे तो ठराव सचिवांनी वाचावा व कायम करावा. मतदान घ्या तेही सांगितले आहे त्याला ही तुम्ही तयार नाही. तुमचा ठराव ही देत नाही. मग करणार काय?

**मा. महापौर :-**

सन्मा. नगरसेवक पाटील साहेबांनी सांगितले की २१ सदस्यांची समिती गठीत करुन आपण मंजूरीला पाठू या. येथे मतदान प्रक्रिया पूर्ण होत नाही. जे सदस्य निवडायचे आहे व जिथंपर्यंत सेक्शन येत नाही तिथंपर्यंत कसे निवडायचे?

**चंद्रकांत वैती :-**

सेक्शन यायची तेव्हा येईल त्याची तुम्ही काळजी करु नका. सभागृहाने ठराव मांडलेला आहे. तसा दुसरा ठराव तरी मांडा आणि हा मा. महासभेचा अधिकार आहे. मुंबई प्रांतिक अधिनिमय १९४९ च्या पुस्तकातील तरतुदीनुसार आहे व ह्या तरतुदीनुसार नाही असे आपल्याला वाटत असेल तर निदान कमिशनर साहेब, आपण डायसवर आहात, सर्व उपायुक्त आहेत, सचिव साहेब आपण आहात तर आपण तरी सल्ला दया की हा ठराव चुकीचा आहे किंवा आपण सांगा की ह्याच्यावर काही चर्चा करायची नाही. आम्ही कुठच्याही प्रकारचे मौन ठेवावे किंवा सभागृह स्थगित करावे, तहकूब करावे अशी सुचना मांडलेली नाही याची नोंद घ्या. आम्ही ठराव केलेला आहे. आपल्या विषयानुरुप ठराव केलेला आहे. त्या ठरावात काय चुकीचे आहे ते तरी आपण सांगा.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

सचिव साहेब, आपण बोललात की, निवडणुक प्रक्रिया थांबवता येत नाही. जर सभागृहाने निर्णय दिला. संख्या १५, १८ किंवा २१ करायची असेल तर मतदानाची प्रक्रिया कशाला? म्हणजे मतदानाची प्रक्रिया थांबली. कारण नगरसचिवांकडून आपल्याला परवानगी घ्यायला लागेल.

**चंद्रकांत वैती :-**

त्या संदर्भातील माझी माहिती सांगतो की ती प्रक्रिया आपण तौलानिक संख्याबळ, सचिवांकडून आल्याबरोबर ताबडतोब करु शकतो. सभागृहाची इच्छा असेल व मान्यतेसाठी पाठवत असाल तर तेव्हा संख्याबळ येउ दे. आता केले तर आता आमचे दोन्ही पर्याय खुले आहेत. तुम्ही सांगाल ते.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मतदान प्रक्रिया थांबवता येत नाही या नियमाखाली तुम्ही....

**मिलन पाटील :-**

मा. महापौर साहेब, आता सन्मा. नगरसेवक चंद्रकांत वैती साहेब जे बोलले की नियम ३०(७) प्रमाणे, तर ३०(८) पण वाचून बघा.

**चंद्रकांत वैती :-**

नुसतं वाचून बघू नका. तर समजून ही घ्या. मा. महासभा कशाला बोलतात तेही समजून घ्या.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

एका बाजूला मतदान प्रक्रिया थांबवता येत नाही असे सांगतात व एका बाजूला तुम्ही ठराव आणता. आपल्याला काय पाहिजे? मतदान पाहिजे की, मतदानप्रक्रिया पाहिजे.

**मिलन पाटील :-**

सचिवांनी सांगितले मा. आयुक्तांनी सांगितले आणखिन कोणी आपल्याला बोलायचे आहे? मग ते दुसरा कोण वकिल मागवतील?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

सचिव साहेब, मतदानप्रक्रिया थांबवता येत नाही. तुम्ही आता ठराव केला. १६ केले, १७ केले, १८ केले, २० केले तरीही मतदान घेणार का? मतदानाची प्रक्रिया थांबणार का नाही? म्हणून अजेडयावर जी गोष्ट आलेली आहे व सचिवांनी जे दिलेले आहे त्याच्यावर चर्चा करा आणि मा. महासभेत प्रश्न आणा.

(सभागृहात गोंधळ)

**मिलन पाटील :-**

सचिव साहेब, तुम्ही ठराव वाचू शकत नाही. तुम्ही रुलिंग दिलेले आहे. आयुक्तांनी व मा. महापौरांनी रुलिंग दिलेले आहे . संपला विषय. सचिव साहेब तुम्ही पुढचा विषय घ्या.

**प्रफुल्ल पाटील :-**

रुलिंग काय दिलेले आहे ते सांगा.

**मा. महापौर :-**

सन्मा. सभागृहाची भावना लक्षात घेउन असे रुलिंग दिले होते की, पुढच्या वेळेला रितसर हा विषय आणू या त्यानंतर जे होईल तसे करु या.

**चंद्रकांत वैती :-**

आयुक्तांनी आणि सचिवांनी जाहिर करावा की, विषय असा पुढे घेता येतो का?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

विषय पुढे घेता येतो पण मतदानप्रक्रियेचे काय?

**मिलन पाटील :-**

सदस्य संख्या वाढवण्यासाठी दिलेले आहे.

**चंद्रकांत वैती :-**

हा मा. महासभेचा अधिकार आहे. महासभा बसलेली आहे. विषयपटलावर विषय आहे. विषयावर निर्णय तर घ्यावा लागेल.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

विषयपत्रिकेवर नउ सदस्यांची नियुक्ती करायची असा विषय आहे.

**मा. महापौर :-**

विषयपत्रिकेवर नउ सदस्यांची नियुक्ती करायची असा विषय आहे. १० घ्यायचे की, १५ घ्यायचे त्यासाठी विषय नाही.

**एस. ए. खान :-**

मा. महापौर साहेब, आपण विषय वाचा ना. विषय काय आहे ते बघा.

**मा. महापौर :-**

विषय वाचलेला आहे.

**एस. ए. खान :-**

समिती गठीत करायचे आहे.

**मा. महापौर :-**

नउ सदस्यांची नियुक्ती करायची असा विषय आहे.

**एस. ए. खान :-**

असे गोषवाऱ्यामध्ये आहे?

**मा. महापौर :-**

होय.

**चंद्रकांत वैती :-**

गोषवारा ही माहिती असते. गोषवारा हा ठराव असतो का?

**मा. महापौर :-**

गोषवारा मा. आयुक्तांनी उपविधीप्रमाणे दिलेला आहे.

**एस. ए. खान :-**

आम्ही ठराव दिलेला आहे त्याचे काय ते सांगा.

**प्रफुल्ल पाटील :-**

मा. महापौर साहेब विषयपत्रिकेमध्ये गठीत करणेबाबतचा मर्यादित विषय आहे. गोषवाऱ्यामध्ये नउ सदस्य असतील ह्याचा अर्थ काय होतो? आहेत. असाव्यात असे ही नाही. असल्याच पाहिजे असा ही नाही. असतील तर संख्याबळाचे गणित कसे राहिल, ते असे राहिल. गोषवाऱ्यामध्ये तुम्हांला माहिती का दिली तर अभ्यास करण्यासाठी, याठिकाणी प्रश्न असा आहे की जेव्हा गोषवारा प्रशासन देतो, मागच्या पाच वर्षामध्ये कितीतरी असे गोषवारे रद्द करुन टाकले, फेकून दिले, परत पाठवले सुधारणेसाठी पाठवले. गोषवारा हा तुम्हांला दिलेला आदेश नाही किंवा कायदयाची तरतुद नाही असेही नाही. अशा अशापद्धतीने या विषयाची माहिती तुम्हांला दिलेली आहे. त्यांनी जी तरतुद जे नियम होते त्यानुसार माहिती दिली. त्या नियमाचे प्रारुप नियम आणा. अजूनही मंजूरी नाही हे सचिवांनी सांगितले. प्रारुप नियमामध्ये सुद्धा ३०(७) चा कलम खारिच केलेला नाही आणि कुठलाही नविन नियम करताना, जरी ते प्रारुप नियम अस्तित्वात असतील, आपण ते वापरलेले असतील, टेम्परारी आपण बूट पॉलिशला देतो, तेव्हा चप्पलवाला आपल्याला एक चप्पल घालायला देतो की, अनवाणी राहू नका. तसे हे प्रारुप नियम जरी असले व त्या नियमांचा आपण आधार घेतला तरी त्या प्रारुप नियमामध्ये काहीतरी अंतर्भूत असल तरी कलम ३०(७) आम्हांला लागू होतो. तो कायदयाचा कलम आहे. तो नियमापेक्षा मोठा असल्याने तो आम्हांला जास्त लागू होतो आणि त्या ३०(७) च्या नियमाच्या आधारे, कलमाच्या आधारे हा ठराव मांडलेला आहे. हा ठराव पारित करुन घ्या. पाहिजे तर मतदान घ्या किंवा त्याच्यावर आपण रुलिंग दया आपल्याला वाटत असेल की शासनाकडे पाठवायचे तर आयुक्तांनी शासनाकडे पाठवावे. पण या ठरावावर तुम्हांला निर्णय तर घ्यावाच लागेल आणि हा निर्णय जर तुम्ही घेतला नाही तर महापौर या नात्याने तुम्ही सभागृहाचे कामकाज चांगल्यापद्धतीने चालवावे अशी आमची इच्छा आहे.

**मा. महापौर :-**

आपण जी पूर्ण माहिती दिली होती ती नउ सदस्यांकरिता दिली होती. ह्याच्यामध्ये फेरबदल करायचा आहे. ९ चे २१ करायचे आहे त्यासाठी माझे आपल्याला असे निवेदन हेते की, पुढच्या मिटींगला व्यवस्थित, रितसर कायदयाचा तपास करुन २१, १५, २७ किती करायचे आहे ते करता येईल व सदस्य असतील आणि ९ चे कॅलक्युलेशन दिलेले आहे ते आपण उपविधीप्रमाणे दिलेले आहे असे तरी मुद्दामहून दिलेले नाही.

**मिलन पाटील :-**

मा. महापौर साहेब, सचिव, आयुक्त जे गोषवारा देतात ते कायदयाच्या चौकटीमध्ये बसूनच त्यांना द्यावा लागतो. अन्यथा ते गोषवारा उलट सुलट असे काही देवूच शकत नाही. त्यांनी हे नियमामध्ये बसूनच दिलेले आहे. सन्मा. नगरसेवक प्रफुल्ल पाटील साहेब सांगतात की असे काही एक गोषवारे फेकलेले आहेत. कसे फेकतील. कितीतरी ठराव आयुक्तांनी गोषवारा न दिल्यामुळे फेटाळलेले आहेत. गोषवारा हा कायदयाच्या चौकटीत बसूनच सचिव आणि आयुक्तांना देणे बंधनकारक आहे. गोषवारा कायदयाच्या चौकटीत बसूनच तुम्हांला दयावा लागेल. हा गोषवारा बरोबर आहे. याप्रमाणे तुम्ही घ्यावे. नाहीतर, पुढच्या सभेला विषय ठेवावा असे मा. महापौरांनी रुलिंग दिलेले आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

सन्मा. सदस्य मिलन पाटील यांना आठवण करुन देतो. त्यांनी याकरिता सभागृहामध्ये एवढा गोंधळ घातला होता. काही कर्मचाऱ्यांना कायम करणेबाबतचा विषय आणला होता आणि त्यांना जे पाहिजे त्या कर्मचाऱ्यांची नाव आपण त्या गोषवाऱ्यात दिली नव्हती. त्यावेळी त्यांनी एवढे आकांड-तांडव केले होते की, तुमचा गोषवारा त्यांनी फेकून दिला होता. हा गोषवारा तुम्ही चुकीचा दिलेला आहे. ह्या कर्मचाऱ्यांची नावे तुम्ही आणलेली नाहीत. हे ते विसरले.

**मिलन पाटील :-**

मी चांगल्यासाठी केले होते.

**प्रफुल्ल पाटील :-**

मी तेच म्हटले होते तुम्ही चांगल्यासाठी केले होते.

**मा. महापौर :-**

आपण सदरचा विषय पुढच्या सभेला रितसर आणू या. सचिवजी पुढील विषयाला सुरुवात करा.

**एस. ए. खान :-**

आपण मतदानाच्या प्रक्रियेला सुरुवात करा.

**चंद्रकांत वैती :-**

सन्मा. सभागृह आपण या सभागृहाचा अपमान करत आहात. अधिकारी म्हणून सचिव आणि आयुक्त साहेब म्हणून आपण या सभागृहाचा अवमान करत आहात. सभागृहामध्ये वारंवार आपल्या निर्दशनास ही गोष्ट आणून दिली जाते, सचिव साहेब आपण आपली कार्यवाही प्रसिद्ध करावी का करत नाही? कुठेही सल्ला घेतला, काहीही घेतले तरी आपल्याला सदस्य येण्याचीच वाट बघावी लागणार आहे. मा. महापौर साहेब ते आपले काम नाही, जमत नाही जरा शांतपणे घ्या. लोकांच्या भावनांचा आदर करा. आम्ही काय कायदयाच्या बाहेर जायला सांगत नाही. येथे कोणालाही काही वेगळे सांगायची गरज नाही. कायदयात आहे, त्या कायदयाच्या कक्षेत राहून आम्ही ठराव मांडलेला आहे. आम्ही गांधीगिरी करत आहोत, आम्ही आपल्याला वारंवार विनंत्या करत आहोत. त्याचा अर्थ आपण काय घेता. आम्ही आक्रमकपणे सांगावे का, की अधिकारी आपल्या कर्तव्यात कसूर करतात त्यांच्यावर कायदेशीर कार्यवाही करण्यांत यावी, असे आम्ही सांगावे का? प्रत्येकवेळी आपण अधिकाऱ्यांना वेठीस धरता, आपण अधिकाऱ्यांना काय सांगता आणि काय समजावून वेठीस सांगणार आहात? काहीही करु शकत नाही हा ठराव झाल्याशिवाय दुसऱ्या कोणत्याही प्रकारची कार्यवाही करता येणार नाही. हा ठराव ताबडतोब करा. दोन तास वाट बघायला लावली आहे.

**मा. महापौर :-**

हा विषय रितसर आपण पुढच्या सभेपुढे आणू या आणि आता लंच टाईम घोषित करत आहे.

**(लंच टाईम :- दू. २.१०)**

**मा. महापौर :-**

सचिवजी जेवणानंतरच्या सभेला सुरुवात करावी.

**नगरसचिव :-**

मा. महापौर साहेबांच्या परवानगीने सभेला सुरुवात करण्यात येत आहे.

**मा. महापौर :-**

या सभेपुढे ९ सदस्यांची समिती गठीत करण्यासाठी विषय होता. सर्व सभागृहाची भावना बघून असे दिसून येते की, आपण ही संख्या वाढवली पाहिजे. २१ सदस्यांचा आपण ठराव दिलेला आहे. पण ह्या करिता आपल्याला उपविधीमध्ये परत फेरबदल करावा लागेल त्यासाठी शासनाच्या मंजूरीला पाठवावे लागेल व त्याकरिता अजून टाईम जाईल. माझी सभागृहाला अशी विनंती आहे की, जे ९ सदस्य गठीत करायचे आहे ते आज होउ दया व पुढच्यावर्षी करायचे आहे. त्यावेळी एकत्र विषय आणून त्याला आपण २१ किंवा १५ जी काय सभागृहाची भावना असेल तसे आपल्याला करता येईल. असे माझे सर्वांना निवेदन आहे. अन्यथा २१ सदस्याचा हा ठराव आपल्याला शासनाकडे मंजूरीसाठी पाठवावा लागेल आणि त्यात बराचसा वेळ जाईल. सन्मा. महिलांची भावना होती की, कामकाज लवकर चालू झाले पाहिजे तर त्यात अजून उशीर होईल.

**प्रफुल्ल पाटील :-**

मा. महापौरांकडे जेव्हा एखादा विषय चर्चेतून समोर येतो. सर्वांनी चर्चा केली ती आपण ऐकली. त्या चर्चेमध्ये काय कार्यवाही झाली ती पण आपण पाहिली. आज सभागृह या कार्यवाहीवर आले आहे की, संयुक्त लोकशाही आघाडीने आपल्यासमोर एक ठराव ठेवलेला आहे. चार लोकांनी उठून मतदानाची मागणी केलेली आहे. या ठरावाला तुम्ही बाद करणार आहात की, पुढे नेणार आहात. ती कार्यवाही करा. आपण पुढे काय करु, नंतर काय करु. कारण कुठलेही सभागृह हे आश्वासनावर चालत नाही. या ठरावावर तुम्हांला अंतिम निर्णय घ्यावा लागेल. हा ठराव आम्ही घेतो की फेटाळतो. अंतिम निर्णय घेतला तरच तुमची कार्यवाही पूर्ण होईल. आश्वासन काय देता. जे तुमच्या हातात नाही. जे आमच्या हातात नाही. त्याच्यावर आश्वासन देण्याचा याठिकाणी प्रश्नच येत नाही.

**मा. महापौर :-**

महिला व बालकल्याण सदस्य समिती गठीत करायचे आहे ते लांब जाईल.

**चंद्रकांत वैती :-**

मा. महापौर साहेब, लांब जाईल, जवळ येईल त्याच्यावर चर्चा करण्यापेक्षा आतापर्यंत निःस्पष्टपणे सभागृहात आरोप करत आहे की, अधिकाऱ्यांनी आपल्याला बचावले. गेले दोन ते अडीच तास या विषयावर चर्चा झालेली आहे. अधिकारी तुम्हांला सांगत आहे की, तो ठराव विधीवत आहे. तुम्हांला बोलायला काय हरकत आहे. त्याच्यावर कार्यवाही करा असे. तुम्ही सांगा ना, कार्यवाही करा. तुम्ही कुठे पाठवणार आहात? कोणाकडे पाठवणार आहात? शासनाकडे म्हणजे कोणाकडे पाठवणार आहात तेही स्पष्ट करुन सांगावे. तुम्ही प्रत्येक गोष्टीकरिता अधिकाऱ्यांशी चर्चा कराल.सभागृहात काय चालले आहे ते त्या कामकाजावर आपले लक्ष नाही. आज फक्त नेमणुकींचा प्रश्न आहे आणि त्या नेमणुकांबाबत आम्ही स्पष्ट ठराव दिलेला आहे. मतदानाची मागणी केली आहे आणि आज तर तुम्ही भर सभागृहात सदस्यांचा अपमान करुन सभागृह सोडून गेले. ही कुठची पद्धत आहे. आम्ही अधिकाऱ्यांवर कार्यवाही करण्याची मागणी करायची किंवा कसे काय? सर्वप्रथमच अर्थ असा निघाला की, अधिकाऱ्यांना आपण वेठीस धरलेले आहे किंवा अधिकारी आपले वेठीस बांधलेले

आहेत. सचिव साहेब, आपली जबाबदारी बनते. आपण सांगावे या ठरावावर काय कार्यवाही होते की नाही ते मा. महापौरांना स्पष्ट सांगावे कोणाकडून तज्ञ मंडळीकडून आम्हांला आणखिन चर्चेची अपेक्षा नाही. याच्यावर निर्णय व्हावा.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहेब, सर्वप्रथम मी सचिवांना असा प्रश्न उपस्थित केला होता की समजा ह्यांचा ठराव घेतला आणि ठरावाने २१ सदस्यांची निवडणुक करायची असे ठरले. त्या २१ लोकांची नेमणुक या सभागृहामध्ये या ठरावानंतर नियमाने होणार किंवा नाही? त्याला काय उपविधी आहे किंवा त्या उपविधीचे तुम्ही काय करणार ते सांगा. म्हणजे ९ लोक नेमली नाही तर २१ लोक नेमणार. २१ लोक नेमणार ते विधीवत असणार का? कारण आपली जी उपविधी पाठवलेली आहे त्याचा तुम्ही येथे उल्लेख करा. शेवटी ९ ही होणार नाही २१ ही होणार नाही आणि ही समिती वर्षभर रखडेल आणि जे महिलांसाठी सांगतात की, महिलांसाठी कल्याण करु. तर या ठरावामुळे महिला एक वर्ष वंचित राहतील. म्हणून याचा ही खुलासा सचिवांनी करावा. महिलांना कळू दया की, या प्रोसीजरला किती वेळ जाणार आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

धन्यवाद. आपल्या आपुलकीबद्दल. तुम्ही पुढच्या कार्यवाहीबद्दल बोलता. आमची मागची कार्यवाही आहे त्याच्यावर पहिल्यांदा मा. महापौरांनी डिसीजन घेउ दे. मग नंतर तुमची ती पुढची कार्यवाही येणार.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आपली उपविधी गेलेली आहे. उपविधीचा उल्लेख ही झाला पाहिजे.

**प्रफुल्ल पाटील :-**

सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवालजी आपण हुशार नगरसेवक आहात, अनुभवी आहात. सुशिक्षित, सुसंस्कृत आहात. पण असे असताना आम्ही कधी तुमच्यामध्ये बोलत नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आपली कविता आम्हाला अपेक्षित नाही.

**प्रफुल्ल पाटील :-**

तुम्हांला काहीच अपेक्षित नसते कोणी लाथा न मारलेल्या ही अपेक्षित नसते. हे चांगले नाही. दुसरे बोलत असताना आपण बोलायचे. आम्ही तुमच्यामध्ये कधी बोलत नाही. आम्ही कार्यवाही करण्यासाठी जी सुचना दिली आहे ठराव दिला आहे. त्याच्यावर तुम्ही रुलिंग दया.

**जयंत पाटील :-**

अध्यक्ष महाशय, शासनाकडे आपण जी सुचना गेलेली आहे, महिला व बालकल्याण समितीमध्ये ९ सदस्यांची नेमणुक व्हावी म्हणून शासनाने ही सुचना आपल्याला दिलेली आहे त्या सुचनेचा क्रमांक पी.एन.सी.एन.जी./जी.ए.डी.-२५ दि. १६/२/०२ या सुचनेनुसार महिला व बालकल्याण समितीमध्ये ९ सदस्यांची नेमणुक व्हावी असे ठरलेले आहे आणि ते मंजूरीसाठी शासनाकडे आहे. ह्या कमिटीमध्ये आपल्याला सदस्य संख्या वाढवायची असेल तर शासनाची पूर्व मंजूरी घेणे गरजेचे आहे. ४५५ च्या नियमानुसार ४५४ आणि ४५५ आपण जर वाचून बधितले तर आपल्या लक्षात येईल कलम ४५४ अन्वये कोणताही नियम करण्याचा, त्यात भर घालण्याचा फेरफार करण्याचा किंवा तो विखंडीत करण्याचा अधिकार हा राज्य शासनाच्या मंजूरीच्या आणि पुर्व प्रसिद्धीनंतर नियम करण्याच्या शर्तीवर अधिन राहील. जर महिला व बालकल्याण समिती आपल्याला गठीत करुन लवकरात लवकर त्यांचे कार्य हवे त्यांनी कार्य करावे असे वाटत असेल तर आपण ९ सदस्यांच्या कमिटीनुसार ही समिती गठीत करावी आणि कार्य चालू करावे व आपल्याला जर सदस्य संख्या वाढवायची असेल तर आपण शासनाकडे, शासनाच्या मंजूरीसाठी तो विषय पाठवावा अशी माझी आपल्याला विनंती आहे.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्या निर्मला सावळेजी यांनी ठराव मांडलेला आहे तो ठराव प्रशासनाने शासनाकडे पाठवावा व त्याची रितसर मंजूरी घ्यावी आणि प्रशासनाने योग्य ती कार्यवाही करावी. सचिवजी पुढील विषयाला सुरुवात करावी.

**प्रकरण क्र. ०४ :-**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३० (१) चे तरतुदीनुसार महिला व बालकल्याण समिती गठीत करणेबाबत.

**ठराव क्र ०५:-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेची सार्वत्रिक निवडणूक १२.०८.२००७ रोजी होउन नव्याने महानगरपालिका अस्तित्वात आलेली आहे. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३० मधील तरतुदीनुसार नव्याने विशेष समित्यांच्या नेमणूका करावयाच्या आहेत. प्रकरण क्र. ४ नुसार महिला व बालकल्याण समिती गठित करावयाची आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेने यापूर्वी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमाच्या अनुसूची २ मधील कामकाजाविषयक नियमात सुधारणा करुन नवीन प्रारुप नियम तयार केले होते. याप्रारुप नियमाच्या नियम क्र. ४ (ब) नुसार महिला व बालकल्याण समितीच्या सदस्यांची संख्या ९ ठरविली होती. परंतु, नियम

४ब (२) ४ (क) नुसार महिला व बालकल्याण समितीची रचना व मुदती संदर्भात ठराव करण्यास महासभेच्या अधिकारास बाधा आणलेली नाही. सदरचे नियम प्रारुप नियम असून, त्यास अजून अंतिम मंजूरी दिलेली आहे. तसेच मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३० (७) नुसार महानगरपालिकेस कोणत्याही वेळी विशेष समितीचे विसर्जन करता येईल किंवा तिच्या रचनेत फेरफार करता येईल अशी तरतुद आहे.

प्रशासनाने दिलेल्या गोषवाऱ्यानुसार सदर समितीची सदस्य संख्या ९ दर्शविण्यात आली आहे. सदर संख्येबाबत मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ नुसार अशाप्रकारे अशी कोणतीही विशिष्ट संख्येची नोंद कायदयामध्ये नाही. याउलट कलम ३०(७) नुसार महासभेस सदर समितीची रचना कोणत्याही वेळेस बदलता येईल अशा तरतुद आहे. त्यामुळे सदर गोषवारा चुकीचा असल्याने तो फेटाळण्यात येत आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेने मागील ५ वर्षात गठित केलेल्या महिला व बालकल्याण समितीचे कायदेशीर विर्सजन झाल्यामुळे ती समिती पुन्हा नव्याने गठित करणे व तिची पुर्नरचना करणेबाबतचा विषय आजच्या महासभेपुढे ठेवण्यात आला आहे.

ज्या अर्थी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३०(१) नुसार वरील समितीचे नेमणुक करण्याचे अधिकार महानगरपालिकेस आहेत असे नमुद केले आहे, त्या अर्थी हे अधिकार महासभेचे आहेत.

महिला व बालकल्याण समितीमध्ये महानगरपालिकेतील गटाच्या संख्याबळाच्या प्रमाणात सदस्यांची नामनिर्देशन करण्याची तरतुद मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३०(अ) चा (१) मध्ये केलेली आहे. तसेच कलम ३१(अ) चा (३) अन्वये पक्षाच्या किंवा गटाच्या वतीने नामनिर्देशित करावयाच्या पालिका सदस्यांच्या संख्येच्या बाबतीत कोणताही प्रश्न उद्‌भवल्यास त्याबाबतीत मा. महानगरपालिकेचा निर्णय अंतिम असेल असे नमुद केले आहे.

महानगरपालिकेत संयुक्त लोकशाही आघाडी गटाचे ४०, राष्ट्रवादी कॉंग्रेस गटाचे २५, भारतीय जनता पक्षाचे ९, शिवसेनेचे ५ असे संख्या बळाबळ आहे.

महिला व बालकल्याण समिती गठित करताना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमचे कलम ३० (१अ) अन्वये त्यामध्ये किमान ७५% महिला पालिका सदस्या असाव्यात अशी तरतुद आहे. याचा अर्थ महिला पालिका सदस्यांची संख्या कमाल १००% असू शकते.

वर्तमान स्थितीत महिलांना ३३ टक्के आरक्षण असल्यामुळे एकूण ७९ सदस्य संख्येच्या ३३% म्हणजे २७ महिला निवडून आल्या आहेत. साधारण प्रभागातून ६ महिला सदस्या अशाप्रकारे एकूण ३३ महिला पालिका सदस्या निवडून आलेल्या आहेत.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३० (१अ) व (७) अन्वये मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण समितीची नव्याने रचना करण्यात येउन त्यामध्ये कमाल १००% महिलांची नेमणूक करण्यांत येत आहे व एकूण सदस्यांची संख्या २१ करण्यांत येत आहे. असा ठराव मांडण्यात येत आहे.

**सुचक :- श्रीम. निर्मला सावळे.** **अनुमोदन :- श्रीम. नयना म्हात्रे.**

**ठराव बहुमताने मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. ५ चे वाचन केले.)

**प्रकरण क्र. ०५:-** महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे आरक्षण व जतन (सुधारणा) अधिनियम १९७५ अन्वये वृक्ष प्राधिकरण समितीच्या सदस्य पदासाठी नियुक्ती करणे.

**मा. महापौर :-**

सर्व पक्षाच्या गटनेत्यांनी आपआपल्या पक्षाच्या सदस्यांची नावे दयावीत.

(सन्मा. सदस्य श्री. एस. ए. खान यांनी प्रकरण क्र. ५ च्या ठरावाचे सभागृहासमोर वाचन केले.)

**प्रकरण क्र. ५ :-**

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे आरक्षण व जतन (सुधारणा) अधिनियम १९७५ अन्वये वृक्ष प्राधिकरण समितीच्या सदस्य पदासाठी नियुक्ती करणे.

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ मधील प्रकरण २ नियम ३(१) अन्वये मिरा भाईंदर महानगरपालिका वृक्षप्राधिकरण समितीवर ९ पालिका सदस्यांची नियुक्ती होणे आवश्यक आहे.

महानगरपालिकेच्या नवनिर्वाचित सदस्यांनी मा. विभागीय आयुक्त सो. कोकण विभाग यांचे कार्यालयात नोंदणी करून गट/आघाडी/फ्रंट तयार केल्याप्रमाणे तौलनिक पद्धतीनुसार गटनिहाय वृक्षप्राधिकरण समितीवर खालीलप्रमाणे सदस्य संख्या प्रस्तावित होती.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | संयुक्त लोकशाही आघाडी | - | ०७ |
| २. | भारतीय राष्ट्रवादी कॉंग्रेस | - | ०४ |

३. भारतीय जनता पार्टी - ०१
४. शिवसेना - ०१

याप्रमाणे वृक्षप्राधिकरण समितीवर खालील सदस्यांची एक वर्षाच्या मुदतीकरिता नियुक्ती करण्यात येत आहे.

| अ.क्र. | सदस्यांचे नाव | फ्रंट / आघाडी |
|---|---|---|
| १. | श्री. शशिकांत भोईर | संयुक्त लोकशाही आघाडी |
| २. | श्री. मिलन वसंत म्हात्रे | संयुक्त लोकशाही आघाडी |
| ३. | श्री. मधुसुधन पुरोहीत | संयुक्त लोकशाही आघाडी |
| ४. | श्रीम. कंचन पुजारी | संयुक्त लोकशाही आघाडी |
| ५. | श्रीम. नयना गजानन म्हात्रे | संयुक्त लोकशाही आघाडी |
| ६. | श्री. हरिश्चंद्र म्हात्रे | संयुक्त लोकशाही आघाडी |
| ७. | श्री. झुबेर इनामदार | संयुक्त लोकशाही आघाडी |
| ८. | श्री. प्रविण मोरेश्वर पाटील | शिवसेना |
| ९. | श्री. मिलन गोविंदराव पाटील | राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी |
| १०. | सौ. वंदना रामदास चक्रे | राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी |
| ११. | सौ. हेमा रविंद्र माळी | राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी |
| १२. | सौ. वंदना मंगेश पाटील | राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी |
| १३. | सौ. पांडे स्नेहा शैलेश | भारतीय जनता पार्टी |

**सय्यद नुरजहाँ नझर हुसैन :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर साहेब, आपले तीन तास जवळ जवळ त्या गोषवाऱ्यावर फुकट गेले. आता या विषयाचा गोषवारा नाही. मग ही कमिटी आपण बनवायची नाही का? आतापर्यंत अनेक विद्वान नगरसेवक बोलले की, गोषवारा नियमानुसार कायदेशीर असला पाहिजे आणि गोषवारा म्हणजेच सगळं आहे. या विषयावर सचिवांनी गोषवारा दिलेला नाही तर आपले म्हणणे काय आहे? सचिवांचा यावर ओपिनियन घ्या. ह्याचा स्पेशल ॲक्ट आहे. ॲक्टला अनुसरुन त्याचे कमिशनर कोण आहे व बाकीचे सदस्य किती? हा गोषवारा आला पाहिजे. उदया तुम्ही १४ केले तरी अनुकुल बसते आणि १६ केले तरी अनफुल बसते. याचा गोषवारा सचिवांनी का दिला नाही?

**मा. महापौर :-**

सचिव साहेब, ह्याचे उत्तर दया आणि ह्याच्यापुढे जेव्हा गोषवारा पाठवणार तेव्हा १ ते ५० किंवा १ ते ६० पान आहेत ते लिहा व त्याच्यावर सही घ्या.

**नगरसचिव :-**

ह्याची संख्या फिक्स आहे. ५ ते १५ मधून संख्या ठरवून फिक्स करायची आहे.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, संख्येचा वाद नाही. तुम्ही ज्यावेळेला विषयपत्रिकेवर विषय देता त्या गोषवाऱ्यावरुन आमचे तीन तास फुकट गेले. तुम्ही दिलेला गोषवारा बरोबर आहे असे या सगळ्यांचे म्हणणे होते मग याला गोषवारा नाही.

**नगरसचिव :-**

सभागृहाने संख्या ठरवून निर्णय घ्यायचा आहे.

**मिलन म्हात्रे :-**

प्रश्न संख्येचा नाही. विषय घुमवून फिरवून आणू नका. विषयपत्रिकेनुसार गोषवारा का नाही. आणि मगाशी एवढया तासभर झालेल्या चर्चेनुसार गोषवारा नसेल तर हा विषय घ्यावा का?

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे आपल्याकडे चुकून गोषवारा आला नसेल, मिसप्लेस झाला असेल तर याबद्दल आपले काय म्हणणे आहे ते मांडावे.

**मिलन म्हात्रे :-**

आमचे हे म्हणणे आहे की, आता डायसवर हा विषय तुम्ही चर्चेला घ्यावा का? मगाशी आपले तीन तास फुकट गेले ना.

**मा. महापौर :-**

आपले काय म्हणणे आहे ते सांगा.

**मिलन म्हात्रे :-**

माझे म्हणणे हे आहे की, सचिवांनी ते का घेतले नाही याचा पहिला तपास करा. हे असेच कामकाज गेल्या पाच वर्षात चालू आहे. आपण रुलिंग काय दिले?

**मा. महापौर :-**

पुढच्यावेळी गोषवाऱ्याचे पान क्रमांक लिहा. १ ते १०० असे किती पाने आहेत व त्याच्यावर सही घ्या की, १ ते १०० पाने दिलेली आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

या विषयाचा गोषवारा दिलेला नाही. ही चुक सचिवांनी कबूल केली आहे का? त्यांना माईकवर कबूल करु दया. तो त्यांचा लुकआउट आहे. तुम्ही प्रश्न विचारा ना, की तुमची चुक झाली आहे ती सभापटलासमोर आली पाहिजे. गोषवाऱ्यामुळे या सभागृहात तीन तास फुकट गेले आहे. सचिवांनी चुक झाली आहे असे त्यांनी कबूल करावे. आपल्या कार्यालयातून ही चुक झाली आहे हे मान्य आहे का?

**नगरसचिव :-**

होय, मान्य आहे.

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. ५ च्या ठरावाचे परत सभागृहासमोर वाचन केले.)

**प्रकरण क्र. ५ :-**

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे आरक्षण व जतन (सुधारणा) अधिनियम १९७५ अन्वये वृक्ष प्राधिकरण समितीच्या सदस्य पदासाठी नियुक्ती करणे.

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ मधील प्रकरण २ नियम ३(१) अन्वये मिरा भाईंदर महानगरपालिका वृक्षप्राधिकरण समितीवर ९ पालिका सदस्यांची नियुक्ती होणे आवश्यक आहे.

महानगरपालिकेच्या नवनिर्वाचित सदस्यांनी मा. विभागीय आयुक्त सो़. कोकण विभाग यांचे कार्यालयात नोंदणी करून गट/आघाडी/फ्रंट तयार केल्याप्रमाणे तौलनिक पद्धतीनुसार गटनिहाय वृक्षप्राधिकरण समितीवर खालीलप्रमाणे सदस्य संख्या प्रस्तावित होती.

१. संयुक्त लोकशाही आघाडी - ०७
२. भारतीय राष्ट्रवादी काँग्रेस - ०४
३. भारतीय जनता पार्टी - ०१
४. शिवसेना - ०१

याप्रमाणे वृक्षप्राधिकरण समितीवर खालील सदस्यांची एक वर्षाच्या मुदतीकरिता नियुक्ती करण्यात येत आहे.

| अ.क्र. | सदस्यांचे नाव | फ्रंट / आघाडी |
|---|---|---|
| १. | श्री. शशिकांत भोईर | संयुक्त लोकशाही आघाडी |
| २. | श्री. मिलन वसंत म्हात्रे | संयुक्त लोकशाही आघाडी |
| ३. | श्री. मधुसुधन पुरोहीत | संयुक्त लोकशाही आघाडी |
| ४. | श्रीम. कंचन पुजारी | संयुक्त लोकशाही आघाडी |
| ५. | श्रीम. नयना गजानन म्हात्रे | संयुक्त लोकशाही आघाडी |
| ६. | श्री. हरिश्चंद्र म्हात्रे | संयुक्त लोकशाही आघाडी |
| ७. | श्री. जुबेर इनामदार | संयुक्त लोकशाही आघाडी |
| ८. | श्री. प्रविण मोरेश्वर पाटील | शिवसेना |
| ९. | श्री. मिलन गोविंदराव पाटील | राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी |
| १०. | सौ. वंदना रामदास चक्रे | राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी |
| ११. | सौ. हेमा रविंद्र माळी | राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी |
| १२. | सौ. वंदना मंगेश पाटील | राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी |
| १३. | सौ. पांडे स्नेहा शैलेश | भारतीय जनता पार्टी |

**सुचक :- श्री. एस. ए. खान** **अनुमोदक :- श्रीम. सय्यद नुरजहाँ नझर हुसैन**

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आपले मत काय?

**नगरसचिव :-**

५ ते १५ सदस्य असावे असे वृक्षप्राधिकरण समितीच्या कायदयात तरतुद आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आता आपण वाढवू शकतो का?

**नगरसचिव :-**

५ ते १५ च्या बाहेर वाढवू शकत नाही. ५ ते १५ फिक्स केलेले आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आपण या सभेमध्ये १५ करु शकतो का?

**नगरसचिव :-**

होय.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

सचिवजी प्रत्येक पक्षातून किती सदस्यांची नावे दयायची आहेत ते सांगा.

**नगरसचिव :-**

१३ प्रमाणे कोटा आलेला आहे ते प्रत्येक पक्षाप्रमाणे सांगतो. संयुक्त आघाडीला ६.१८ म्हणजे ७ सदस्य, राष्ट्रवादी कॉंग्रेसला ४.११ म्हणजे-४ सदस्य, भारतीय जनता पक्ष १.४८-१ सदस्य आणि शिवसेनेला ०.८२ म्हणजे १ सदस्य असे एकूण १३ सदस्य आहेत.

**अनंत पाटील :-**

सचिव साहेब, आपण पूर्वी जो तौलानिक तक्ता दिला होता त्याप्रमाणे पक्षनिहाय सदस्यांनी तुम्हांला ज्यांची ज्यांची उमेदवारी डिक्लर झालेली आहे त्यांना दिलेले आहे. तौलानिक तक्ता हा सर्व नगरसेवकांचे दिशाभूल करणार आहे की, कसा काय?

**नगरसचिव :-**

ह्याच्या अगोदर तौलानिक तक्ता दिलेला होता. ह्याचा दिलेला नाही व गोषवारा ही दिलेला नाही.

**अनंत पाटील :-**

गोषवारा दिला नसताना ही आपण हिसाबात ताबडतोब डिक्लरेशन १५ किंवा ५ सदस्यांचे करता.

**नगरसचिव :-**

सभागृहाने सदस्य संख्या फिक्स करताना कोटा कसा बसवतो तो काढून कॅलक्युलेशन करुन मी दिलेले आहे. सभागृहाने ती संख्या निश्चित करायची आहे. त्या संख्येप्रमाणे कोटा किती बसतो ते मी कॅलक्यूलेशन करुन दिलेले आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

सचिव साहेब, सभागृहातील १३ सदस्य आणि १ तज्ञ तर तज्ञ कुठला बाहेरचा. तो घेण्याचा अधिकार वृक्षप्राधिकरणाला आहे का? म्हणजे आपण उपविधीमध्ये फेरबदल करत आहोत. बाहेरचा सदस्य घेण्याचा अधिकार या मा. महासभेला आहे का, ते पहिल्यांदा सांगा. १ तज्ञ हा तीन वर्षाचा अनुभवी.

**मा. आयुक्त :-**

आहे.

**नगरसचिव :-**

हा बी.पी.एम.सी. ॲक्टच्या बाहेरचा ॲक्ट आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. महापौर साहेब, ह्या विषयाचा गोषवारा नसल्यामुळे हा विषय पुढे घ्या.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

सचिव साहेब, माझे असे म्हणणे आहे की, जेव्हा आपण हा गोषवारा दिला. तुम्ही ९ सदस्यांची नेमणुक करा म्हणून विषय दिला. तुम्ही ह्याच्यात हा उल्लेख केला असता की एक तज्ञ माणूस बाहेरचा घेता येतो किंवा या अनुभवाचा हा अनुभव सचिवांना असतो. सभागृहातील सर्व सदस्यांना नाही म्हणजेच खरोखर जसे सन्मा. सदस्य अनंत पाटील बोलले की प्रत्येक वेळी दिशाभूल करण्याचा हा विषय आहे का? टिपणी देताना ५ ते १५ सदस्य त्याच्यातले १३ सदस्य, १ बाहेरचा तज्ञ सदस्य घेता येतो. या ॲक्टमध्ये आपण असा काहीतरी गोषवारा दिला पाहिजे होता. ही चुक तुम्ही मान्य करा.

**नगरसचिव :-**

गोषवारा दिलेला नाही हे मी तुम्हांला अगोदरच सांगितलेले आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

तुम्ही ही चुक मान्य करा.

**प्रेमनाथ पाटील :-**

एखादा चुक मान्य केली आहे. वारंवार चुक कशी मान्य करणार.

**मिलन पाटील :-**

गोषवारा दिला नाही म्हणून हा विषय पुढे घ्या. गोषवाऱ्याची आवश्यकता काय?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

तुमचा हा विषय चुकीचा आहे. ही सर्व बाजू सभागृहाला मांडून दिली पाहिजे. १५ सदस्य करता येते, तज्ञ बाहेरचा घेता येतो. हे तुम्ही न सांगता १५ सदस्य हे मान्य करतो पण एक बाहेरचा सदस्य हे तुम्ही सांगायला पाहिजे म्हणजे तुम्ही सभागृहाची दिशाभूल केली आहे म्हणून हा विषय पुन्हा गोषवारा देवून सभागृहात आणावा अशी आमची सुचना आहे आणि ठराव आहे. एक तज्ञ बाहेरचा घ्यायचा आहे हा वेगळा विषय झालेला आहे. आतापर्यंत महापालिकेचा जी.आर आहे की, बाहेरचा सदस्य घेता येत नाही आणि तुम्ही

आता सांगितले की, वृक्षप्राधिकरणचा बी.पी.एम.सी. ॲक्ट वेगळा आहे. मग तुम्ही आम्हांला ते गोषवाऱ्यामध्ये दिले पाहिजे होते.

**मिलन म्हात्रे :-**

सर्वांना मागच्या सभागृहात दिले होते. पाच वर्ष आमच्याबरोबर बाहेरचा सदस्य होता. वृक्षप्राधिकरणाचे कायद्याचे पुस्तक सर्वांना मिळाले आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

सचिव साहेब, माझे असे म्हणणे आहे की, तुम्ही गोषवारा दिलेला नाही की, तज्ञ माणूस घेउ शकतो. बी.पी.एम.सी. ॲक्टचा आपण खुलासा करा किंवा तुमची चुक झाली आहे हे आपण सभागृहामध्ये कबूल करा.

**नगरसचिव :-**

सन्मा. सदस्यांची जी नावे यायची आहेत ती लवकरात लवकर द्यावी.

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. ५ च्या ठरावाकरिता आलेल्या सदस्यांच्या नावाचे वाचन केले.)

**प्रकरण क्र. ५ :-**

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे आरक्षण व जतन (सुधारणा) अधिनियम १९७५ अन्वये वृक्ष प्राधिकरण समितीच्या सदस्य पदासाठी नियुक्ती करणे.

**ठराव क्र. ०६ :-**

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ मधील प्रकरण २ नियम ३(१) अन्वये मिरा भाईंदर महानगरपालिका वृक्षप्राधिकरण समितीवर ९ पालिका सदस्यांची नियुक्ती होणे आवश्यक आहे.

महानगरपालिकेच्या नवनिर्वाचित सदस्यांनी मा. विभागीय आयुक्त सोा. कोकण विभाग यांचे कार्यालयात नोंदणी करून गट/आघाडी/फ्रंट तयार केल्याप्रमाणे तौलनिक पद्धतीनुसार गटनिहाय वृक्षप्राधिकरण समितीवर खालीलप्रमाणे सदस्य संख्या प्रस्तावित होती.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | संयुक्त लोकशाही आघाडी | - | ०७ |
| २. | भारतीय राष्ट्रवादी कॉंग्रेस | - | ०४ |
| ३. | भारतीय जनता पार्टी | - | ०१ |
| ४. | शिवसेना | - | ०१ |

याप्रमाणे वृक्षप्राधिकरण समितीवर खालील सदस्यांची एक वर्षाच्या मुदतीकरिता नियुक्ती करण्यात येत आहे.

| अ.क्र. | सदस्यांचे नाव | फ्रंट / आघाडी |
|---|---|---|
| १. | श्री. शशिकांत भोईर | संयुक्त लोकशाही आघाडी |
| २. | श्री. मिलन वसंत म्हात्रे | संयुक्त लोकशाही आघाडी |
| ३. | श्री. मधुसुधन पुरोहीत | संयुक्त लोकशाही आघाडी |
| ४. | श्रीम. कंचन पुजारी | संयुक्त लोकशाही आघाडी |
| ५. | श्रीम. नयना गजानन म्हात्रे | संयुक्त लोकशाही आघाडी |
| ६. | श्री. हरिश्चंद्र म्हात्रे | संयुक्त लोकशाही आघाडी |
| ७. | श्री. झुबेर इनामदार | संयुक्त लोकशाही आघाडी |
| ८. | श्री. प्रविण मोरेश्वर पाटील | शिवसेना |
| ९. | श्री. मिलन गोविंदराव पाटील | राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी |
| १०. | सौ. वंदना रामदास चक्रे | राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी |
| ११. | सौ. हेमा रविंद्र माळी | राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी |
| १२. | सौ. वंदना मंगेश पाटील | राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी |
| १३. | सौ. पांडे स्नेहा शैलेश | भारतीय जनता पार्टी |

**सुचक :- श्री. एस. ए. खान** **अनुमोदक :- श्रीम. सय्यद नुरजहाँ नझर हुसैन**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. ६ चे वाचन केले.)

प्रकरण क्र. ०६ :- मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २९(अ) अन्वये मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या हद्दीत चार प्रभाग समित्या स्थापन करणेबाबत. (भौगोलिक रचनेस मान्यता देणे.)

**जयंत पाटील :-**

मा. महापौर साहेब, २९(अ) नुसार आपण जो तक्ता दिलेला आहे त्या तक्त्यानुसार साडेचार लाखापेक्षा अधिक व बारा लाखापर्यंत प्रभाग समित्यांची कमाल संख्या ९ आणि गोषवाऱ्यामध्ये आपण महानगरपालिकेची लोकसंख्या ५ लाख २० हजार दाखवलेली आहे. साडेचार लाखापासून बारा लाखापर्यंत बसायला पाहिजे. माझा विषय लोकसंख्युनुसार जो तक्ता आहे २९(अ) नुसार त्याच्यावर मी चर्चा करीत आहे. तुम्ही ५ लाख २० हजार संख्या दाखवता आणि साडेचार लाखापासून बारा लाखापर्यंत प्रभाग समितीची ९ संख्या दाखवता तर मग तुमच्या त्या तक्त्याप्रमाणे बसायला पाहिजे.

**नगरसचिव :-**

३ लाखापेक्षा अधिक व साडेचार लाखापर्यंत तीन. म्हणजे साडेचार लाखापेक्षा अधिक बारा लाखापर्यंत. दिड लाखाला एक समिती.

**जयंत पाटील :-**

ह्याच्यात आपले नउ बसतात का?

**नगरसचिव :-**

नाही. नउ बसत नाही. अतिरिक्त दिड लाखाला एक पडेल.

**जयंत पाटील :-**

माझे दुसरे म्हणणे असे आहे की, प्रभाग समिती क्र. १ मध्ये आपल्या नगरसेवकांची संख्या २२ आहे. वॉर्डाची संख्या २ मध्ये २३ आहे. ३ मध्ये १५, ४ मध्ये १९ म्हणजे ह्या संख्येमध्ये कुठलीही समानता नाही. आपल्यावरचे गोषवाऱ्यामध्ये निवेदन आहे. प्रशासकीय अधिकाराचे विकेंद्रीकरण व्हावे. सगळ्यांना सारखा न्याय मिळावा. सर्वांना काम करायची संधी मिळावी व धोरणानुसार प्रभागाचा विकास व्हावा. तुम्ही जर ३ प्रभागाची सदस्य संख्या १५ दाखवली. त्यामुळे त्यांना मिळणाऱ्या फंडामध्ये तफावत येईल. व त्या प्रभागाला शेवटी अन्यायकारक होईल हे माझे मत आहे. तुम्ही त्या प्रभागाची संख्या समान करण्याचा प्रयत्न करा. भौगोलिक रचनेनुसार आपण हे करायला विषय आणलेला आहे. मी ह्याच्यामध्ये असे पाहिले की, १४ नंबर जे शिर्डीनगर आहे त्याची भौगोलिक रचना जर आपण बघितली. नवघर फाटक रोड सरळ जातो. तेवढा वॉर्ड उचलून तुम्ही ह्या बाजुला टाकले आहे. हे तुम्हाला मान्य करायला पाहिजे. म्हणजे तुम्ही तिथे भौगोलिक रचना बदलली आहे. तुम्ही माझ्या म्हणण्यानुसार आपण २२,२३,१५,१९ आहे. त्याच्यात समानता आणण्याची भौगोलिक रचना बघून करावे अशी माझी आपल्याला सुचना आहे. ठराव नाही सुचना आहे.

**शशिकांत भोईर :-**

सन्मा. सदस्य जयंत पाटील (दादा) यांचा मान ठेवून प्रकरण क्र. ६ चा ठराव वाचत आहे.

(सन्मा. सदस्य शशिकांत भोईर यांनी प्रकरण क्र. ६ च्या ठरावाचे सभागृहासमोर वाचन केले.)

**प्रकरण क्र. ०६ :-**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २९(अ) अन्वये मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या हद्दीत चार प्रभाग समित्या स्थापन करणेबाबत. (भौगोलिक रचनेस मान्यता देणे.)

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २९ (अ) (१) अन्वये मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील संलग्न असलेल्या प्रभांगाच्या प्रभाग समित्या गठित करण्याचे अधिकार महानगरपालिकेस म्हणजेच मा. महासभेस दिलेले आहेत. कलम २९ अ (१) मध्ये दिलेल्या सुचीनुसार लोकसंख्येच्या प्रमाणात प्रभाग समित्यांची संख्या निश्चित केलेली आहे. सन २००१ च्या जनगणनेनुसार आपल्या मिरा भाईंदर महानगरपालिकेची लोकसंख्या ५,२०,३०१ असल्याने २९ अ (१) च्या सुचीनुसार ४ प्रभाग समित्या स्थापन करावायच्या आहेत. प्रभाग समित्या स्थापन करताना प्रत्येक समितीमध्ये समाविष्ट होणाऱ्या व एकमेकाशी संलग्न असणाऱ्या प्रभागांना एकत्रित करुन भौगोलिकदृष्टया सोयीस्कर व जवळपास समान लोकसंख्या असलेल्या एकत्रित प्रभागांच्या समित्या गठित करावयाच्या आहेत.

भाईंदर (पश्चिम) व मिरारोड (पश्चिम) विभागात लोकसंख्या २००१ च्या जनगणनेनुसार १,४८,४३२ इतकी असून, या विभागासाठी १ प्रभाग समिती गठित करता येईल.

भाईंदर (पूर्व), मिरारोड (पूर्व) तसेच काशीमिरा गावठण लक्ष्मीबाग, घोडबंदर, चेणे वर्सोवा, काजूपाडा या सर्व विभागांची लोकसंख्या २००१ च्या जनगणनेनुसार ३,७१,८६९ असून या विभागांना एकूण ३ प्रभाग समित्या गठित करता येतील.

वरीलप्रमाणे ३ प्रभाग समित्या गठित करताना प्रत्येक प्रभाग समितीस सरासरी १,२३,९५६ इतकी लोकसंख्या धरुन त्यानुसार संलग्न असलेल्या प्रभागांची प्रभाग समिती गठित करणे आवश्यक आहे. सन २००१ ची जनगणना करीत असताना तत्कालीन मिरा भाईंदर नगरपरिषदेचे एकूण ४७ वॉर्ड अस्तित्वात होते. अशा १ ते ४७ वॉर्डांचे वार्डनिहाय जनगणनेची आकडेवारी उपलब्ध आहे. तसेच प्रत्येक वार्डाच्या हद्दी निश्चित केलेल्या असून त्याची माहिती प्रशासनाकडे उपलब्ध आहे.

सार्वत्रिक निवडणुकीसाठी नवीन प्रभाग रचना करताना जनगणनेची आकडेवारी विचारात घेउन आकडेवारी सम प्रमाणात ठेवून प्रभागरचना केली जाते. अशा आकडेवारीतील तफावत ही त्या प्रभागातील

लोकसंख्येच्या १०% पेक्षा कमी किंवा जास्त प्रमाणात असता कामा नये. परंतु ही बाब भौगोलिकदृष्टया मोठया प्रमाणात बदल होत असल्यास किंवा नैसर्गिक हद्दीस बाधा येत असल्यास लागू होत नाही.

प्रशासनाने प्रभाग समित्यांची रचना स्थापन करणेसाठी प्रस्ताव मा. महासभेपुढे ठेवला आहे. सदर प्रस्तावाचे अवलोकन करता असे स्पष्ट दिसून येते की, प्रभाग समिती क्र. ३ व ४ ची रचना करतांना सदर प्रभाग समितीमध्ये समाविष्ट होणाऱ्या प्रभागांची सन २००१ च्या जनगणनेनुसार होणारी लोकसंख्या विचारात घेतलेली नाही. त्यामुळे प्रभाग क्र. ३ व प्रभाग क्र. ४ ची लोकसंख्या सन २००१ च्या लोकसंख्येच्या तुलनेत विषम प्रमाणात आहे. त्यामुळे ही सभा प्रशासनाच्या गोषवाऱ्यानुसार मा. महासभेपुढे आलेल्या प्रस्तावामध्ये दुरुस्ती सुचवीत आहे.

भाईंदर पश्चिम व मिरारोड पश्चिमेकडील सर्व प्रभागांसाठी १ प्रभाग समिती गठित करण्यात येत आहे. भाईंदर- पूर्वेकडील संलग्न प्रभागांसाठी व सरासरी लोकसंख्येच्या जवळपास असलेल्या लोकसंख्येसाठी १ प्रभाग समिती गठित करण्यात येत आहे. मिरा रोड पूर्वेकडील काही प्रभागांसाठी १ प्रभाग समिती गठित करण्यात येत आहे. भाईंदर-पूर्व येथील उर्वरित, मिरा रोड येथील उर्वरित व काशी, मिरा गावठण, घोडबंदर, चेणे, वर्सोवा, काजूपाडा या क्षेत्रांसाठी १ प्रभाग समिती गठित करण्यात येत आहे. वरीलप्रमाणे समित्या गठित केल्याने त्या समित्यांची भौगोलिकदृष्टया व नैसर्गिक हद्दीची रचना न बदलता तसेच प्रभाग समितीमध्ये समाविष्ट करावयाच्या प्रभागाच्या हद्दी कलम २९ अ (१) च्या अन्वये संलग्न असतील.

खालीलप्रमाणे प्रभाग समित्या स्थापन करणे कायदेशीर व रचनात्मकदृष्टया योग्य आहे.

| अ.क्र. | प्रभाग समिती क्र. | प्रभाग समिती क्षेत्रात समाविष्ट निवडणुक प्रभाग | एकूण प्रभाग |
|---|---|---|---|
| १ | **१** | १, २, २०, २१, २२, २३, २४, २५, २६, २७, २८, २९, ३०, ३१, ३२, ३३, ३४, ३५, ३६, ३७, ३८, ३९ | **२२** |
| २ | **२** | ३, ४, ५, ६, ७, ८, ९, १०, ११, १४, १५, १६, १७, १८, १९, ४०, ४१, ४२, ४३, ४४, ४७, ४८, ४९ | **२३** |
| ३ | **३** | १२, १३, ४५, ४६, ५१, ६१, ६३, ६८, ६९, ७०, ७१, ७२, ७३, ७४, ७५, ७६, ७७, ७८, ७९ | **१९** |
| ४ | **४** | ५०, ५२, ५३, ५४, ५५, ५६, ५७, ५८, ५९, ६०, ६२, ६४, ६५, ६६, ६७, | **१५** |

वरीलप्रमाणे प्रभाग समित्यांच्या रचनेमध्ये केलेल्या दुरुस्तीस ही सभा मान्यता देत आहे. असा ठराव मांडत आहे.

**एस. ए. खान :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**जयंत पाटील :-**

ह्या ज्या भौगोलिक रचना केल्या आहेत. त्या कोणी केल्या? शिर्डीनगर, भौगोलिक रचनेनुसार जो रस्ता गेला त्याच्या लेफ्ट साईडला आहे. पूर्वेला आहे आणि येथे भलतेच चालले आहे. आम्हाला या भौगोलिक रचनेबाबत माहिती पाहिजे.

**चंद्रकांत वैती :-**

मा. महापौर साहेब, ठराव मंजुर झाला असेल तर पुढचा विषय घ्यायला सांगा. सन्मा. शशिकांत भोईर साहेबांनी जो ठराव मांडला त्याबाबत त्यांनी अतिशय चांगला अभ्यास केला होता आणि भौगोलिक रचनेनुसार पाहिले तर त्याच्यात तुम्हाला नाव ठेवायला जागा नाही. अतिशय सुंदर कामकाज केलेले आहे. लोकसंख्येचा व्यवस्थित नियोजनबध्द अभ्यास करुन हा ठराव मांडलेला आहे आणि सत्तेचे विकेंद्रीकरण हा निकष लावून सगळ्यांना समान न्याय कसा देता येईल याचा तुलनात्मक अभ्यास करुन त्यांनी अतिशय चांगल्या पध्दतीने ठराव मांडलेला आहे. त्याच्यामुळे आपल्याला चॅलेंज करायची आवश्यकता नाही. तर त्या ठरावाला लगेच मान्यता द्या आणि पुढच्या विषयाला सुरुवात करा.

**मिलन म्हात्रे :-**

सन्मा. सदस्य श्री. जयंतदादा पाटील ह्यांच्या मनातील सगळ्या भावना त्याच्यात व्यक्त झालेल्या आहेत. त्याकरिता ठरावाला कुठलाही विरोध करु नये.

**मा. महापौर :-**

विषय क्र. ६, प्रभाग समितीची हद्दरेखा कायम करणेबाबत. सन्मा. सदस्य शशिकांत भोईर साहेबांनी अभ्यास करुन त्याच्यावर जे सुचवले आहे व ठरावाचे वाचन केले आहे आणि अनुमोदक व सुचक दिलेले आहे. ठरावाचे वाचन केले त्याला मंजुरी देत आहे आणि जी दुरुस्ती केली आहे ती फेटाळत आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

ठरावाचे वाचन सचिवांनी करायचे आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

नगरसचिवांनी वाचन करायचे आहे.

**मिलन म्हात्रे :-**

मॉडीफाय केलेल्या ठरावाचे सचिवांना वाचन करायला सांगा.

**एस. ए. खान :-**

दुरुस्ती करुन दिलेल्या ठरावाचे सचिवांनी वाचन करावे.

**जयंत पाटील :-**

सन्मा. सदस्य शशिकांत भोईर यांनी अतिशय अभ्यासपूर्ण रात्र - रात्र मेहनत करुन या प्रभागाची रचना केलेली आहे. तो ठराव आपण वाचून दाखवा. त्याला सुचक आणि अनुमोदक झालेले आहे त्या ठरावाचे सचिवांनी वाचन करावे.

**शशिकांत भोईर :-**

साहेब, आपणच सुचना केलेल्या आहेत. आपल्या सुचनेसह हा ठराव आहे.

**मा. महापौर :-**

कुठल्याही प्रकारची सुचना मांडलेली नाही.

**शशिकांत भोईर :-**

सन्मा. सदस्य मिलन पाटील साहेब स्वतः बोलत आहे की ही दुरुस्ती करा. ती दुरुस्ती करा.

**जयंत पाटील :-**

आमच्या सुचनांचे पालन आपण कधीपासून करायला लागला आहात.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आपण डायरेक्ट ठराव मांडला.

**शशिकांत भोईर :-**

ठराव मांडलेला आहे व त्यात त्यांनी ज्या सुचना केल्या आहेत त्यात दुरुस्त्या केल्या आहेत.

**जयंत पाटील :-**

आपण तो ठराव वाचून दाखवला आहे.

**मा. महापौर :-**

अनुमोदक व सुचक झालेले होते.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आम्ही अजून दुरुस्ती सांगितली नाही.

**शशिकांत भोईर :-**

मा. महापौर साहेब, जेव्हा आम्ही ठराव मांडला तेव्हा तुम्ही कशाला वेळ वाया घालवला. त्यावेळीच सांगायला पाहिजे होते.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य शशिकांत भोईर साहेब, आपण ज्या ठरावाचे वाचन केले व त्याला अनुमोदक व सुचक झालेले आहे त्या ठरावाला मी मंजुरी देत आहे आणि सचिवांनी त्याच ठरावाचे वाचन करावे.

**जयंत पाटील :-**

जर तो ठराव नसेल तर आपण टेपींग ऐकून घ्या आणि त्यानुसार तो ठराव करा.

**प्रफुल्ल पाटील :-**

जोपर्यंत सचिव ठरावाचे वाचन करीत नाही तोपर्यंत तो ठराव फायनल होत नाही. सचिव वाचन करेपर्यंत कोणत्याही दुरुस्त्या आम्ही सुचवू शकतो. उपसुचना मांडू शकतो. हे कायद्यामध्ये आहे. त्यामुळे तुमच्याकडे जो ठराव आला आहे तो वाचून दाखवा.

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. ६ च्या ठरावाचे वाचन सभागृहासमोर केले.)

**प्रकरण क्र. ०६ :-**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २९(अ) अन्वये मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या हद्दीत चार प्रभाग समित्या स्थापन करणेबाबत. (भौगोलिक रचनेस मान्यता देणे.)

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २९ (अ) (१) अन्वये मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील संलग्न असलेल्या प्रभांगाच्या प्रभाग समित्या गठित करण्याचे अधिकार महानगरपालिकेस म्हणजेच मा. महासभेस दिलेले आहेत. कलम २९ अ (१) मध्ये दिलेल्या सुचीनुसार लोकसंख्येच्या प्रमाणात प्रभाग समित्यांची संख्या निश्चित केलेली आहे. सन २००१ च्या जनगणनेनुसार आपल्या मिरा भाईंदर महानगरपालिकेची लोकसंख्या ५,२०,३०१ असल्याने २९ अ (१) च्या सुचीनुसार ४ प्रभाग समित्या स्थापन करावायच्या आहेत. प्रभाग समित्या स्थापन करताना प्रत्येक समितीमध्ये समाविष्ट होणाऱ्या व

एकमेकाशी संलग्न असणाऱ्या प्रभागांना एकत्रित करुन भौगोलिकदृष्टया सोयीस्कर व जवळपास समान लोकसंख्या असलेल्या एकत्रित प्रभागांच्या समित्या गठित करावयाच्या आहेत.

भाईंदर (पश्चिम) व मिरारोड (पश्चिम) विभागात लोकसंख्या २००१ च्या जनगणनेनुसार १,४८,४३२ इतकी असून, या विभागासाठी १ प्रभाग समिती गठित करता येईल.

भाईंदर (पूर्व), मिरारोड (पूर्व) तसेच काशीमिरा गावठण लक्ष्मीबाग, घोडबंदर, चेणे वर्सोवा, काजूपाडा या सर्व विभागांची लोकसंख्या २००१ च्या जनगणनेनुसार ३,७१,८६९ असून या विभागांना एकूण ३ प्रभाग समित्या गठित करता येतील.

वरीलप्रमाणे ३ प्रभाग समित्या गठित करताना प्रत्येक प्रभाग समितीस सरासरी १,२३,९५६ इतकी लोकसंख्या धरुन त्यानुसार संलग्न असलेल्या प्रभागांची प्रभाग समिती गठित करणे आवश्यक आहे. सन २००१ ची जनगणना करीत असताना तत्कालीन मिरा भाईंदर नगरपरिषदेचे एकूण ४७ वॉर्ड अस्तित्वात होते. अशा १ ते ४७ वॉर्डांचे वार्डनिहाय जनगणनेची आकडेवारी उपलब्ध आहे. तसेच प्रत्येक वार्डाच्या हद्दी निश्चित केलेल्या असून त्याची माहिती प्रशासनाकडे उपलब्ध आहे.

सार्वत्रिक निवडणुकीसाठी नवीन प्रभाग रचना करताना जनगणनेची आकडेवारी विचारात घेउन आकडेवारी सम प्रमाणात ठेवून प्रभागरचना केली जाते. अशा आकडेवारीतील तफावत ही त्या प्रभागातील लोकसंख्येच्या १०% पेक्षा कमी किंवा जास्त प्रमाणात असता कामा नये. परंतु ही बाब भौगोलिकदृष्टया मोठया प्रमाणात बदल होत असल्यास किंवा नैसर्गिक हद्दीस बाधा येत असल्यास लागू होत नाही.

प्रशासनाने प्रभाग समित्यांची रचना स्थापन करणेसाठी प्रस्ताव मा. महासभेपुढे ठेवला आहे. सदर प्रस्तावाचे अवलोकन करता असे स्पष्ट दिसून येते की, प्रभाग समिती क्र. ३ व ४ ची रचना करतांना सदर प्रभाग समितीमध्ये समाविष्ट होणाऱ्या प्रभागांची सन २००१ च्या जनगणनेनुसार होणारी लोकसंख्या विचारात घेतलेली नाही. त्यामुळे प्रभाग क्र. ३ व प्रभाग क्र. ४ ची लोकसंख्या सन २००१ च्या लोकसंख्येच्या तुलनेत विषम प्रमाणात आहे. त्यामुळे ही सभा प्रशासनाच्या गोषवाऱ्यानुसार मा. महासभेपुढे आलेल्या प्रस्तावामध्ये दुरुस्ती सुचवीत आहे.

भाईंदर पश्चिम व मिरारोड पश्चिमेकडील सर्व प्रभागांसाठी १ प्रभाग समिती गठित करण्यात येत आहे. भाईंदर- पूर्वेकडील संलग्न प्रभागांसाठी व सरासरी लोकसंख्येच्या जवळपास असलेल्या लोकसंख्येसाठी १ प्रभाग समिती गठित करण्यात येत आहे. मिरा रोड पूर्वेकडील काही प्रभागांसाठी १ प्रभाग समिती गठित करण्यात येत आहे. भाईंदर-पूर्व येथील उर्वरित, मिरा रोड येथील उर्वरित व काशी, मिरा गावठण, घोडबंदर, चेणे, वर्सोवा, काजूपाडा या क्षेत्रांसाठी १ प्रभाग समिती गठित करण्यात येत आहे. वरीलप्रमाणे समित्या गठित केल्याने त्या समित्यांची भौगोलिकदृष्टया व नैसर्गिक हद्दीची रचना न बदलता तसेच प्रभाग समितीमध्ये समाविष्ट करावयाच्या प्रभागाच्या हद्दी कलम २९ अ (१) च्या अन्वये संलग्न असतील.

खालीलप्रमाणे प्रभाग समित्या स्थापन करणे कायदेशीर व रचनात्मकदृष्टया योग्य आहे.

| **अ.क्र.** | **प्रभाग समिती क्र.** | **प्रभाग समिती क्षेत्रात समाविष्ट निवडणुक प्रभाग** | **एकूण प्रभाग** |
|---|---|---|---|
| १ | **१** | १, २, २०, २१, २२, २३, २४, २५, २६, २७, २८, २९, ३०, ३१, ३२, ३३, ३४, ३५, ३६, ३७, ३८, ३९ | **२२** |
| २ | **२** | ३, ४, ५, ६, ७, ८, ९, १०, ११, १४, १५, १६, १७, १८, १९, ४०, ४१, ४२, ४३, ४४, ४७, ४८, ४९ | **२३** |
| ३ | **३** | १२, १३, ४५, ४६, ५१, ६१, ६३, ६४, ६८, ६९, ७०, ७२, ७३, ७४, ७५, ७६, ७७, ७८, ७९ | **१९** |
| ४ | **४** | ५०, ५२, ५३, ५४, ५५, ५६, ५७, ५८, ५९, ६०, ६२, ६५, ६६, ६७, ७१ | **१५** |

वरीलप्रमाणे प्रभाग समित्यांच्या रचनेमध्ये केलेल्या दुरुस्तीस ही सभा मान्यता देत आहे. असा ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. शशिकांत भोईर.** **अनुमोदन :- श्री. एस. ए. खान.**

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. महापौर साहेब, सचिव साहेबांनी चुकीचा ठराव वाचलेला आहे. तुम्ही ओरीजनल ठराव वाचा.

**मा. महापौर :-**

सचिव साहेब, सन्मा. सदस्य शशिकांत भोईर साहेबांनी जो ठराव मांडलेला आहे. त्या ठरावाचे वाचन परत करा. ज्याला अनुमोदक आणि सुचक दिलेले आहे त्या ठरावाला मी मंजुरी देत आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

दुसरा कुठला ठराव असेल तो ठराव सचिवांनी आम्हाला दाखवावा. आम्ही जो ठराव दिलेला आहे तो पूर्ण वाचून दाखवा. आपण पूर्ण वाचून दाखवलेला नाही. आपण अर्धवट ठराव कसे वाचता?

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य शशिकांत भोईर साहेबांनी जो ठराव मांडलेला आहे त्यानंतर जी काही दुरुस्ती केली त्याला कोणी अनुमोदक व सुचक दिलेले नाही. म्हणून आपण जो ठराव पहिला मांडलेला आहे त्याला आम्ही मंजुरी देत आहे.

**एस. ए. खान :-**

दुसरा कुठे आहे ते दाखवा ना.

**मा. महापौर :-**

रेकॉर्डींगला आहे. प्रोसेडिंगला आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

सन्मा. सदस्य शशिकांत भोईर यांनी ठराव मांडताना जी दुरुस्ती केलेली आहे ती दुरुस्ती बरोबर आहे असा मी ठराव मांडतो.

**एस. ए. खान :-**

त्या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

पण ठराव मंजुर झालेला आहे. सचिवांनी पुढचा विषय घ्यावा.

**प्रकरण क्र. ०६ :-**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २९(अ) अन्वये मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या हद्दीत चार प्रभाग समित्या स्थापन करणेबाबत. (भौगोलिक रचनेस मान्यता देणे.)

**ठराव क्र ०७ :-**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २९ (अ) (१) अन्वये मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील संलग्न असलेल्या प्रभांगाच्या प्रभाग समित्या गठित करण्याचे अधिकार महानगरपालिकेस म्हणजेच मा. महासभेस दिलेले आहेत. कलम २९ अ (१) मध्ये दिलेल्या सुचीनुसार लोकसंख्येच्या प्रमाणात प्रभाग समित्यांची संख्या निश्चित केलेली आहे. सन २००१ च्या जनगणनेनुसार आपल्या मिरा भाईंदर महानगरपालिकेची लोकसंख्या ५,२०,३०१ असल्याने २९ अ (१) च्या सुचीनुसार ४ प्रभाग समित्या स्थापन करावायच्या आहेत. प्रभाग समित्या स्थापन करताना प्रत्येक समितीमध्ये समाविष्ट होणाऱ्या व एकमेकाशी संलग्न असणाऱ्या प्रभागांना एकत्रित करुन भौगोलिकदृष्टया सोयीस्कर व जवळपास समान लोकसंख्या असलेल्या एकत्रित प्रभागांच्या समित्या गठित करावयाच्या आहेत.

भाईंदर (पश्चिम) व मिरारोड (पश्चिम) विभागात लोकसंख्या २००१ च्या जनगणनेनुसार १,४८,४३२ इतकी असून, या विभागासाठी १ प्रभाग समिती गठित करता येईल.

भाईंदर (पूर्व), मिरारोड (पूर्व) तसेच काशीमिरा गावठण लक्ष्मीबाग, घोडबंदर, चेणे वर्सोवा, काजूपाडा या सर्व विभागांची लोकसंख्या २००१ च्या जनगणनेनुसार ३,७१,८६९ असून या विभागांना एकूण ३ प्रभाग समित्या गठित करता येतील.

वरीलप्रमाणे ३ प्रभाग समित्या गठित करताना प्रत्येक प्रभाग समितीस सरासरी १,२३,९५६ इतकी लोकसंख्या धरुन त्यानुसार संलग्न असलेल्या प्रभागांची प्रभाग समिती गठित करणे आवश्यक आहे. सन २००१ ची जनगणना करीत असताना तत्कालीन मिरा भाईंदर नगरपरिषदेचे एकूण ४७ वॉर्ड अस्तित्वात होते. अशा १ ते ४७ वॉर्डांचे वार्डनिहाय जनगणनेची आकडेवारी उपलब्ध आहे. तसेच प्रत्येक वार्डाच्या हद्दी निश्चित केलेल्या असून त्याची माहिती प्रशासनाकडे उपलब्ध आहे.

सार्वत्रिक निवडणुकीसाठी नवीन प्रभाग रचना करताना जनगणनेची आकडेवारी विचारात घेउन आकडेवारी सम प्रमाणात ठेवून प्रभागरचना केली जाते. अशा आकडेवारीतील तफावत ही त्या प्रभागातील लोकसंख्येच्या १०% पेक्षा कमी किंवा जास्त प्रमाणात असता कामा नये. परंतु ही बाब भौगोलिकदृष्टया मोठया प्रमाणात बदल होत असल्यास किंवा नैसर्गिक हद्दीस बाधा येत असल्यास लागू होत नाही.

प्रशासनाने प्रभाग समित्यांची रचना स्थापन करणेसाठी प्रस्ताव मा. महासभेपुढे ठेवला आहे. सदर प्रस्तावाचे अवलोकन करता असे स्पष्ट दिसून येते की, प्रभाग समिती क्र. ३ व ४ ची रचना करतांना सदर प्रभाग समितीमध्ये समाविष्ट होणाऱ्या प्रभागांची सन २००१ च्या जनगणनेनुसार होणारी लोकसंख्या विचारात घेतलेली नाही. त्यामुळे प्रभाग क्र. ३ व प्रभाग क्र. ४ ची लोकसंख्या सन २००१ च्या लोकसंख्येच्या तुलनेत विषम प्रमाणात आहे. त्यामुळे ही सभा प्रशासनाच्या गोषवाऱ्यानुसार मा. महासभेपुढे आलेल्या प्रस्तावामध्ये दुरुस्ती सुचवीत आहे.

भाईंदर पश्चिम व मिरारोड पश्चिमेकडील सर्व प्रभागांसाठी १ प्रभाग समिती गठित करण्यात येत आहे. भाईंदर- पूर्वेकडील संलग्न प्रभागांसाठी व सरासरी लोकसंख्येच्या जवळपास असलेल्या लोकसंख्येसाठी

१ प्रभाग समिती गठित करण्यात येत आहे. मिरा रोड पूर्वेकडील काही प्रभागांसाठी १ प्रभाग समिती गठित करण्यात येत आहे. भाईंदर-पूर्व येथील उर्वरित, मिरा रोड येथील उर्वरित व काशी, मिरा गावठण, घोडबंदर, चेणे, वर्सोवा, काजूपाडा या क्षेत्रांसाठी १ प्रभाग समिती गठित करण्यात येत आहे. वरीलप्रमाणे समित्या गठित केल्याने त्या समित्यांची भौगोलिकदृष्टया व नैसर्गिक हद्दीची रचना न बदलता तसेच प्रभाग समितीमध्ये समाविष्ट करावयाच्या प्रभागाच्या हद्दी कलम २९ अ (१) च्या अन्वये संलग्न असतील.

खालीलप्रमाणे प्रभाग समित्या स्थापन करणे कायदेशीर व रचनात्मकदृष्टया योग्य आहे.

| अ.क्र. | प्रभाग समिती क्र. | प्रभाग समिती क्षेत्रात समाविष्ट निवडणुक प्रभाग | एकूण प्रभाग |
|---|---|---|---|
| १ | **१** | १, २, २०, २१, २२, २३, २४, २५, २६, २७, २८, २९, ३०, ३१, ३२, ३३, ३४, ३५, ३६, ३७, ३८, ३९ | **२२** |
| २ | **२** | ३, ४, ५, ६, ७, ८, ९, १०, ११, १४, १५, १६, १७, १८, १९, ४०, ४१, ४२, ४३, ४४, ४७, ४८, ४९ | **२३** |
| ३ | **३** | १२, १३, ४५, ४६, ५१, ६१, ६३, ६४, ६८, ६९, ७०, ७२, ७३, ७४, ७५, ७६, ७७, ७८, ७९ | **१९** |
| ४ | **४** | ५०, ५२, ५३, ५४, ५५, ५६, ५७, ५८, ५९, ६०, ६२, ६५, ६६, ६७, ७१ | **१५** |

वरीलप्रमाणे प्रभाग समित्यांच्या रचनेमध्ये केलेल्या दुरुस्तीस ही सभा मान्यता देत आहे. असा ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. शशिकांत भोईर.** **अनुमोदन :- श्री. एस. ए. खान.**

**ठराव बहुमताने मंजुर**

सन्मा. सदस्य शशिकांत भोईर साहेबांनी ज्या ठरावाचे वाचन केले आहे आणि अनुमोदक व सुचक दिलेले आहे. त्या ठरावास मंजुरी देत आहे आणि जी दुरुस्तीस अनुमोदक न दिल्याने ती फेटाळत आहे.

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

( नगरसचिवांनी प्रकरण क्र. ७ च्या ठरावाचे सभागृहासमोर वाचन केले.)

प्रकरण क्र. ०७ :- परिवहन समितीमधील एक पद (सदस्या सौ. सुनिता पाटील) रिक्त झाल्यामुळे त्या जागी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २५(५) चा पोटकलम ३ अन्वये उर्वरित कालावधीसाठी एका सदस्याची निवड करणेबाबत.

**नगरसचिव :-**

परिवहन सदस्यासाठी दिलेल्या मुदतीमध्ये श्री. रतीनकुमार दत्ता ह्यांचे नाव आलेले आहे आणि ते कोट्याप्रमाणे कॉंग्रेसच्या पक्षात असल्यामुळे त्यांचे एकच नाव होते. ते नाव मी मा. महापौरांकडून घोषीत करायला लावतो.

**मा. महापौर :-**

परिवहन समिती सदस्य म्हणून श्री. रतीन दत्ता यांचे नाव आलेले आहे. मी त्यांचे नाव घोषीत करीत आहे.

**प्रकरण क्र. ०७ :-**

परिवहन समितीमधील एक पद (सदस्या सौ. सुनिता पाटील) रिक्त झाल्यामुळे त्या जागी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २५(५) चा पोटकलम ३ अन्वये उर्वरित कालावधीसाठी एका सदस्याची निवड करणेबाबत.

**ठराव क्र. ०८ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेची परिवहन समिती यापुर्वीच गठीत करण्यात आलेली आहे. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २५ (५) नुसार महानगरपालिकेने नेमणूक केलेल्या परिवहन समितीच्या सदस्यांपैकी निम्मे सदस्य प्रत्येक दुसऱ्या वर्षी पोटकलम २ मध्ये निर्दिष्ट केलेली सभा ज्या महिन्यात भरली असेल त्या महिन्याच्या पहिल्या तारखेस निवृत्त करणेची तरतुद आहे. परंतु, पोटकलम ३ मध्ये परिवहन समितीचा सदस्य म्हणून नेमणूक करण्यात आलेल्या सदस्यांपैकी पालिका सदस्याच्या बाबतीत त्याच्या निवृत्तीच्या तारखेपुर्वी कोणत्याही वेळी तो पालिका सदस्य असल्याचे बंद होईल तर तो परिवहन समितीचा

सदस्य असल्याचे बंद होईल अशी तरतुद आहे. परिवहन समिती सदस्यांपैकी सौ. सुनिता कैलास पाटील यांची पालिका सदस्य म्हणून मुदत संपल्याने त्यांच्या जागी नविन सदस्य नेमणूक होणे आवश्यक आहे.

महानगरपालिकेच्या नवनिर्वाचित सदस्यांनी मा. विभागीय आयुक्त सोा. कोकण विभाग यांचे कार्यालयात नोंदणी करून गट/आघाडी/फ्रंट तयार केल्याप्रमाणे तौलानिक पध्दतीनुसार गटनिहाय प्रत्येक गटाच्या संख्येचा तौलनिक संख्याबळातुन अपुर्णांकाच्या आधारे संयुक्त लोकशाही आघाडी प्रथम क्रमांकावर असल्याने परिवहन सदस्य पद हे संयुक्त लोकशाही आघाडी मार्फत नेमणूक होणेस प्रस्तावित आहे.

याप्रमाणे परिवहन समितीवर **श्री. रतीन दत्ता** (संयुक्त लोकशाही आघाडी) यांची रिक्त झालेल्या जागी उर्वरित कालावधीसाठी नियुक्ती करण्यांत येत आहे.

**सही**
**पिठासीन अधिकारी**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. महापौर :-**

गणेश उत्सवाच्या विर्सजनाच्यावेळी भाईंदर पूर्व चौपाटीवर एक अपघात झाला आणि त्याबद्दल सन्मा. सदस्य श्री. ओमप्रकाश अग्रवालजींनी एक पत्र दिले आहे की, त्या परिवाराला आर्थिक मदत देण्यासाठी आपण मा. महासभेत चर्चा करुन त्या कुटूंबाला काही आर्थिक मदत देता येईल का?

**शानु गोहिल :-**

मा. महापौर साहेब, मी मा. आयुक्त साहेबांकडे पत्र दिले होते.

**नर्मदा वैती :-**

आम्ही ही पत्र दिले आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर निधीतुन जर फंड द्यायचा आहे. त्याबाबत माझे पत्र आहे. मा. महापौर साहेब, आजपर्यंत गणपती विर्सजनाच्यावेळी कुठलीही घटना भाईंदर शहरामध्ये घडली नाही. पण त्या मुलाचे दुर्देव समजा त्या आईचे दुर्देव समजा प्रशासकीय अधिकाऱ्याच्या बेजबाबदारपणा समजा त्यांचा मुत्यु गणपतीच्या विर्सजनाच्यावेळी झाला. त्यावेळी मी आणि सन्मा. नगरसेविका सौ. वैती मॅडम हे दोन्ही त्या घरात सतत संपर्कात होते. बॉडी मिळेपर्यंत आणि बॉडीचा विघटन होईपर्यंत त्या घरांच्या संबंधित होतो आणि जेव्हा त्या घरातील परिस्थिती बघीतली. तर त्याला तीन मुली आणि एकटा मुलगा त्या आईला होता. त्या तिन्ही मुलींची लग्ने झालेली आहेत. त्या एकट्या आईचा संसार उध्वस्त होईल. म्हणून मी आपल्याला पत्र दिले होते की, घडलेल्या घटनेबाबत आपण फक्त दुःख व्यक्त करू शकतो किंवा एक दोषारोपन करु शकतो. पण शेवटी त्या आईचे पुढचे भविष्य आपण सांभाळले पाहिजे. याची खबरदारी प्रशासनाने सांभाळली पाहिजे. म्हणून मी आपल्याला पत्र दिलेले होते आणि माझी अशी आपणांस विनंती आहे की, आपण मा. महापौर निधीतुन त्यांना किमान ५१ हजार रुपये आणि शासकीय निधीतुन जे मा. आयुक्त साहेबांनी रु. १ लाख रुपये दिलेले आहेत. असा रु. १ लाख ५१ हजार रुपयांचा निधी दोन्ही मिळून आपण त्यांना द्यावे असे इथे मी आपल्याला सांगत आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. महापौर साहेब, सन्मा. सदस्य श्री. ओमप्रकाशजी विसरले. त्या दिवशी जी दुःखद घटना घडली साडेपाच वाजता त्यादिवशी सकाळी होडीमध्ये शोध घेण्याकरिता मी आणि सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवालजी होते. आपण असे विसरु नका. सगळ्या पक्षाच्या नगरसेवकांसाठी ही घटना दुःखाची झालेली आहे आणि सर्व नगरसेवकांनी प्रयत्न केलेले आहे. तरी सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवालजींनी सांगितले की, ५१ हजार रुपये द्यायचे आहे. माझी आपल्याला अशी विनंती आहे की, आपण त्याच्यामध्ये आणखिन स्वखर्चाने भर टाकून १ लाख १ रुपये तुमच्याकडून व साहेबांकडून जे असेल ते मदत म्हणून दिले तर बरे होईल.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

बॉडी आल्यावर मा. महापौरांनाही फोन लावला तेव्हा मा. महापौर हे कुठल्यातरी मिटींगमध्ये होते. बॉडी उशीराने येणार होती. महापौर स्वतः तिथे आले. शेवटपर्यंत तिघेही अत्यंसंस्कारामध्ये सामिल होते.

**शानु गोहिल :-**

मा. महापौर साहब, मा. आयुक्त साहब, कै. जितेंद्र चांडक नाम के लडके का मुत्यु हुआ था। तो यह गलती प्रशासन की थी। उसके लिए प्रशासनने क्या स्टेप लिया? आयदा से हरसाल जिसतरह से विर्सजन होता है वहापर फोर क्लिप या क्रेन का बंदोबस्त किया जाता है। तो क्या इसबार कमिशनर साहब प्रशासन की तरफसे कोई बंदोबस्त नही था। यह दुःखद घटना फिर घट सकती है इसलिए प्रशासनने बहुत सिरीयसली सोचना चाहिए। किसी का बेटा गया है। वह भी एक ही बेटा था। उसके घरमे कमानेवाला कोई नही है। इसके बारेमे प्रशासनने सोचना चाहिए की, अगलीबार कोई दुःखद घटना नही घटनी चाहिए तो प्रशासनने इसके बारेमे बंदोबस्त करना चाहिए। तो इसबार ऐसा क्यो नही हुआ। वहापर फायर ब्रिगेड के लोग मौजुद थे उसक बावजुद भी वह बच्चा सबके सामने डुब रहा था तो फायर ब्रिगेड के लोग वहापर क्या कर

रहे थे? मै प्रशासन से पुछती हु, प्रशासन वहा क्या कर रही थी। जब की सारी टिम वहापर मौजुद थी और वह लडके की बॉडी दोन दिन के बाद मिलती है। प्रशासनने वहापर क्यो नही बंदोबस्त किया? जब ऐसे हेवी गणपती हरसाल आत है। पिछले साल किया तो इससाल क्यो नही किया? ऐसा एक नियम बनाओ की दस फुटसे ज्यादा उँचाई पर गणपती होना नही चाहिए। ज्यादा से ज्यादा आठ फुट गणपती की उँचाई होना चाहिए।

**मिलन म्हात्रे :-**

आपण आता सभागृहामध्ये कोणाला किती पैसे देवू त्याच्याने जीव काय परत येणार नाही. पण अनंत चतुर्थीच्या दिवशी सगळ्यांना वाईट गोष्ट म्हणजे यावर्षीचा झालेला अनंत चतुर्थीचा सोहळा सगळ्यात बेशिस्त. कुठल्याही अधिकाऱ्याची उपस्थिती नाही. पुष्पवृष्टीला आपण जे पंडाल बनवले. त्याला आपण लाखो रुपयाचे भाडं दिले. पण दहा रुपयाची पुष्पवृष्टी करण्यासाठी तिथ फुले नव्हती. ही वाईट परिस्थिती सर्वत्र शहरात होती. दरवर्षी भाईंदर वेस्टच्या चौपाटीवर संध्याकाळी ३.०० वा. दुपारी ॲम्ब्युलन्स येते ती रात्री दुसऱ्या दिवशी सकाळी जाते. आयुक्तांना ७.०० वा. फोन केला. मी तिथला स्थानिक नगरसेवक, साहेब, एक ॲम्ब्युलन्स तरी प्रोव्हाईड करा. सकाळी ५.०० वा. पर्यंत तिथे ॲम्ब्युलन्स आली नव्हती. आपल्याकडे ॲम्ब्युलन्स नाहीत का? आपला मेडीकलचा स्टाफ गेला. डी.एम.सी.ना फोन केला. आयुक्तांना सांगितले अजून त्याची कुठलीही चौकशी नाही, काही नाही. आपण स्वतः उभे होता तेव्हा स्टाफ आपल्या मागे होता. श्री. कांबळे नावाचे डॉक्टर आपल्या सोबत होते. दुसऱ्या दिवशी पहाटे ५.०० वाजेपर्यंत आम्ही विर्सजनाला होतो. आपला मेडीकलचा स्टाफ कधी गेला हे कोणालाही माहित नाही. प्रायव्हेट हॉस्पीटलचा स्टाफ जाताना आम्हाला सांगून गेला की, साहेब, आम्ही आता चाललो आहोत. साडेतीन वाजले आहेत. साडेतीन वाजेपर्यंत प्रायव्हेट डॉक्टर होते. या महापालिकेच्यावतीने आपला जो काही कार्यक्रम झाला त्याच्यावर कंट्रोल ठेवण्याकरिता कोणीही नव्हते. हा टिकेचा विषय नाही. आज एक नगरसेवक या नात्याने नागरिक आम्हाला विचारतात. आज आपल्याकडे ॲम्ब्युलन्स आहे. नसतील तर तेवढ्यापुरती भाड्याने घ्यायची होती. माझ्या मोबाईलच्या संपूर्ण प्रोग्राममध्ये तारीख फिड केली आहे. त्यांना ७.०० वा. सांगितले की, आपल्याकडे ॲम्ब्युलन्स नाही आज तुम्ही मदत करत आहात त्याला आमचा विरोध नाही. पण आपण जर सक्षम राहिलो. एक फायर ब्रिगेडची बोट काय प्रोब्लम झाला तर तो ईस्टवरुन वेस्टवर ती बोट घेउन यायला जाणार आणि परत ती बोट घेवून येणार. तेवढाच क्राउड वेस्टला, तेवढाच क्राउड ईस्टला तेवढाच क्राउड दुसरीकडे. म्हणजे तुमच्याकडे ज्या काही मोटरबोट लाईफ सेव्हींगकरिता आहेत. त्या वेस्टला आहेत आणि ईस्टला का नव्हते? आपल्या फायर ब्रिगेडच्या येथे दोन मोठ्या बोटी आहेत. श्री. पाणपट्टे साहेब, आता येथे नाही. त्यांनी आवाक्याच्या बाहेर त्या बोटी आणल्या आहेत. त्या बोटी उचलायला दहा माणस लागतात. लाईफ सेव्हींग बोट एका माणसाने उचलली पाहिजे. ट्युबच्या त्या बोटी पाहिजेत. स्थायी समितीमध्ये असताना तीन बोटीची मागणी केली होती. पण सर्व मटेरीयल सात-सात आले आहे. ते सर्व मटेरीयल तुमच्या गोडाउनला पडले आहे. पण आपल्या उपयोगाला काहीच नाही. ही आपली व्यथा आहे. स्थायी समितीला असताना आम्ही जी मागणी केली त्याचे दोन मटेरीयल मागवले होते ते सहा आलेले आहे. पण उपयोग काही नाही. आज त्यावेळेला तुम्ही स्वतः होता माझ्या बरोबर आपण पंडालवर बसलेलो होतो. अधिकारी बरोबर नव्हते. मा. महापौर येणार आणि अधिकारी कोणी नव्हते. आपण अधिकाऱ्यांना मोबाइल प्रोव्हाईड केले आहे. तर शनिवार, रविवार त्यांचे मोबाईल बंद म्हणजे आपण ज्या अधिकाऱ्यांना फोन दिले, माहितीच्या अधिकारात काढले ते नियमबाह्य आहे. बरेच काही महापालिकेत नियमबाह्य आहे. ते आम्ही पुढच्या मिटींगला घेउ. त्याच्यावर आस्थापनेचा भरपूर खर्च होत आहे आणि चालला आहे पण त्याचा फायदा कोणालाही होत नाही. शनिवार, रविवार आपण एकत्र बसू या किंवा सुट्टीच्या दिवस, त्यादिवशी आपण त्यासगळ्यांना डायरीवाईस फोन करायचे आणि जे अधिकारी फोन उचलतील त्याच्यावर कार्यवाही करु नका आणि ज्या अधिकाऱ्याचा फोन तुम्हाला बंद सापडेल त्याच्यावर तुम्ही कार्यवाही करा. कारण त्याचे बिल आपण देत आहोत. मी सगळ्या नगरसेवकांना ही रिक्वेस्ट करित आहे. कुठल्याही नगरसेवकांनी फोन केला तर अधिकाऱ्यांचे शनिवार, रविवार किंवा मधली कुठली सुट्टी आली तर आदल्या दिवशी संध्याकाळी ७.०० वाजल्यापासून त्या सगळ्यांचे फोन बंद असतात. फोन अवेलेबल नसतात आणि लागत नाही. मग आपण हा खर्च करायचा कशाला? सहा, साडेसहा लाख रुपये प्रती महिन्याला आपल्या बिलाचा खर्च येतो. त्या बिलाची स्टेटमेन्ट आपण चेक करा. आपण पैसे देतो त्याच्यापेक्षा जास्त बिल आपल्या खात्यातुन पेड होते हे ह्याच्याकरिता सांगतो की, सगळा कायदा, सुव्यवस्था जी काय आपण सांभाळतो. अग्निशमन विभागाचे जे डी.एम.सी. आहेत ते त्यादिवशी कुठे होते? फायर ऑफीसर दोन ठिकाणी कसे काय ऑपरेट करणार? ह्याची आपण दखल घेतली पाहिजे. मागच्या सभेमध्ये मी तुम्हाला बोललो. नंतर पुढे काहीच नाही. अधिकारी म्हणतात दोन महिने थांबा. दोन महिन्यांनी काय होणार ते तुम्हाला आम्हाला काहीच माहित नाही. मला एका उच्च पदस्थ अधिकाऱ्याने सांगितले की, आम्ही काय करायचे आता कंटाळलो आहोत. आणखीन दोन महिने थांबा. ह्याचा अर्थ काय? म्हणजे आपली हि परिस्थिती आहे. हे कुठेतरी सुधारले पाहिजे. आपण लाख रुपये दिले. आणखीन दहा लाख रुपये वाटू. पण ईश्वर न करो, या सभागृहातला एखादा नगरसेवक / नगरसेविका या डायसवर बसलेले आता मोठे मोठे अधिकारी ह्यापैकी एखादा कोणी दगावला असता तर? किंवा आपल्या फायर ब्रिगेडचा एखादा जवान गेला असता तर त्याला इन्शुरन्स क्लेम

पास नाही. आज ही परिस्थिती आहे. ह्याचा कोण साधक बाधक विचार करेल का? जे नव्हते ते तुमच्या दृष्टीपथकात आणून दिलेले आहे. बाकी टिका, टिपणी किंवा कोणावर आसुड ओढायची आम्हाला इच्छा नाही. आपण स्वतः त्यादिवशी होता. तुम्हाला त्या डायसवरही मी सांगितले की, ही परिस्थिती आहे. त्यावेळेला आपली चर्चा चालली होती. ह्याच्यावर आपण काय रुलिंग द्याल का? की, अनंत चतुर्थीच्या दिवशी जिम्मेदार अधिकारी ज्यांना पगार फ्ल्युलचे चार्जेस, गाड्या या महापालिकेमध्ये ॲन्टीचेंबर, चेम्बर्स, गालीचे, ए.सी. सगळं प्रोव्हाईड केले आहे. फोन, काय दिले नाही. पण माझा कोणावरही रोष नाही. दोन आयुक्त येउन गेले. श्री. शिवमुर्ती नाईक व श्री. आर. डी. शिंदे साहेब येउन गेले. आपल्या येथे वेस्टच्या चौपाटीच्या जागेवर रेल्वेने सतत खडी आणून टाकली. ती खडी उचलायला आम्हाला पाच दिवस लागले. तिथे एकही जबाबादार अधिकारी नव्हता. या अगोदर रेल्वेवाल्यांनी आपल्या लोकांना अरेस्ट केले आहे. आपले रोलर अरेस्ट केले, जे.सी.बी. पकडले, कर्मचारी पकडले. आम्ही नसतो तर त्यांना सोडले नसते. आज ही परिस्थिती आहे. एकीकडे तुमच्या एस.आय. ने फक्त काम करायचे. वरिष्ठ अधिकारी कोणी नाही. आज आपल्याकडे रेल्वेने साडे आठ लाख रुपयाची रिकव्हरी मागीतली. त्या पत्राचा उल्लेख आजच्या या विषयपत्रिकेवर निरंक लिहला आहे. परवा, आपले एस.आय. गेले होते. रेल्वेची मिटींग झाली. साडे आठ लाखाची रिकव्हरीसाठी रेल्वेने आपल्या महापालिकेला नोटीस मारली आहे. फक्त आमच्या इकडचा एस. आय. गेला. आपल्या इथले प्रमुख अधिकारी का गेले नाही? डी.एम.सी. रेल्वेला का गेले नाही? एकही अधिकारी गेला नाही. व साडे आठ लाख रुपये आपल्याकडून भरपाई मागितली आहे. त्या मिटींगला फक्त एकटा एस. आय. होता. या सगळ्यावर आपण रुलिंग द्या. एक लाख रुपये दिले. सगळे खुष झाले. असे करुन चालत नाही. या सगळ्यावर आपले रुलिंग आले पाहिजे.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य मिलन म्हात्रेजी, सन्मा. सदस्या शानु गोहिल आपण जी भावना व्यक्त केली. जो अपघात झाला त्याला आपण कधीही कुठल्याही वेळी पूर्ण करु शकत नाही. कितीही मदत केली तरी ते कमीच आहे. म्हात्रे साहेब, आपण सांगितले की, पुष्पगुच्छ नव्हते तर आपण दोघांनी एकत्र पुष्पगुच्छाचा वापर केला होता.

**मिलन म्हात्रे :-**

तुमच्या बाजुला मा. स्टीवन मेन्डोसा बसले आहेत. त्या दिवशी ते आले. पुष्पवृष्टी करण्यासाठी पुष्प नव्हते. तेथून ते खाली उतरले आणि गाडीत बसून निघून गेले. त्या पंडालची मी गोष्ट करतो.

**मा. महापौर :-**

ज्यावेळी आपण एकत्र होतो त्यावेळी पुष्प होते. माझ्या बरोबर प्रभाग अधिकारी श्री. दोंदे हे होते. तसेच, ज्यावेळी मी ईस्टवरुन वेस्टला आलो होतो त्यावेळी फायर ब्रिगेडची माणसं माझ्या बरोबर होती. पण हे सांगुन सुध्दा हा जो उपघात घडला आहे त्याबद्दल नक्की आपण कुठेतरी कमी पडलो आहोत. याच्यात काही दुमत नाही. मॅडमनी आता सांगितले की, पुढच्यावेळी असा अपघात घडू नये यासाठी मी तुम्हाला आश्वासन देतो की, पुढच्या वेळी जेव्हा अशाप्रकारची व्यवस्था करायची असेल तर सर्व गटनेत्यांची बैठक घेउन जास्तीत जास्त सुरक्षा आपल्याला कशी करता येईल आणि आपण हे प्रयत्न करु की कमीत कमी कोणत्याही प्रकारचा गणपती उतरतांना ५० फुट कमी किंवा समुद्रापासुन १०० फुट लांब ठेवावे असे आपण नक्की निर्णय घ्यावे. मी आश्वासन देतो ज्यावेळी अशाप्रकारचा कार्यक्रम होईल त्यावेळी नक्की विश्वासात घेउन एकत्र सुरक्षा कशी करता येईल सन्मा सदस्य ओमप्रकाश अग्रवालजी, सन्मा. सदस्या शानु गोहिलजी आणि सन्मा. सदस्या, नर्मदा वैतीजी ह्यांनी सांगितले त्यांना जी मदत करायची तर आपण सन्मा. सभागृहाने ठरवावे की, किती रक्कम द्यायची आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहेब, यामध्ये मी दुरुस्ती सुचविली आहे. या समुद्र किनाऱ्यावर टोटल चार कार्यक्रम होता. १) गणपती विर्सजन २) छठपुजा त्या दिवशी ही लाखो भाविक छठपुजेला समुद्र किनाऱ्यावर जातात आणि काही फुल अर्पण करतात. ३) गणगौर उत्सव ४) जैन समाजाचा उत्सव व ५) नवरात्र उत्सव असे सण साजरे होतात. येथे मोठे गणपती नसले तरी लोक समुद्र किनारी भावनेने जातात. या पाचही उत्सवाकरिता आपण खबरदारी घ्यायला पाहिजे.

**मा. आयुक्त :-**

सभागृहामध्ये सन्मा, नगरसेवकांनी जे मुद्दे उपस्थित केलेले आहेत व गणपती विर्सजनाच्या वेळेला जी काही दुर्घटना घडलेली आहे त्या बाबतीमध्ये ही मा. महापौरांनी सांगितले त्यामुळे ती काही भुषणावह घटना नाही. परंतु, अशाप्रकारची मोठमोठी मुर्ती आपल्या शहरामध्ये सार्वजनिक मंडळ बसवतात त्यांना सुध्दा आपण अशा प्रकारच्या सुचना देण्याबद्दल गटनेत्यांच्या बैठकीमध्ये सांगितलेले होते. काही मुद्द्यांवर त्याच्यासोबत मी चर्चा केली होती. आणि ही जी चर्चा आहे ते आपण महानगरपालिकेतर्फे सार्वजनिक गणपती मंडळांसाठी बक्षीसांचा कार्यक्रम आयोजीत करणार आहात. त्या बक्षिसेच्या कार्यक्रमाच्या वेळेला या शहरातल्या सर्व सार्वजनिक मंडळाला निमंत्रित करणार आहोत. त्या ठिकाणी आपण पोलिसांना बोलवणार आहोत आणि एक आचार संहिता जशी निवडणुकीच्या पिरीयडमध्ये आचार संहिता असते अशाप्रकारची आचार संहिता ही आपण

गणपतीच्या काळामध्ये तयार करणार आहोत. त्याच्यामध्ये थोडक्यात मुद्दा मी आपल्याला सांगतो. गणपतीच्या मुर्तीची जी उंची आहे ती उंची आपण निश्चीत करायची आहे. आणि त्याप्रमाणे त्याच्यापेक्षा मोठी गणपतीची मुर्ती आपल्याला या शहरामध्ये बसवण्यासाठी आपण परवानगी द्यायची नाही. सन्मा. नगरसेवक म्हात्रे साहेबांनी कर्मचाऱ्यांच्याबाबत जो मुद्दा उपस्थित केला की काही ठिकाणी महापालिकेचे कर्मचारी नव्हते तर गणपती विसर्जनाचा कार्यक्रम हा एकदा सुरु झाला की, जोपर्यंत शेवटचा गणपती जात नाही. तोपर्यंत काही कर्मचारी असतात. तेव्हा त्यांची अशी सुचना होती की या ठिकाणी शिफ्ट ड्युट्या जर कर्मचाऱ्याच्या लावता येत असतील तर तशा ड्युट्या आपण लावणार आहोत त्याचप्रमाणे ही जी वाईट घटना घडली आहेत. त्या संदर्भामध्ये सन्मा. नगरसेवक प्रफुल्ल पाटील हे पण माझ्याकडे आले होते. आणि प्रत्यक्ष घटनेचे साक्षीदार ते आहेत. त्यांनी ही याबाबतीमध्ये मला जे काय सांगितले त्याच्यामध्ये कोणाची चुक आहे? प्रशासनाची चुक आहे की, आणखिन कोणाची चुक आहे की त्या मुलाची चुक आहे ह्याच्या खोलामध्ये न जाता त्याठिकाणी अशाप्रकारच्या घटना आपल्या शहरामध्ये घडुच नये याची दक्षता घेणे आवश्यक आहे.त्याच प्रमाणे शहरातील सार्वजनिक कार्यक्रमासाठी संस्थांना उपस्थित राहण्यासाठी निमंत्रण देणार आहे. आणि ही जी वाईट घटना घडलेली आहे. त्या वाईट घटनेच्या बाबतीमध्ये मा. जिल्हाधिकारी यांना सुध्दा शासकिय निधीतुन काही रक्कम त्यांना देता येईल का? तर त्या बाबतीमध्ये आपण त्यांना पत्र पाठवलेले आहे. गटनेत्यांच्या बैठकीमध्ये जसे ठरलेले होते. आणि त्यांनी एकमुखाने जसे मला पाठिंबा दिला त्याप्रमाणे आपला त्यांना १ लाख रुपयाचा चेक तयार आहे. मा. महापौर साहेब, आपण जेव्हा म्हणाल तेव्हा त्यांना आपल्या दालनामध्ये बोलवा किंवा आपण समक्ष त्यांच्याकडे नेउन द्यायचे असेल तरी तयारी आहे. त्याप्रमाणे तरी आपली तयारी आहे. त्याचप्रमाणे त्यांना आपण देवु. त्याच्या आईच्या नावाने चेक काढलेला आहे. त्याचप्रमाणे सन्मा. नगरसेवक ओमप्रकाश अग्रवालजी यांनी सांगितले की आपल्या चौपाटीवर जे चार उत्सव होतात त्याची दखल आपण घेतलेली आहे. गणपती विर्सजन, छठपुजा, गौरीपुजन आणि नवरात्री विसर्जन आहे तर हे चारही .....

**याकूब कुरेशी :-**

साहेब, पाचवे मोहरम चे विसर्जन होते त्यावेळी ही दक्षता घ्यावी. अशी मी विनंती करतो.

**मा. आयुक्त :-**

आपल्याला ज्या सुचना सांगितलेल्या आहेत. ह्या सुचना आपण सार्वजनिक मंडळांना कम्पलसरी करणार आहोत. मा. महापौर जेव्हा एखाद्या बैठकीची तारीख देतील तेव्हा आपण ह्या बक्षिस वितरणाचा कार्यक्रम करणार आहोत तत्पुर्ती मा. महापौरांनी सांगितल्याप्रमाणे गटनेत्यांची बैठक ते आयोजित करतील आणि त्याच्यामध्ये एक दिशा ठरवतील आचार संहिता ठरवतील व ती आचार संहिता संबध शहरामध्ये कम्प्लसरी करु.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, आपण ॲम्ब्युलन्सबद्दल खुलासा केलेला नाही. आपल्याला ७ वाजता फोन केला. आपल्या महानगरपालिकेच्या स्वतःच्या ॲम्ब्युलन्स आहेत. सकाळी ५ वाजेपर्यंत भाईंदर (प.) येथे एकही अम्ब्युलन्स हजर नव्हती. त्याबद्दल काय आपले ड्रायव्हर नव्हते आले, गाड्या रिपेरिंग केल्या नव्हत्या केल्या अगदी महत्वाचे आहे. भाईंदर पूर्वेलाही एक ॲम्ब्युलन्य दुसऱ्या संस्थेची होती. आपली नव्हती. अनंत चतुर्थीच्या दिवशी आपले लॉग बुक काय बोलतं?

**मा. आयुक्त :-**

ॲम्ब्युलन्सबद्दल बाबतीमध्ये सन्मा. नगरसेवकांनी जो मुद्दा उपस्थित केलेला आहे. त्या संदर्भामध्ये एवढेच सांगेन की, आपण मला फोन केला होता व मी आपला फोन घेतला ही होता आणि आपण सुचना दिल्या त्याप्रमाणे संबधितांना सुचना दिलेल्या होत्या. परंतु, त्याठिकाणी ते का आले. नाहीत किंवा कोणाची ड्युटी होती? जे कोणी संबंधित असतील त्यांच्यावर तातडीने कार्यवाही करण्यात येईल.

**मिलन म्हात्रे :-**

कायदेशीर कार्यवाही करा.

**मा. आयुक्त :-**

होय.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहब, जो महापौर निधी से १ लाख रुपया देना है। ५१ हजार की सुचना की है।

**मा. महापौर :-**

महापौर निधीसे जो २५ लाख रुपये देना है। उसमे कुछ नियम बनाए थे की,किस काम के लिए वापरना चाहिऐ थे। त्याप्रमाणे माझ्यामते १ लाख रुपए देवु शकत नाही. जो ठराव झालेला आहे त्याप्रमाणे.....

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मै तो ५१ हजार रुपये बोला ।

**मा. महापौर :-**

५१ हजार, २१ हजार या १ लाख रुपये का जो ठराव आपने किया था। की महापौर फंड कहा कहापर वापरना चाहिऐ।

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

जो दुर्घटना घटती है। सभागृह मे ऐसा कोई पर्टीक्ल्युर उल्लेख नही होता हे जो घटना घटी है वह प्रशासकिय व्यवस्था के कारण घटी है। और यह आप मानते है एसलिए घटना को देखते हुए आपने महापौर फंड से पहिले भी दिए है। जब राई मुर्धा मे दरोडा गिरा और ईस्ट मे आग लगी थी तो पैसा दिया था तो आपको आग्रह है।

**मा. महापौर :-**

ठराव के अनुरुप , नियम के प्रमाणे होगे उतने महापौर फंड से अलग से दिया जाएगा।

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

अभी जानकारी ले लिजिए। तो कम से कम सभागृह को मालुम पडेगा की, महापौर निधी ५१ हजार या १ लाख रुपये का निधी है।

**निर्मला सावळे :-**

पिठासीन अधिकाऱ्यांच्या परवानगीने बोलत आहे की, ज्यावेळेस आपण महापौर निधी व आपातकालीन निधीची स्थापना केली. त्यावेळेस सन्मा. सभागृहाने हे नियम तयार केले होते. एखाद्या आपतकालीन स्थितीमध्ये एखादा व्यक्तीचा शहरामध्ये मृत्यु झाला असेल तर सभागृहाने जर ठरवल्याप्रमाणे आपण त्याला तेवढे अनुदान म्हणजे फंड सभागृहाच्या मार्फत ठराव मांडुन देवु शकतो. गेल्यावेळेस डेग्यु जे पेशंट होते. त्यावेळेस त्यांना प्रत्येकी २५ हजार रुपये मदत दिलेली होती. जरी नियमामध्ये ५ हजार १० हजार रुपये तरतुद असली तरी आपण त्यांना २५ हजारची मदत केली.त्यानुसार ५१ हजाराची मागणी केल्याप्रमाणे मृत व्यक्तिला देवु शकतो.

**मा. महापौर :-**

सभागृह मान्यता देत असेल तर मला कुठल्याही प्रकारची अडचण नाही पण माझ्या माहितीप्रमाणे तो विषय आणुन ठराव केला पाहिजे तर आपल्याला देता येईल.

**मा. आयुक्त :-**

सभागृहाला याबाबतीमध्ये मी विनंती करेन की, माजी महापौरांनी आता जे काही सांगितलेले आहे की, मा. महासभेने ठराव पारित करुन अशाप्रकारे पैसे देता येतील. त्याच्याबद्दल नो डाउट शेवटी मा. महासभा ही सर्वश्रेष्ठ आहे आणि महासभेने जो काही निर्णय घेतलेला आहे त्याची अंमलबजावणी करण्यात येईल. तत्पुर्वी गटनेत्यांची बैठक माझ्याकडे आयोजित केलेली होती त्या गटनेत्यांच्या बैठकीमध्ये दोन तीन मुद्द्यांवर आपण चर्चा केलेली होती. एक मी वाईट घटना घटलेली आहे. त्यासंदर्भामध्ये होत दुसरे, रोहित शर्मा हा मिरा भाईंदरचा एक रहिवासी होता व आपल्याकडे एक पत्र ही प्राप्त झालेली आहे त्यांना ही आपण ५१ हजार रुपयाची मदत द्यावी. अशाप्रकारे गटनेत्यानी निर्णय घेतलेला आहे. त्याचप्रमाणे कोकण मराठी साहित्य परिषद जी उल्हास नगरला पार पाडलेली आहे. त्याच्यासाठी सुध्दा ५० हजार रुपयाची मदत द्यावी. असे ठराव पारित केलेले आहेत. त्या ठरावाला कार्योत्तर मंजुरी देण्यासाठी रितसर हा विषय पुढील महासभेमध्ये आणणारच आहे. तत्पुर्वी आपल्या महासभेच्या कानावर टाकले की, अशाप्रकारे गटनेत्यांच्या बैठकीमध्ये आपण हा निर्णय घेतलेला आहे.

**शरद पाटील :-**

मा. महापौर साहेब, या मध्यंतरीच्या काळामध्ये जेव्हा इलेक्शन होत माजी महापौरांनी सांगितले की डेंग्युच्या पेशंटला पैसे दिले नाहीत तर अजुन ज्या फाईल्स बाकी आहेत. त्यांच्या फाईल्स क्लिअर करुन त्यांना पैसे देण्यात यावे अशी मी विनंती करत आहे.

**नयना म्हात्रे :-**

मा. महापौर साहेब, आपल्या मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या ॲम्ब्युलन्स किती आहेत? किती चालु आहेत व किती बंद आहेत?

**मा. आयुक्त :-**

दोन आहेत.

**नयना म्हात्रे :-**

त्या दोन्ही ॲम्ब्युलन्स चालु आहेत का? रिपेरिंगला दिल्या आहेत.

**अजीज शेख (मा. उपायुक्त सो.) :-**

चालु स्थितीतल्या आहेत.

**नयना म्हात्रे :-**

आम्ही कधीही फोन केला तर ड्रायव्हर जागेवर असतो की, नसतो हे मला माहित नाही सरळ सांगतात की ॲम्ब्युलन्स नाही. नेहमी नेहमी त्या भाड्याने देतात का?

**अजीज शेख (मा. उपायुक्त सो.) :-**

आपण प्रत्येक ॲम्ब्युलन्स आणि ज्या डेड बॉडीज आहेत त्यांच्या ड्रायव्हरांच्या आणि इतर जे कर्मचारी आहेत त्यांच्या ड्युटी आपण फिक्स केलेल्या आहेत. त्यामुळे कर्मचारी वर्ग तिथे असतो.

**नयना म्हात्रे :-**

साहेब आमच्या येथे मुर्ध्याला ॲक्सीडेंट झाले व फोन केला की ॲम्ब्युलन्स पाहिजे तर नव्हती नंतर केला होता तेव्हा ही नव्हते म्हणजे नेहमी आपल्या ॲम्ब्युलन्स जातात. तर कुठे? नक्की भाड्याने देतात की, आपले ड्रायव्हर सुट्टीवर असतात.

**अजीज शेख मा. उपायुक्त सो.) :-**

आपण ड्रायव्हरची व्यवस्था केलेली आहे.

**मधुसुदन पुरोहित :-**

शव वाहिनी का भी विषय है। आप इस विषय पे सुनिये मिस्टर वाघ करके साहब है।

**मा. महापौर :-**

विषय नही है।

**मधुसुदन पुरोहित :-**

चार दिन पहले मेरे साथ जो घटना घटी है। वह मै आपको बता रहा हु। कोई वाघ साहब करके उस विभाग के ऑफिसर है मैने फोन लगाया पहले मेरे कार्यकर्ता गये थे, उन्होने बोला की हमको शव वाहिनी चाहिए। हमे आउट ऑफ बॉम्बे ले जाना है। तो वो बोले की शव वाहिनी अव्हेलेबल है। पर हम आपको दे नही सकते हमे पता नही की कारण क्या है। वह बताने की उन्होने वैसे कोई गरज नही समझी। उसके बाद मैने मि. वाघ साहब को फोन किया तो उन्होने फोन लाईन देने के लिए १५ मिनिठ का समय लिया। फिर उन्होने मेरे से बात की, शव वाहिनी खडी है पर ले जाने के लिए आउट ऑफ बॉम्बे देंगे नही क्योंकी हमारे पास एक ही शव वाहिनी है तो मुझे इनको पुछना है की, शव वाहिनी खडी रखी है या तो क्या पुजा करने के लिए वहा शव वाहिनी खडी है। इसको उत्तर देने आता हो या नही आता हे या ऐसे समझे के यह बाहर की चिज है। अगर वह शव वाहिनी मुंबई के लिए है या मिरा भाईंदर के लिए है या मरा हुआ आदमी है उनको जाने के लिए है। या वहाँ खडा रखने के लिए है तो इस प्रश्न का उत्तर सबसे पहले देना जरुरी है। और पहले तो उस प्रशासन के अधिकारी को उत्तर देना आना चाहिऐ की यह जो सेवा है यह सेवा यहॉ के नागरिको के लिए है तो यह नागरिक की सुविधा के लिए हमने जिस अधिकारी को बिठाया है उसको पहले तो अपना संभाषन सुधारना चाहिए। और उसे जरुर बात करना चाहिए की अगर कोई नगरसेवक प्रश्न पुछा रहा है। तो उसने अपने लाईन होल्ड करके नही रखनी चाहिए। आपको सेवा देने के लिए रखा गया है। नाकी हम आपकी सेवा लेने के लिए। तो आपको सेवा देनी जरुरी है। हमने आप उत्तर की अपेक्षा रखी है। तो आपका उत्तर हमे बहोत जल्द ही मिलना चाहिए। तो यह लिमिटेशन बॉर्डेशन क्या है। हमको बताइए। की यह लिमिटेशन क्या है। यह शव वाहिनी मिरा भाईंदर शहर के बाहर जाती नही क्या? या लिमिटेशन क्या है। या शवा वाहिनी जाने का कारण क्या है मैने उनको बोला की मेरे पार्टी की जो ॲम्ब्युलन्स है उसको आप महापालिका मे लगवाईए और शव वाहिनी मेरे पास भिजवाईए तर त्यांनी मला असे उत्तर दिले की, की ठिक आहे साहेब, मी बघतो आणि मग तुम्हालां सांगतो याचा अर्थ काय आहे. म्हणजे तुम्ही तिकडे काय करायला आहात की, फक्त लोकांना निरुत्साही करण्यासाठी आहात या तो उनको उत्तर देने दिजिए या फिर उनको खुदको समझ मे आने दिजिए को आप किसलिए बैठे है। आप उनको सेवा देने बैठे है की, हमके निरुत्साही करने के लिए बैठै है।

**एस. ए. खान :-**

मा. आयुक्त साहेब, ॲम्ब्युलन्स आणि शववाहिनीसाठी रात्रीच्या वेळी फोन केला तर झोपलेले असतात. आणि सांगतात की ड्रायव्हर नाही. गाडी बिघडलेली आहे. गॅरेज मध्ये गेलेली आहे. नेहमी नेहमी ही हजार वेळी हिच तक्रार असते.

**मधुसुदन पुरोहित :-**

जहॉ पे आदमी के घर मे गम है, वह दुःखी है उसकी सेवा के लिए हम फोर कर रहे है तो वह आदमी इस तरह से अच्छा बैठा हो कि जिसको समझ मे आये की, किसीके घर मे बहोत ज्यादा तकलीफ है उसको मुझे किस तरह से उत्तर देना चाहिऐ।

**अजीज शेख (मा. उपायुक्त सो.) :-**

अपने जो शव वाहिनी है या फिर डेड बॉडी की गाडी है। वह हमलोग सिटी के बाहर भी ले जाते है लेकिन कभी कभी ऐसा भी होता है की, बहोत लम्बे जो अंतर होते है उसकी भी लोगो के तरफ से डिमान्ड की जाती है। तो उस वक्त अपने पास ॲम्ब्युलन्स नही रही तो हमलोग उसको रिजेक्ट करते है। अदर व्हाईज हम लोग सिटी के बाहर भी यह व्हेईकल्स देते है जनरली मुंबई या ठाणे इस परिसर मे तो लोगो की, रिक्वेसमेंट होती है उसके साथ हमलोग भेजते है।

**मधुसुदन पुरोहित :-**

अगर अपने पास सुविधा उपलब्ध है तो ना कहने की, जरुरत क्या है। आपने यह कहना चाहिए की ठिक है। सुविधा उपलब्ध है। आप तो सिधा बोलते है की हम बाहर भेजते नही हम रखते नही।

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य मधुसुदनजी आपको प्रश्न पे जो विचार करके की इसपर जैसे सुधारणा ला सके उसके बारे मे हम नक्की निर्णय लेगे। अभि जो विषय था की, उसको जो मदत करनी है।

**मधुसुदन पुरोहित :-**

आप हमको बोलने तो दो।

**मा. महापौर :-**

आप मेरी बात सुनिए। आप जो बोल रहे है। उसके अंदर बहोत सारी चिजे है।

**मधुसुदन पुरोहित :-**

आप उनका बचाव कर रहे है। जो अधिकारी है उनका आप बचाव कर रहे है।

**मा. महापौर :-**

मै बचाव नही कर रहॉ हु। यह विषय नही है। यहॉपर विषय मदत करने के है यह बचाव नही है।

**एस. ए. खान :-**

यह तो बचाव ही है ना और क्या है?

**मधुसुदन पुरोहित :-**

और मेरा आपसे दुसरा प्रश्न है की, डेग्यु के जो मरिज है .....

**एस. ए. खान :-**

त्या अधिकाऱ्याला तुम्ही बोलवा ना. तुम्ही त्या अधिकाऱ्याला का नाही बोलवत?

**मा. महापौर :-**

विषय कुठला आहे? तुम्ही रितसर पत्रात घ्या. आपण उद्या मग मी अधिकाऱ्यांना बोलवुन घेतो.आपण उद्या पालिकेत मी माझ्या दालनात बोलावुन घेतो. और ऐसा क्यो हुआ? इस बारे मे पता करके आपका समाधान किया जायेगा।

**एस. ए. खान :-**

साहेब, पहिलाच प्रिकॅाशन घ्यायला पाहिजे ना. मागच्या गटनेत्यांच्या सभेमध्ये झालेले होते. आपण उपस्थित नव्हते मा. उपमहापौर उपस्थित होते. सगळे निष्काळजी पणे आपले प्रशासन आहे. त्यामुळे तो मुलगा तिथ मेला.

**मधुसुदन पुरोहित :-**

अभी भी परिस्थिती ऐसी है। अधिकारी के पास अभी भी उसका उत्तर नही है।

**एस. ए. खान :-**

एक एक लाख रु. खर्च केले असते तर तो मुलगा मेला नसता तिथे कोणीही नव्हते. ना तिथे प्रशासन नव्हते. फायर ब्रिगेड चे लोक नाही, बी.एम.सी नाही. कोणीही नाही.

**मा. महापौर :-**

एक व्यक्ती बाहर खडा है। वह यह सोचकर अपने बारे मे बोलते जा रहा है। और उसके अंदर हम अपने अपने विषय जा रहा है जो व्यक्ती आया है दुःख हो के वह कुछ और ही सोच रहा होगा। तो मै सबसे पहले यह घोषित करता हु जैसे गटनेता की बैठक मे जो निर्णय हुआ था की, संबधीत जितेंद्र चांडक के परिवार को एक लाख रु. की, मदत की जाए। ५१ हजार कोकण साहित्य उनको दीजाए और ५१ हजार रु. सन्मा. रोहित शर्मा को सभा मे सन्मानसे बुलाया जाए और बहोत सन्मान से उसे ५१ हजार रु. दिया जाए। और एक लाख रु. की जो उनको मदत देनी है। तो मै मा. आयुक्त साहब से कहुगा। परसो सभी के गटनेता को बुलाकर उस व्यक्ती को बुलाकर एक लाख रु. की मदत की जाए। धन्यवाद !

**जयंत पाटील :-**

दुःखाचा ठराव मांडतो.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

महापौर फंड से दिया है ना। माजी महापौर मॅडम ने भी बोला है उनको देने के लिए।

**जयंत पाटील :-**

सन्मा. नगरसेवक राजेश म्हात्रे यांच्या आईचे दुःखद निधन झाले. हंसाबाई हरिशचंद्र पाटील यांचे ८/१०/२००७ रोजी निधन झाले. तसेच माजी नगरसेविका लिलाताई पाटील यांच्या बधुंचे आज निधन झाले. त्याच प्रमाणे मगाशी जी चर्चा झाले. जितेंद्र चांडक यांचे सुध्दा निधन झाले . या सर्वांच्या दुःखामध्ये आपले सभागृह सहभागी आहे तसेच मच्छिंद्र कांबळी नाट्य कलाकार त्यांचे ही निधन झाले. तसेच बाबुभाई जमनादास मेहता यांचेसुध्दा निधन झालेले आहे.

**भगवती शर्मा :-**

याला माझे अनुमोदन आहे.

**दु:खवटा ठराव ०८अ :-**

सन्मा. नगरसेवक राजेश म्हात्रे यांच्या आई हंसाबाई हरिश्चंद्र म्हात्रे यांचे निधन झाले आहे. तसेच माजी नगरसेविका लिलाताई पाटील यांच्या बधुंचे निधन झाले. त्याचप्रमाणे जितेंद्र चांडक यांचे सुध्दा निधन झाले तसेच मच्छिंद्र कांबळी, नाट्य कलाकार त्यांचे ही निधन झाले. तसेच बाबुभाई जमनादास मेहता यांचेसुध्दा निधन झालेले आहे. या सर्वाचा शोकप्रस्ताव मी या सदनापुढे मांडत आहे.

**सुचक :- श्री. जयंत पाटील** **अनुमोदक :- श्री. भगवती शर्मा**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(सभागृहात दोन मिनिटे शांतता राखुन श्रध्दाजंली अर्पण करण्यांत आली.)

**मा. महापौर :-**

येथे उपस्थित असलेले सर्व सन्मा. सदस्य , सन्मा. सदस्या, अधिकारी वर्ग व कर्मचारी वर्ग आपणा सर्वाचे आभार मानुन आजची सभासंपल्याचे जाहिर करित आहे.

**सभा संपल्याची वेळ :- सायं. ०६.०५ वा.**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**सही/-**
**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**